# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०९/२००६

आज दि. २०/०९/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. ११/०९/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**ऊपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | ऊप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ११) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १८) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १९) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २०) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २१) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २२) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २३) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २५) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २६) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २७) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २८) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २९) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर<br>ऊर्फ<br>शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३०) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३१) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३२) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३४) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३५) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३७) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३८) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३९) | श्रीम. सय्यद नुरजहॉं नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्रीम. ऊमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४१) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४२) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४३) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४५) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४६) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४७) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४८) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४९) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५१) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५५) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५६) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५७) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६४) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६८) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६९) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७०) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७१) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७२) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ७३) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ५) | श्री. सिंग मदन ऊदितनारायण | सदस्य |
| ६) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ७) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेला सुरुवात करावी.

(''वंदे मातरम'' या राष्ट्रगीताने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, महानगरपालिकेच्या सभागृहात मा. महासभेकरीता ऊपस्थित असलेले मा. ऊपमहापौर श्री. चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस, स्थायी समिती, विरोधी पक्ष नेते, परशुराम पाटील, सर्व पक्षाचे गटनेते, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व समित्यांचे सभापती, सर्व सन्मा. नगरसेवक / नगरसेविका, महानगरपालिका सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. ऊपायुक्त आणि सर्व खात्यांचे अधिकारी सर्व प्रतिनिधी व प्रेक्षक गॅलेरीत बसलेले नागरिक बंधु आणि भगिनींनो दि. २३/९/२००६ रोजी श्री. दुर्गा मातेच्या नवरात्र ऊत्सवास सुरुवात होत आहे. दि. २१/१०/२००६ रोजी दसरा असून मिरा भाईंदर शहरात नवरात्र ऊत्सव आणि दसरा आनंदाने आणि शांततेने पार पाडण्याकरीता श्री. दुर्गा मातेच्या चरणी प्रार्थना करते व नवरात्र या ऊत्सवाबाबत व पुढील दसऱ्याबाबत सर्वांना हार्दिक शुभेच्छा. आपल्या मिरा भाईंदर शहरात अशा पण काही व्यक्ती आहेत ज्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळात तसेच शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात आंतरराष्ट्रीय राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त करुन मिरा भाईंदर शहराचे नावलौकीक वाढविलेले आहे. ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. शहरातील अशा सन्मा. व्यक्तींचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहीत करण्याकरिता आजच्या मा. महासभेत आपण त्यांचा जाहिर सत्कार करीत आहोत. कु. दिव्या काठावटे यांनी कराटे स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केला आहे. दुसऱ्या सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर यांनी एड्स जनजागृती महिला सक्षमीकरण सर्व शिक्षण अभियान शैक्षणिक आणि सामाजिक स्तरावरील कार्याबद्दल भारताचे सन्मान मा. आदरणीय राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त केलेला आहे. या दोन व्यक्तींचा आपण इथे जाहिर पुरस्कार करणार आहोत. तसेच आजच्या विषयपत्रिकेवरील विषय चर्चा करीत असताना आपण सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात विषय पार पाडावे आणि सहकार्य करावे. धन्यवाद!,

(नगरसचिवांनी विषयपत्रिकचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

आपणा सर्वांना कळविण्यांत आनंद होत आहे की, आपल्या मिरा भाईंदर शहरातील सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर यांना दि. ०५/९/२००६ रोजी भारताचे सन्मा. राष्ट्रपतींच्या हस्ते एड्स जनजागृती महिला सक्षमीकरण व सर्वशिक्षण अभियान, शैक्षणिक आणि सामाजिक या स्तरावरील कार्याबद्दल पुरस्कार मिळालेला आहे. आपल्या महानगरपालिकेतर्फे आजच्या या मा. महासभेत त्यांना बोलावून त्यांचा यथोचित सत्कार करण्याचे योजिले आहे. मी सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर यांना मी सर्वांच्या परवानगीने सभागृहात बोलवित आहे. सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. त्याबद्दल त्यांना या सभागृहात त्यांचा सन्मान करण्यात येत आहे. मा. महापौरांच्या हस्ते त्यांना स्मृती चिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात येत आहे. मा. महापौर सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर यांचा सत्कार करित आहेत. सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवून स्वागत करायचे आहे. आपल्याच महानगरपालिका हद्दीतील कु. दिव्या काठावटे यांना कराटे स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाला असून त्यांचादेखील मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे मा. महापौरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यांत येत आहे.

**परशुराम पाटील :-**

सचिवजी आपण प्रत्येक वेळेला कोणाचाही येथे सत्कार करता. तर आपण पत्रकार सुरजप्रकाश आहे त्यांचाच कॅमेराचा वापर करतो तर आपण कधी तरी कॅमेराची ऑर्डर देतो का? म्हणजे तो खरा पुरावा राहिल की, आम्ही यांचा सत्कार केला.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे की, आज आपण या लोकांचा सत्कार केला त्याच्याबद्दल मला खरोखरच खुशी आहे. परंतु, आपल्या ..........

**नगरसचिव :-**

आपण त्यांचा सत्कार केल्याबद्दल त्यांना दोन शब्द बोलायचे आहेत तर सभागृहाने त्यांना परवानगी दिली तर बरं होईल.

**सौ. वसुंधरा लक्ष्मण शिवनेकर :-**

आपण परवानगी दिली त्याबद्दल मी आभारी आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महापौर, मा. श्रीम. निर्मलाताई सावळे, मा. ऊपमहापौर, सर्व सन्मा. सभापती, सन्मा. नगरसेवक, सन्मा नगरसेविका, मा. आयुक्त साहेब आणि सभागृहातील ऊपस्थित सर्व मान्यवर भारत सरकारच्या या मानव संशोधन विकास मंत्रालयातर्फे आयोजित राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यामध्ये हा जो मला पुरस्कार मिळाला आणि त्या गौरवाची योग्य दखल घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे माझा हा जो जाहिर सत्कार ह्या सभागृहात आयोजित केला त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते आणि त्याचा विनम्रपणे स्विकार करीत आहे. माझा हा जो सत्कार झालेला आहे. त्यामुळे मी अत्यंत भारावून गेलेली आहे. खरं म्हणजे १५ वर्षापूर्वी आम्ही भाईंदरमध्ये बांद्रावरुन आम्ही इथे रहायला आलो होतो. तेव्हा आजच्या इतका भाईंदरचा विकास झाला नव्हता. तेव्हा सर्वांनी आम्हाला

भाईंदरमध्ये का राहता ते सोडून या असे सांगितलेले होते. पण याच भाईंदरमध्ये राहून माझ्या कार्यकक्षा रुंदावत गेल्या आणि मी सतत कार्य करत राहीले. हे कार्य करीत असतानाच मित्र-मैत्रिणी मिळत गेल्या. अशाच माझ्या समव्यवसायी आणि नगरसेविका सन्मा. सदस्या प्रभात पाटील ताई यांची ओळख झाली. आणि त्यांच्यामुळे माझ्या कार्य करण्यास गती मिळाली. याचा मी आवर्जुन ऊल्लेख करु इच्छिते आणि त्यांच्या बरोबर आम्ही वेगवेगळे ऊपक्रम नवघर रोड भाईंदर (पू.) येथे बरेचसे राबविले होते. खरं तर हा आजचा सत्कार करण्याचा प्रस्ताव मांडून त्यांनी आजचा हा सोहळा घडवून आणला त्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहणे अधिक पसंत करेन. खरं तर असे म्हटले जाते की, गावाचं वैभव त्या गावातील माणसे असतात. भाईंदर शहराच्या वैभवात भर टाकण्याच मला भाग्य मला मिळाले त्याबद्दल मी स्वतःला धन्य समजते. तसेच ऊर्वरित आयुष्यासाठी मी भाईंदर वासियांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासात कार्यरत राहू इच्छिते. आज माझा जो गौरव केला. मला प्रेरणा दिली त्याबद्दल मी माझ्यातर्फे आणि माझ्या परिवारातर्फे मनःपुर्वक कृतज्ञता व्यक्त करते आणि आपली रजा घेते.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. मा. महापौर मॅडम, आपल्या मिरा भाईंदरमध्ये स्वातंत्र सैनिक काही जास्त नाहीत. सापडले तर दहा, बारा सापडतील ते ही आपण शोधले तर. तर माझे असे म्हणणे आहे की, सभागृहामध्ये त्यांनादेखील बोलवा. सगळ्यांची ओळख होईल. अशी माझी आपल्याकडे विनंती आहे.

**नितीन ठाकूर :-**

सन्मा. सचिव साहेबांना काही बोलायचे आहे. कृपया त्यांना बोलू द्या.

**नगरसचिव :-**

कु. दिव्या काठावटे यांनाही आपले मनोगत व्यक्त करायचे आहे. त्यांनाही सभागृह परवानगी देत आहे.

**कु. दिव्या काठावटे :-**

आय वुल्ड लाईक टू थँक दि मेयर ऑफ मिरा भाईंदर, डेप्युटी मेयर ॲन्ड ऑल दि कॉर्पोरेटर सिटींग हिअर फॉर अ फेलिसिटींग मी अ सच अ बिग राऊंड. आय एम रिअली एनकरेज ॲन्ऊ आय व्हिल ट्राय माय बेस्ट प्ले इन इंटरनॅशनल लेवल. मै मिरा भाईंदर और इंडिया का नाम ऊँचा करना चाहुँगी। थँक यु।

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तर तासाला सुरुवात होत आहे. १२ वाजलेले आहेत. सन्मा. सदस्य ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ५३ विषयांचे ऊत्तर मला प्रशासन पुढच्या महासभेत देणार आहेत. तर ५४ नंबरच्या विषयास मी सुरुवात करीत आहे. शिक्षण अधिकारी जर ऊपस्थित असेल तर त्यांना डायसवर बोलावले तर बरे होईल.

**रतन पाटील :-**

शिक्षण अधिकारी पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शिक्षणाचा विषय आहे. शिक्षण अधिकारी असेल तर बरे होईल.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब मंडळाचे अध्यक्ष आहेत. शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आहेत. चालेल तर बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

५३ नंबरचा प्रशासन मला ऊत्तर देणार आहे.

**मिलन पाटील :-**

५२ चे काय झाले?

**चंद्रकांत मोदी :-**

५३ इसमे नही है।

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी प्रश्न क्र. ५२ चे काय झाले?

**लिओ कोलासो :-**

पिठासिन अधिकारी प्रश्न क्र. ५२ चे काय झाले?

**शरद पाटील :-**

त्यांचे समाधान झाले.

**लिओ कोलासो :-**

समाधान झाल्याचे सांगितलेले आहे. पण एक्झॅक्ट काय झालेले आहे त्यांना आपण आश्वासन दिलेले आहे काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

होय.

**लिओ कोलासो :-**

सुसंवाद झाला आहे काय?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्यांचे समाधान कशाने झाले आहे? ऊत्तराने झालेले आहे की आणखीन?

**चंद्रकांत मोदी :-**

प्रश्न क्र. ५३ नही है।

**मिलन पाटील :-**

आम्हाला याचे स्पष्टीकरण पाहिजे. मॅडम, यांनी क्र. ५२ चा प्रश्न विचारलेला आहे तो का घेत नाही.

**रोहिदास पाटील :-**

पहिले त्याच्या मनात आणखीन काही असेल त्याचे त्यांनी स्पष्टीकरण करावे. हे असे झाले आहे का? सभागृहाला ते माहिती पडेल ना. आपण कसे करता ते माहित पडेल ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. नगरसेवक श्री ओमप्रकाश अग्रवाल यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भामध्ये त्यांचा जो प्रश्न आहे तो दि. ०८/१०/२००३ च्या पत्रान्वये विचारलेला प्रश्न आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण शाळा किती व कोणकोणत्या प्रभागात कोणकोणत्या माध्यमाची शाळा आहेत? महानगरपालिकेच्या एकून २९ शाळा आहेत आणि त्याच्या सोबत जो शाळांचा तक्ता जोडलेला आहे. तर त्याच्यामध्ये संपूर्ण शाळेचा ऊल्लेख आपण केलेला आहे. २९ शाळांचा ऊल्लेख केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण शाळेतील विद्यार्थी/शिक्षक यांची संख्या किती? सध्या शाळेत सफाई कामगार स्थायी स्वरुपात किती? एकूण विद्यार्थ्यांची संख्या ८७३० आहे. शिक्षकांची संख्या १९२ आहे. आणि शाळेत सफाई कामगार स्थायी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ३१ कर्मचारी कार्यरत आहेत. शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पिण्यासाठी मुबलक पाण्याची सोय आहे का? व ती कशा प्रकारची आहे? प्रत्येक शाळेमध्ये शुध्द व मुबलक पाण्याची सोय आहे. व प्रत्येक शाळेत ॲक्वागार्ड बसविले आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. प्रत्येक वेळेला आपले जे शिक्षण अधिकारी आहेत त्यांना माहित नसते की, आज आपली मा. महासभा आहे. पण मा. आयुक्तांनी ऊत्तर दिले ते ठिक आहे. परंतु, त्यांची ऊपस्थिती पाहिजेच असते की नाही. तुम्ही त्याबाबत त्यांना पत्र दिलं नाही का? त्यांनी तुम्हाला गैरहजेरीच पत्र दिलेले आहे का? मागच्या वेळेलाही मा. आयुक्तांनी त्यांना एवढे भाषण दिले असताना आज त्यांची ऊपस्थिती नाही म्हणजे काय?

**मा. आयुक्त :-**

सनमा. सदस्यांना सांगु इच्छितो की, आताच मला ५ मिनिटापूर्वी शिक्षण मंडळाच्या मा. सभापतींनी सांगितले की, शिक्षण अधिकारी एक महिना रजेवर गेलेले आहेत. हे मला आता ५ मिनिटापूर्वी समजले आहे.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, जर शिक्षण अधिकारी एक महिना रजेवर गेले असतील तर काल आपल्या मनपाच्या गाडी मधुन का बसुन गेले? काल दुपारी २ वाजता ते कुठे गेले होते? त्याची जरा चौकशी करा?

(सभागृहात गोधळ)

**रोहिदास पाटील :-**

असे आहे की, शिक्षण अधिकारी रजेवर जाताना शिक्षण मंडळाच्या सभापतींच्या परवानगीने जातील किंवा मा. आयुक्तांच्या परवानगीने रजेवर जातील.

**रतन पाटील :-**

मा. ऊपमहापौर साहेब, आपण मागच्या सभेचे सांगितले की, त्यांना परत पाठवून द्या. पण अजुनही त्याच्यावर कार्यवाही झालेली नाही. ते का?

**मा. ऊपमहापौर :-**

सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, वारंवार स्थायी समितीमध्ये आणि मा. महासभेमध्ये शिक्षण अधिकाऱ्यांच्या कारभाराबद्दल नेहमी चर्चा झाली आणि हा शिक्षण अधिकारी आपल्याला नको आणि या विषयात शिक्षण ऊपसंचालकांना मी स्वतः पत्र लिहले होते. मा. आयुक्तांबरोबर या बाबतीत चर्चा केली होती आणि मा. आयुक्तांनीही त्यांना एक महिन्याची मुदत दिली होती. शिक्षण ऊपसंचालकांना की हा अधिकारी आमच्याकडून बदलून घेऊन आम्हाला सक्षम शिक्षण अधिकारी द्यावा. कारण याच्यावरुन वारंवार स्थायी समितीमध्ये, मा. महासभेमध्ये चर्चा होते. सर्व सन्मा. सदस्यांचा त्यांना विरोध आहे. आणि जर आपण त्यांना एक महिन्याच्या आत आमच्याकडून बदलून घेतला नाही तर महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्यांना एका महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल. या नोटिसीला दिड महिना झाल्यानंतर पुन्हा मा. आयुक्त साहेबांना मी पत्र लिहले आणि काल शिक्षण अधिकारी दिर्घ मुदतीच्या रजेवर जात आहे. या दरम्यानच्या काळात त्यांना कुठे काही करता येईल का म्हणून ते गेलेले आहेत. परंतु, आजच मा. महापौर व मा. आयुक्त साहेब लंच

सेक्शनमध्ये आपण शिक्षण ऊपसंचालकांशी चर्चा करुन आपल्याकडे नविन अधिकारी मागवावा अशी विनंती करत आहे. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे आपण त्यांना एक महिन्याच्या मुदतीची नोटिस दिलेली आहे आणि कार्यमुक्त करण्याची नोटिस दिलेली आहे. त्यामुळे त्याच्याबद्दल चर्चा करण्याचे कारण नाही. ते आपल्याकडून कार्य मुक्तच झालेले आहेत. असे आपण समजुन घेऊ.

**जयंत पाटील :-**

प्रश्न असा आहे की ते रजेवर गेले ह्याची कल्पना आयुक्तांना नाही. त्यांना सन्मा. सभापती महोदय सांगतात ते रजेवर गेलेले. व ते आपल्या गाडीतुन फिरतात. म्हणजे नक्की काय प्रकार आहे? रजेवर गेलेत की ते बाहेर गाडी फिरवतात.

**शुभांगी नाईक :-**

काल दुपारी ते गाडीत होते.

**परशुराम पाटील :-**

अशा अधिकाऱ्याला येथुन हाकलून टाका. त्यांना येथे ठेवू नका.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, शिक्षण अधिकारी रजेवर कधी गेलेत?

**जयंत पाटील :-**

त्या शिक्षण अधिकाऱ्याला फक्त बदल्या करण्यात जास्त इंटरेस्ट आहे. या शिक्षण अधिकाऱ्याला ह्या शिक्षिकेची बदली इकडे करायची की तिकडे आणि पैसे गोळा करायचे यासाठी ते आपल्याकडे आलेले आहेत. बदली करु नये असे सभापती महोदय त्यांना सांगत आहेत, त्यांना विनंती करत आहेत. तरी ते सभापती महोदयांचे ऐकायला तयार नाहीत. सभेच्या सभापतींना आणि संचालकांच्या आधीन राहून त्यांच्या निर्देशाप्रमाणे बदली करायला पाहिजे. परंतु, त्यांचा निर्देश डावलून ते बदल्या करत आहेत. आपण सर्वांनी याची दखल घ्यायला पाहिजे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, आपल्या नियमानुसार त्यांना तुम्ही इथुन काढून टाका आणि प्रत्येक वेळेला प्रत्येक मिटींगला अशी चर्चा होत आहे. शिक्षण अधिकाऱ्याने हे काय लावले आहे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना जी काही आता शिक्षण अधिकाऱ्याच्या बाबतीत प्रश्न ऊपस्थित केलेले आहेत, त्या बाबतीमध्ये मी सुरुवातीलाच सांगितले की, शिक्षण अधिकारी आजपासून रजेवर गेलेले आहेत आणि रजेवर गेलेले आहेत हे तुम्हाला ५ मिनिटापूर्वी कळलेले आहे.

**रतन पाटील :-**

महापालिकेच्या कार्यकाळापासून त्यांना कायमचे रजेवर करा.

**मा. आयुक्त :-**

मला बोलू द्या. शिक्षण अधिकाऱ्यांच्या बाबतीमध्ये मा. ऊपमहापौरांनी आपल्या सभागृहास माहिती दिलेली आहे की, प्रशासनाने त्याच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही केलेली आहे. तर त्या प्रमाणे आपण शिक्षण संचालकांना कळविलेले होते की, आमच्याकडे इथे एक चांगला कार्यक्षम अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आपण त्यांना विनंती केलेली होती आणि जर समजा आपल्याकडून काही दिरंगाई झाली किंवा ह्याच्यामध्ये विलंब झाला तर आम्ही सुमोठेपणा कार्यमुक्त करु. अशा पध्दतीनेही आपण त्यांना कळविलेले आहे. या निमित्ताने मी आपल्याला सांगु इच्छितो की, एकंदरीत सभागृहाच्या ज्या शिक्षण अधिकाऱ्याच्या बाबतीमध्ये ज्या काही भावना आहेत त्या तीव्र भावनांचा विचार करुन सभागृहाचा मान ठेवून मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, आजपासून शिक्षण अधिकारी रजेवर गेलेले आहेत. तर त्यांना मी आजपासूनच कार्यमुक्त करत आहे अशी मी सभागृहाला माहिती देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा जो विषय आहे तर सन २००३ ला मी हा विषय मा. महासभेत दिला होता. त्याच्यामध्ये हेतु असा होता की, त्या दिवशी मी प्रत्यक्ष काही शाळेमध्ये फिरायला गेलो त्यावेळी मी त्या ठिकाणची जी व्यवस्था बघितली आणि त्या व्यवस्थेमध्ये शाळेतील मुले जे विद्यार्थी आहेत ते झाडू मारतात. शुध्द पाणी नाही. हे सर्व समजून मी हा प्रश्न दिला होता. आज दुर्देवाची बाब आहे की, शिक्षण अधिकारी नाही. तरी मा. आयुक्त साहेबांना मी दोन चार गोष्टींवर लक्ष घालण्यास सांगणार आहे. साहेब, आता आपण सांगितले की, २९ शाळेत जर बघितले तर कोणकोणती शाळा म्हणजे मिडियम हिंदी, गुजराती, मराठी जर आपण बघा. किती मराठी मिडियमची शाळा आहे? किती हिंदी व ऊर्दु मिडियमच्या शाळा आहेत? आणि किती गुजराथी मिडियमच्या शाळा आहेत?

**मा. आयुक्त :-**

आपल्याला जे ऊत्तर दिलेले आहे त्या ऊत्तराच्या सोबत एक तक्ता जोडलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तक्ता आहे. म्हणजे त्यामध्ये छाटणी केली. मिरा भाईंदरची लोकसंख्या वस्तीप्रमाणे हा विषय नगरपालिकेपासून बघतो. विद्यार्थ्यांची संख्या कमी होत नाही. शाळेची संख्या वाढत नाही. म्हणजे त्याचे कारण काय आहे? ते आपल्याला शोधण्यास आम्ही सांगत आहोत. ह्या ज्या २९ शाळा आपण दिल्या त्या २९ शाळा कोणकोणत्या मिडियमच्या आहेत. म्हणजे हिंदी, गुजराती, मराठी आणि ऊर्दु त्याची संख्या आपण बघा.

**गोविंद परब :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. मिरा भाईंदरच्या एकंदरीत २९ शाळांमध्ये मराठी शाळा २० आहेत आणि ऊर्दु शाळा २ आहेत, गुजराती शाळा ५ आहेत आणि हिंदी शाळा ३ आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हिंदी शाळा २ आहेत.

**गोविंद परब :-**

सन २००३ च्या शाळा आहेत. आता ३१ शाळा झालेल्या आहेत. व २ शाळा वाढलेल्या आहेत. ऊर्दु आणि हिंदी शाळा वाढलेल्या आहेत. असे आता ३१ शाळा आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आता जर मिडीयमची संख्या बघितली तर मराठी मिडीयमची २० शाळा, ऊर्दुची २ शाळा, गुजरातीच्या ५ शाळा आणि हिंदीच्या २ शाळा म्हणजे आज आपण या शहराची लोकसंख्या बघितली तर या शहरामध्ये ६० ते ७० टक्के हिंदी आणि गुजराती भाषिक या शहरामध्ये आहेत. आणि शासनाचा नियम आहे की, सर्वांनी शिक्षण घ्यावे, सर्वांनी साक्षर व्हावे पण आपल्या अधिकाऱ्यांनी नगरपालिकेच्या काळापासून ते आतापर्यंत या शहराची लोकसंख्या कुठे वाढलेली आहे? कुठल्या पध्दतीची वाढलेली आहे? या महानगरपालिकेला कुठल्या शाळेची गरज आहे? त्या सर्वांना कोणत्या शाळेची गरज आहे याच्यावर कुठेही गांभीर्याने बघितलेले नाही. आज हिंदी शाळा फक्त २ आहेत. आपण तक्त्यामध्ये बघा. हिंदी शाळा २ आहेत. आणि हिंदी भाषिक तर ह्या शहरामध्ये बघितले तर ५० टक्के हिंदी भाषिक आहेत. प्रशासनाला हा जो प्रश्न दिला आहे त्याच्यामागे हा हेतु आहे की, प्रशासनाने या विषयावर गांभीर्याने विचार करावा की, आम्ही कुठे आहोत. महानगरपालिका या शिक्षणाच्या स्तरावर कुठे चाललेली आहे. पण त्यांनी फक्त ऊत्तर देण्याचे काम केले म्हणजे आमची ड्युटी संपलेली आहे. शिक्षण घेतात की नाही घेतात. तिथे जाण्याची गरज आहे की नाही? घेतात तिथे जाण्याची गरज आहे की नाही ह्याची दखल घेतली जात नाही म्हणून माझा आपल्याला हा प्रश्न आहे. या संदर्भामध्ये भविष्यकाळामध्ये आपण या शहराच्या लोकसंख्येच्या, वस्तीच्या अनुषंगाने काही पावले अचलणार आहात की ऊचलली आहेत? याच्याबाबतीत माझा ऊपप्रश्न आहे.

**गोविंद परब :-**

शिक्षकांनी तामीळ शाळेचा भाईंदर पश्चिमला सर्व्हे केलेला आहे. तामिळ विद्यार्थी जवळजवळ ४६ इतके या सर्व्हेमध्ये मिळाले आहेत. तामिळ शाळा बहुतांश पुढच्या वर्षी आम्ही प्रशासनातर्फे प्रस्ताव पाठवू. भविष्यात भाईंदर पश्चिमेमध्ये तामिळ शाळेचा एक वर्ग सुरु होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे असे म्हणणे आहे की आपण मागच्या नगरपालिकेच्या काळापासून संख्या बघितली ८७३० याच्यामध्ये दहा पाच मागे पुढ आहेत. म्हणजे शाळा पण तशीच आहे. तुम्ही एक वाढवली आहे. आम्हाला माहित नाही की आपण २००३ सालची यादी दिली. माझा असा प्रश्न आहे की, शासनाची या नंतर आज हा प्रश्न आल्यानंतर ही भुमिका घेणार आहे का? या शहरामध्ये लोकसंखेच्या दृष्टीने हिंदी शाळेची इथे गरज आहे. म्हणून आम्ही शासनाला आम्ही २,४,५,६ हिंदी माध्यमांची, गुजराती माध्यमांची शाळा काढण्यासाठी आम्ही प्रस्तावित करणार आहोत. असे मला आपल्याकडून ऊत्तर पाहिजे. तर जे आहे ते बरोबर आहे. आम्ही नियमाप्रमाणे आणखीन शाळा वाढवू शकत नाही किंवा शासन देत नाही असे मला ऊत्तर पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी चांगला प्रश्न विचारलेला आहे. मागच्या प्रश्नाचे समाधानकारक ऊत्तर दिलेले आहे. त्याचा त्यांनी पुन्हा ऊल्लेख केला नाही. समाधान कोणते झाले? कारण जी ऊत्तरे दिलेली आहेत तशी ऊत्तरे तिथे ही दिलेली आहे. त्या प्रश्नामध्ये तशी ऊत्तरे दिली आहेत म्हणजे आतासुध्दा आपण जो प्रश्न विचारला आहे तर ते ऊपप्रश्न विचारत आहेत. दुसरा विषय असा आहे की, सन्मा. सभापती महोदय आल्यानंतर शिक्षण मंडळ स्थापन झाल्यानंतर एक ऊर्दु शाळा आणि एक हिंदी शाळा अशा दोन शाळा शिक्षण मंडळाने वाढवल्या त्याबद्दल मी सन्मा. सभापती यांचे या ठिकाणी हार्दिक अभिनंदन करतो की, ऊर्दु आणि हिंदी अशा दोन शाळा वाढविल्या आहेत. म्हणजेच सन्मा. सदस्य अग्रवालजींनी जी परिस्थिती सांगितली त्याचा आढावा घेऊन त्यांनी ह्या ठिकाणी दोन शाळा वाढविलेल्या आहेत. ह्याच्यापुढेही अशा वाढ होत राहतील. परंतु, शिक्षणाच्या बाबतीत सांगितल्यानंतर किती लोक त्या प्राथमिक शाळेत जातात हा महत्वाचा भाग आहे. हिंदी भाषिक आज त्यांच्या माहितीप्रमाणे ५० टक्यापेक्षा जास्त आहेत. ५० टक्के ते कमी बोलत आहेत. त्यापेक्षा जास्त या शहरामध्ये हिंदी भाषिक आहेत. तरीसुध्दा हिंदी भाषिक शाळा ज्या असायला पाहिजेत, खाजगी संस्थांकडून. तेवढ्या खाजगी संस्था तेवढ्या

हिंदी शाळा नाहीत. परंतु, या शहरामध्ये इंग्रजी माध्यमांच्या ज्या शाळा आहेत ज्यांचे अतिशय जास्त प्रमाणे आहे. म्हणजे इथे तेवढी इंग्रजी भाषिक लोक नाहीत. परंतु, इंग्रजी भाषा शिकली पाहिजे कारण इग्रजी भाषा विकासाची भाषा आहे असे समजुन त्या भाषेचा जास्त लोक वापर करतात. म्हणून खाजगी शाळामध्ये जी शाळा काढायची ती खाजगी शाळा आहे ती इंग्लीशमध्ये काढतात. म्हणून त्या इंग्रजी शाळा वाढलेल्या आहेत आणि हिंदी भाषिक शाळा खाजगी शाळासुध्दा काढत नाहीत. त्यांनी प्रश्न विचारला त्यांनी त्याला ऊपप्रश्न विचारला केला की, अशा हिंदी किती शाळा वाढल्या पाहिजेत हा प्रश्न केला नाही. त्यांनी ओरली फक्त प्रश्न विचारलेला आहे. आणि ओरली ऊत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. त्याच्या मताशी कोणी सहमत नाही असा विचार नाही. त्याच्यामताशी सर्व सहमत आहेत पण ज्यांनी प्रशासनाचे जे प्रश्न विचारले त्यांचे ऊत्तर आपण मागितले पाहिजे. बाकी ऊत्तर म्हणजे जेवढ्या शाळा आहेत ज्यांना स्टेज दिले आहेत म्हणून ह्या वाढत्या काळामध्ये या सभापतींनी दोन शाळा वाढवल्या त्या बद्दल प्रामुख्याने माझा सांगायचा ऊद्देश आहे की हिंदी आणि ऊर्दु दोन शाळा वाढविल्या त्याबद्दल मी यांचे हार्दिक अभिनंदन करतो. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ऊत्तर दिलेले आहे. ऊत्तर कोणी द्यायचं आणि बोलायचं आणि कोणी ऐकायचं............

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपल्याला मी ऊत्तर दिलेले नाही. मी प्रशासनाच्या बरोबर मा महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. तुम्हाला ऊत्तर देणारा मी कोण? आणि तुम्ही आमचे ऊत्तर ऐकणारे कोण? काहीतरी दिशाभूल करता? तुम्हाला आम्ही ऊत्तर दिले का? काही तरी बोलायच म्हणून बोलता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण अभिनंदन केले आहे.

**मोहन पाटील :-**

मी आपले अभिनंदन केले नाही. मी येथे सभापतींचे अभिनंदन केले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे अभिनंदनाचे पात्र आहे हे अधिकाऱ्यांना सांगितले असते त्यांनी २००३ सालाची यादी दिली आणि स्वतःचे हात वर केले. म्हणजे एक तर शिक्षण मंडळानी त्यांना कळविले नाही. जे कार्य केले त्याबद्दल त्यांनी क्रेडीट घ्यायला पाहिजे. शिक्षण मंडळाने कळविले नाही. म्हणून अधिकाऱ्यांना माहिती पडले नाही म्हणून आपल्याला ही गोष्ट सांगण्याची पाळी आली. ही दुर्देवी गोष्ट सांगितली पाहिजे किंवा इथले शिक्षण मंडळाचे सभापती आहेत. त्यांनी सांगितले पाहिजे. ती गोष्ट न सांगता अन्य सदस्य सांगतात ही दुर्देवाची बाब आहे.

**मोहन पाटील :-**

दुर्देवाची बाब नाही. आदरणीय महापौर मॅडम, क्रेडीटचा प्रश्न आला तर क्रेडीट कोणी घ्यायचे असते. तर ते विरोधी पक्षाने क्रेडीट घ्यायचे असते. आम्ही चांगले केले तरी तुम्ही आमच्या पाठीवर फटके मारणार. खराब झाले तरी तुम्ही आमच्या पाठीवर फटके मारणार. येथे क्रेडीटचा प्रश्न आलाच नाही. काका काय बोलतात ते बोला. ते तुमचे काम आहे. क्रेडीट तुम्हाला पाहिजे ना. विरोधी पक्ष म्हणून तुम्हाला क्रेडीट दिले पाहिजे. तुम्हाला क्रेडीट मिळाले पाहिजे. म्हणून आपण प्रयत्न करा. आम्ही क्रेडीटचा प्रश्न मांडायचा नाही. आम्ही येथे क्रेडीट विषयी काही बोललो का? आम्हाला बोलायची काय आवश्यकता आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अभिनंदन जरी यादीमध्ये दिले असते. म्हणजे हा अधिकारी वर्ग जे ऊत्तर देत आहे त्याचा तुम्ही विचार करा एवढी तीव्र भावना या शिक्षण विषयावर आहे म्हणजे इकडच्या अधिकाऱ्याची आपण बदली करतो हे सर्व घडुन सभागृहामध्ये आणत आहोत. सभागृहात या आयुक्त साहेब त्याला निवृत्त करतात आणि ज्या चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत. त्याची माहिती देत नाही. हे बरोबर आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल आपला प्रश्न संपलेला आहे. प्रश्नाला ऊपप्रश्न विचारु नका जे अपेक्षित आहे तेच विचारा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ऊपप्रश्न विचारायचाच आहे. ऊपप्रश्न का विचारायचा नाही? प्रश्नासाठी ऊपप्रश्न दिले जातात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जे आपल्याला अपेक्षित आहेत तेच विचारा. सभागृहाची दिशाभूल करु नका आणि दुसऱ्या सदस्याला बोलण्यासाठी प्रोत्साहीत करु नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहाची दिशाभूल मी करत नाही. मधे कोणी तरी काही तरी बोलून अभिनंदनाचा ठराव मांडणार असेल तर मी अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आम्हालाही या विषयावर बोलायचे आहे. आम्हालाही बोलायला संधी मिळाली पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे पिठासिन अधिकारी आहेत. कोणीही सदस्य दिशाभूल करत नाही. ते ऐकायची आपली क्षमता पाहिजे. आणि दिशाभूल काय केलेली आहे. वास्तविक आहे ते आहे. सन २००३ चा प्रश्न आपण आता देता. सन २००३ च्या भाषेचे ऊत्तर आता देता. जग कुठे चालले आहे. तुम्ही कुठे चालले आहे? त्याचेही तुम्हाला भान ठेवले पाहिजे. प्रश्न ऊत्तर देते वेळी आपण गांभीर्याने ऊत्तर दिले पाहिजे? कोणत्या बुध्दीच काम करता?

**मा. महापौर :-**

जे विचारलेले प्रश्न आहेत. त्याची ऊत्तर दिलेली आहेत आणि त्याच्यामध्ये पूर्ण समाधान झाले आहे. परंतु, विनाकारण सभागृहाचा दोन-चार महिन्यापासून सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी वेळ घालवित आहात. इथे दुसरे सदस्य सभागृहात नाहीत का? त्यांना वेळ नको का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आहेत ना. मी कुठे नाही बोलतो. मी कोणालाही अडवलेले नाही. प्रश्नोत्तराची एक सभा ठेवा.

**लिओ कोलासो :-**

आम्हालाही ह्यामध्ये स्टेटमेन्ट द्यायचे आहे. आम्हालाही बोलायची संधी द्या. मा. महापौर मॅडम, आम्हालाही याच्यामध्ये सुचना मांडायची आहे. आम्हालाही मिळाली पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

ही परिस्थिती का आली. आपण प्रश्नाला ऊपप्रश्न विचारले म्हणून ही परिसिथती आली ना. आपल्या प्रश्नाला ऊत्तर दिल्यानंतर ही चर्चा झाली ती योग्य आहे. आपण ऊपप्रश्नाच्या अर्जामध्ये अनेक प्रश्न विचारणार तर इतर सदस्यांचे प्रश्न येथे कसे काय येतील?

**लिओ कोलासो :-**

हा शिक्षणा संबंधित प्रश्न असल्यामुळे आम्हालाही ह्या विषयावर बोलण्याची संधी द्यावी. अशी मा. महापौरांकडे माझी विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा पुढचा असा प्रश्न आहे की, साहेब, एक शिक्षक हिंदी आणि ऊर्दु शाळेचा आहे. ३१ सफाई कामगार या शाळेमध्ये आहे. मा. महापौर मॅडम, २९ शाळा आहेत त्यात ३१ सफाई कामगार आहेत. आता शिक्षण अधिकारी नाही. मी स्वतः त्या शाळेमध्ये गेलो असताना ते सफाई कामगार तिकडे शिपाईचे काम करतात. म्हणून सफाई वेळेवर होत नाही. हे मी पत्राद्वारे कळविले आहे. त्यांनतर त्याच्यात दोन-चार कामगार वाढवलेले आहेत. काही शाळांमध्ये दोन पाळी आहेत. सकाळची आणि दुपारची आणि २९ शाळांमध्ये ३१ सफाई कामगार आणि एका शाळेमध्ये किमान १५ ते २० वर्ग आहेत सकाळी ७.०० ला शाळा सुरु होते. ३१ कामगार हे परिपूर्ण आहेत का? अधिकाऱ्यांनी याची कधी दखल घेतली आहे का? एक हिंदी शाळा १८ नंबर, १९ नंबर, २० नंबर गुजराती, हिंदी, मराठी शाळा आहेत. ती तीन-चार मजल्याची शाळा आहे. त्यामध्ये सफाई कामगार संपूर्ण दिवस वर्ग साफसफाई करतील तरी ते साफ करु शकणार नाहीत. मी जो विषय मांडलेला आहे. साहेब, त्याच ऊत्तर देण्यापूर्वी त्यांनी तिथे प्रत्यक्ष जाऊन पाहणी केलेली नाही. फक्त ऊत्तर देणे फार सोपे आहे. ३१ कामगार आहेत पण ३१ कामगार हे शिपाईचे काम करतात की सफाई कामगारांचे काम करतात. हे बघण्याच काम शिक्षण अधिकाऱ्यांचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी सभागृहात आता ऊपस्थित केलेला जो शाळेच्या स्वच्छतेच्या बाबतीमध्ये प्रश्न आहे. तर प्रत्येक शाळेमध्ये शिपाई असावेत हा जो आपण प्रस्ताव सादर केलेला आहे. तर माझ्या माहिती प्रमाणे आतापर्यंत माझ्याकडे वैयक्तिक असे कुठल्याही शिक्षकाने अशी तक्रार केलेली नाही की, आमच्याकडे शाळेमध्ये अस्वच्छता असते. अशाप्रकारची तक्रार माझ्याकडे आलेली नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जरा थांबा. तरीसुध्दा आपण सन्मा. सदस्यांनी जे काही स्वच्छतेच्या बाबतीमध्ये मुद्दे ऊपस्थित केलेले आहेत त्याची आपण तिथे जाऊन खात्री करुन जर समजा त्या ठिकाणी अस्वच्छता असेल तर ती त्वरीत दुर करण्यात येईल आणि आपण जी मागणी केली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक शाळेमध्ये शिपाई देणे आवश्यक आहे. त्या बाबतीतला जो काही अहवाल आहे किंवा जी काही माहिती आहे ती संबंधित शिक्षण विभागाकडून मागवून घेऊन त्यावर कार्यवाही करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. साहेब, सर्वात महत्वाचा विषय आहे तो म्हणजे पाण्याचा. प्रत्येक शाळेमध्ये पिण्याचे पाणी शुध्द आणि मुबलक असले पाहिजे. मी याची सुचनाही केली नंतर ॲक्वागार्डही महानगरपालिकेने तेथे लावला ही गोष्ट खरी आहे. ॲक्वागार्ड लावलेले आहेत. त्याचा अनुभव घेतल्यानंतर असे वाटते की, जेव्हा शाळा सुटते

आणि त्यावेळेस सर्व मुले एकदम बाहेर पडतात आणि ह्या ॲक्वागार्डची जी क्षमता आहे ती थोडी कमी आहे. मुलांना जेवढे शुध्द पाणी मिळाले पाहिजे, तेवढे शुध्द पाणी मिळत नाही. महानगरपालिकेत ॲक्वागार्ड लावले ही आनंदाची बाब आहे. लोकांना पाणी मिळावे त्यावेळी मी सुचना केली होती की, प्रत्येक शाळेला तुम्ही स्टीलच्या टाक्या द्या आणि शाळा सुटण्याचा आधी तिकडचा जो सफाई कामगार किंवा शिपाई आहे. त्या ॲक्वागार्डमधील पाण्याने ती टाकी भरुन घेणार आणि ते पाणी मुलांना पिण्यासाठी देणार. तशी व्यवस्था झालेली नाही. म्हणून प्रत्येक शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची अव्यवस्था आहे आणि पाण्यामुळे कोणते रोग होतात हे सांगण्याची गरज नाही. आज शहरात डेंग्युची रोगराई पसरलेली आहे. ते घरामध्ये होतात. शाळेमध्ये होत नाही का? आता १८, १९, २० नंबरची शाळा आहे. त्याच्यामध्ये जी पाण्याची टाकी आहे त्या शाळेत आपण जी पाण्याची टाकी बांधलेली आहे. तर माझ्या माहितीप्रमाणे ती कधीच साफ होत नाही. कारण ती जी शाळेतील टाकी आहे ती एक मजला सोडून वर बांधलेली आहे. त्याला जिना नाही. म्हणून माझे असे मत आहे की, माझा जो हेतु आहे, हा प्रश्न टाकायचा प्रशासनाने ऊत्तर न देता प्रत्यक्ष त्या जागेवर जाऊन त्याची जी या शाळेमध्ये कमी आहे त्याची छाणनी करुन अहवाल सादर करुन तो सभागृहापुढे विषय आणावा आणि शिक्षणच्या बाबतीमध्ये दर्जा ऊंचवावा आणि मुलांच्या आरोग्याचा विचार करावा, हा माझा ह्या विषयामध्ये हेतु होता. याची आपण दखल घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची दखल घेण्यात आलेली आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला या विषयावर सुचना करायची आहे, विनंती करायची आहे. आता ज्या शिक्षकांच्या बदलीबद्दल बोलले गेले. आपण मध्यवर्ती काळात शिक्षकांच्या बदल्या करत आहोत त्या करु नये. कारण विद्यार्थ्यांचा अर्धा पोर्शन झालेला आहे आणि त्या शिक्षकाशी त्या विद्यार्थ्याशी नाते जुळलेले असते आणि शिक्षक ज्या पध्दतीने शिकवतात त्या पध्दतीने आपण पुढचे शिक्षण मिळत असते म्हणून त्या शिक्षकांच्या बदल्या अर्ध्या काळात करु नये. अशी मी विनंती करतो. एप्रिल, मे मध्ये बदल्या कराव्यात, अर्ध्या काळात बदल्या करु नये अशी मी विनंती करतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. शिक्षण विषयक चर्चा होताना आणि मा. आयुक्तांनी आश्वासन देऊन पण, मी अगोदरच हात वर केला होता की, मला ही बोलण्याची संधी मिळावी म्हणून मी थोडक्यात बोलत आहे की, ज्या पध्दतीने आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये बहुभाषिक शाळा स्थापन करण्यात किंवा निर्माण कराव्यात चालू कराव्यात, चालवाव्यात अशा स्वरुपाची सभागृहाची भावना आहे ती स्तुती आहे. माझी या प्रकरणामध्ये अशी सुचना आहे की, महानगरपालिकेने मॉडेल स्कुल म्हणून इंग्रजी माध्यमासाठी एखादी शाळा मॉडेल इग्लीश स्कुल म्हणून आपण हा ही प्रयोग करावा अशी आपल्यांना विनंती करीत आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने प्रश्न ५८ सन्मा. सदस्य मदन ऊदिनारायण सिंग यांचा प्रश्न आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे कारण शाळेच्या विषय निघाला आहे. महानगरपालिकेची आपल्याकडे शाळा आहे. आम्हाला नगरसेवक म्हणून १५ वर्षे झाले. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेबांनी सांगितले स्वच्छता नाही, टाकी साफ होत नाही. हे होत नाही, ते होत नाही. ते सर्व मान्य आहे. ठिक आहे. कुठे ना कुठे काही तरी कमी जास्त होत असेल. परंतु, महत्वाचा मुद्दा महानगरपालिकेची एकून २९ शाळेमध्ये किती मुलांची वाढ झाली. दर वर्षी किती ॲडमिशन होतात. तिकडचा आभ्यास जो शिक्षक वर्ग घेत असतात त्याचे स्तर काय? आणि तिथे फक्त गरीब लोक जातात. मध्यम वर्गीय, चांगली लोक यांची मुले जात नाहीत. त्याचे कारण काय? त्याचा शोध काय? आणि सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी जो इकडे प्रस्ताव मांडला की, एक इंग्रजी माध्यमाची शाळेचा प्रस्ताव पाठवून ते सुरु करायला पाहिजे. कारण बी.एम.सी. मध्ये दादर येथे महानगरपालिकेची इंग्रजी माध्यमाची शाळा किती वर्षे चालवित आहे. तसा आपण प्रयत्न करायला पाहिजे आणि महत्वाचा मुद्दा म्हणून आपल्या महानगरपालिकेचा अभ्यासाचा स्तर कसा वाढवणार त्याच्यावर लक्ष देणे महत्वाचे आहे. बाकी इतर ज्या गोष्टी आहेंत, आरोग्याची ह्याची त्याची हे सर्व नंतर येते. पण पहिले तिथे अभ्यासच चांगला होत नाही. तर ॲडमिशन होणार नाही. ह्या १५ वर्षात ॲडमिशची किती टक्के वाढ झाली? त्याचा आकडा आपण जर बघितला असेल तर १५ वर्षात ॲडमिशन वाढले की, कमी झाले? तुमच्या आकड्यावरुन बरोबर समजले की, अभ्यासाचे स्तर केवढे थांबले आहे किंवा कसे राहिले आहे आणि सेकंड थिंग की, बी.एम.सी. ने सध्या मागे जे प्रायव्हेट जी कार्पोरेशनची शाळा आहे. त्यांना प्रायव्हेट शाळा चालविणारा आहे, त्याना ॲडोपशन केले आहे त्यांना दिलेले आहे. त्यावरही विचार करावा अशी माझी सुचना आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या २९ शाळा आहेत. त्या १ ली ते ७ वी पर्यंत आहेत.

**मा. महापौर :-**

वेळ संपलेली आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील आपल्याला परमिशन दिलेली नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. फक्त दोन मिनिटं द्या. हा शिक्षणाचा विषय आहे आता निघाला आहे म्हणून मी बोलत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य वेळ संपलेली आहे.

**रतन पाटील :-**

वेळ संपलेली आहे तर संपु द्या. तरीसुध्दा माझी सुचना मांडून घ्या. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये ज्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या २९ शाळा आहेत आणि ज्या आतापर्यंत म्हणजे ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका ज्या पहिली ते सातवी पर्यंतच्या ज्या शाळा आहेत तिथे आपण पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण देतो. वेळोवेळी सभागृहामध्ये हा प्रश्न ऊपस्थित झालेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा माध्यमिक पहिली ते दहावी पर्यंत नगरपालिकेच्या शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण देण्यांत यावे. अशी मिटींगमध्ये बऱ्याचवेळा चर्चा झालेली आहे. माझी विनंती आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ झालेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आपली पहिली ते दहावी पर्यंत शाळा व्हायला पाहिजे अशी मी सुचना करतो आणि त्या पध्दतीने येत्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये तशी तरतुद करावी.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ५८ श्री. मदन ऊदितनारायण सिंग यांचा आहे. ते सभेस गैरहजर आहेत.

**रिटा शाह :-**

सचिवजी आपण हे सांगा की, आपण प्रश्न क्र. ५२ चा विषय ह्याच्यात प्रश्न क्र. ५३ चा विषय नाही.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ५३ चा विषय मागच्यावेळेस झाला होता.

**रिटा शाह :-**

म्हणजे प्रश्न क्र. ५२ अजुन पेन्डीग आहे का?

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ५२ क्लिअर झाला.

**रिटा शाह :-**

५२ चा प्रश्न झाला.

**नगरसचिव :-**

होय. प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. प्रश्न क्र. ६० ओमप्रकाश अग्रवाल यांचा आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला सांगितले की, वेळ संपलेली आहे.

**नगरसचिव :-**

सदरचा प्रश्न पुढच्या सभेत घेण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपण परवानगी देत असाल तर मला सुचना करायची आहे टॅक्स विषयावर फक्त दोन मिनिटे घेणार. जेणेकरुन महानगरपालिकेचा बराचसा वेळ वाचणार आहे आणि लोकांना सुविधा होणार आहे. दोन मिनिटाची परवानगी पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महपौर मॅडम, विषय पत्रिकेवर विषय नाही.

**नरेंद्र मेहता :-**

महत्वाची एक सुचना मांडायची आहे. आपण फक्त दोन मिनिटे परवानगी द्यावी अशी विनंती आहे. सर्वप्रथम गेल्यावेळी जो आपण टॅक्सचा ठराव केला होता की, १ टक्के पासुन ५ टक्के पर्यंत सुट द्यायचा ठराव केला होता. त्याबद्दल मी प्रशासनाचा आणि सभागृहाचे धन्यवाद आणि आभार मानतो आणि अभिनंदन करतो. मॅडम, आपण टॅक्सची सुट दिलेली आहे पण गेल्यावेळीसुध्दा मी सांगितले होते की आपली बिल ३० ऑगस्ट पर्यंत पाठवणार होतो. पण ती बिलं काही कारणाने अजुनही गेलेली नाही. बरेचसे ॲज पर मायनल माझ्या माहितीप्रमाणे ५० टक्के बिलच गेली आहेत आणि ५० टक्के बिलं जायची बाकी आहेत आणि हा लॅप्स ह्यासाठी झाली की कारण आपल्या कॉम्प्युटरला जो रेकॉर्ड आहे तो अपडेट नाही आणि आता एखादा माणूस २००/- रुपयाचे बिल भरायला येतो तो अर्धा दिवस इथे वेळ घालवतो. त्यानंतर त्याला कळते की, १०/- रुपये सुट मिळाली आहे. त्याला नंतर माहित पडते की आपण १०/- रुपयासाठी पूर्ण दिवस घालवलेला आहे.मा. आयुक्त साहेब, मॅडम जर आपण परवानगी दिली तर एक कॉम्प्युटर मशीन आहे. ह्याच्यामध्ये एवढी सुविधा आहे की आपल्या कॅम्प्युटरमधील जो डेटा आहे तो ह्यामध्ये अपडेट करु शकतो. ज्यावेळी आपण टॅक्स

भरायला जातो तर त्या नंबरमध्ये आपण त्या कस्टमरचा त्यात टॅक्सचा नंबर असेल तर किंवा नाव असेल तर जे आपण फंक्शन दाबले तर त्याचे नाव हायलाईट होईल आणि त्याची जी काही रक्कम आहे समजा त्यांनी ३००/- रुपये भरले तर त्याला लगेचच जागेवर ३००/- रुपये डोअर टु डोअर रिसीट देता येईल. अशी ही कम्प्युटरची मशीन आहे. आता जी आपली प्रॅक्टीस आहे ते आपण काय करतो जनरली कार्यरत मॅन्युअली रिसिट फाडतो. संध्याकाळी आपला जो माणूस कॅलक्युलेशन करतो बऱ्याच वेळेला त्याच्याकडुन मिस्टेक होतात. संध्याकाळपर्यंत कॅलक्युलेशन करतो. त्यानंतर आपण ते पैसे हेड ऑफीसमध्ये आणून जमा करतो. परत घेणारा अधिकारी ते कॅलक्युलेशन करतो की, ते पैसे बरोबर आहेंत की नाही. त्यामुळे बराचसा वेळ वाया जातो. त्यानंतर पुन्हा आपल्याला कम्प्युटरला इफेक्ट द्यायचा असतो. म्हणजे एका दिवसाच्या कामाला १० दिवस जातात तर मशिनद्वारे आपण जागेवर पैसे घेतल्या नंतर समजा एखादी कार्यालयात ठेवली. १०० लोकांचे पैसे घेतले ३०० रुपये किंवा ५०० रुपये जे काही त्यांनतर संध्याकाळी त्या माणसाने क्लर्कने बटन दाबल्यावर त्याला लगेच कळेल की, आज मी १० हजार रुपये जमा केले आहेत आणि ज्यावेळी तो हेड ऑफिसला घेऊन येणार त्यावेळी याचा दुसरा कोड असतो. व त्याने तो कोड दाबल्यावर त्याला पटकन एक नंबर मिळेल की, नरेंद्र मेहतांनी २०० रुपये, वैती साहेबांनी २०० रुपये अशी डिटेल येईल आणि त्यांनतर जमा करायची काही गरज नाही. ह्याला आपण कॉम्प्युटरमध्ये अटेज केले तर १० मिनिटात सर्व रेकॉर्ड ह्या संगणकामध्ये अपडेट होऊन जाईल. म्हणजे दुसऱ्या दिवशी तुम्ही विचारले की, पैसे भरले गेले की नाही? तर कम्प्युटरमध्ये ती डिटेल आपल्याला ताबडतोब मिळेल आणि त्यानंतर हे सर्व कलेक्शन झाल्यानंतर पुढच्या वर्षी आपल्याला बिल पाठवायची असतील तर आपण ती बिले कधीही काढू शकतो. आज भरले ऊद्या ती बिले काढायला सांगितली तरी आपण ती बिलं देऊ शकतो आणि या मशिनला जास्त कॉस्ट नाही. या मशिनची हाडली किंमत १५ हजार आहे आणि याच्या सॉफ्टवेअरची किंमत ५० हजार रुपये आहे आणि हे आपण डोअर टू डोअरसुध्दा घेऊन जाऊ शकतो. मार्च महिन्यामध्ये एकदम भयंकर हालत होते. आपण दहा-दहा रिसिट बुक घेतो. एक ह्या बिल्डींगमध्ये तर एक त्या बिल्डींगमध्ये. त्यापेक्षा ही मशिन घेतली तर १० दिवसाचे काम एका दिवसात होईल आणि पुढचं जे काही आहे ते अपल्याला पटकन बिले देता येईल. अशी मी सुचना करतो. ह्यावर जरा विचार करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जी काही सुचना केलेली आहे आणि ह्या मशिनच्या बाबतीत सभागृहास जी काही माहिती दिलेली आहेत्यांना मी विनंती करेन की ती मशिन पुरवठादार किंवा जे कोणी असतील त्यांच्यासह त्याचे टेक्नीकल जे एक्सपर्ट असतील तर त्यांना जर आपल्याकडे बोलावले आणि त्या मशिनचा वापर आपल्या हद्दीमध्ये किंवा शहरामध्ये चांगल्याप्रकारे होत असेल अशी जर आपली धारणा झाली तर आपण ते ताबडतोब कार्यान्वित करु. आपल्याला विनंती करण्यांत येते की, याबाबतचे जे कोणी पुरवठादार असतील तर त्यांना जर माझ्या दालनामध्ये आणले तर आपण त्यांच्याशी चर्चा करुन हा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवू या.

**जयंत पाटील :-**

मॅडम, आजच्या विषय पत्रिकेवर साधारण ६९ विषय आहेत. ६९ अनुक्रमे नंबर आणि या सर्व विषयामध्ये सगळ्यात ज्वलंत जर कुठला विषय असेल तर तो घनकचरा निर्मुलन प्रकल्प आणि महत्वाचा हा विषय असुनसुध्दा आपण तो ६९ क्रमांकावर घेतलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे. मुंबई महाराष्ट्र नगरपालिका, परिषदा औद्योगिक अधिनियम १९६२ च्या ८१ च्या नुसार त्याच्या क्रम आपण वाढवावा. इतिवृत्तांत झाल्यानंतर तो विषय आपण चर्चेला घ्यावा. अतिशय महत्वाचा विषय आहे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. आपल्याला डम्प करायलाही जागा नाही. असे असताना आपण तो विषय ६९ क्रमांकावर घेतलेला आहे. तर तो विषय पुढे घ्यावा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जी सुचना मांडलेली आहे ती अतिशय रास्त आहे याची आपण देखल घेतली पाहिजे व हा विषय इतिवृत्तातानंतर घेण्यात यावा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. मा. आयुक्त साहेब हा जो घनकचऱ्याचा जो प्रश्न आहे. हा विषय पुढे यायला सभागृहातही कोणीही नाही म्हणणार नाही. म्हणून हा जो ६९ क्रमांक दिलेला आहे तो चुकीचा असून त्याला आपण पहिली चालना द्या. घनकचरा विषय आहे त्याचा प्रश्न आपण पहिल्यांदा सोडवा.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी लक्षवेधी आलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधीच्या आधी मी मा. महापौरांना विनंती करतो की, टॅक्स बद्दल जी सन्मा. सदस्य नरेंद्र मेहतांनी जी सुचना केली लोकांच्या सोईच्या दृष्टीने काय करणे योग्य आहे. मी मा. आयुक्तांना एक माहिती विचारु इच्छितो की, ह्या रचनेबद्दल आपण आदेश काढल्यानंतर कामकाज सुरू झाल्यानंतर जो काही लोकांना

त्रास झाला तो आम्ही दोन दिवसात लेखी दाखविला आहे. त्याच्यावर तुमच्याकडून आमच्याकडे कोणतीही प्रतिक्रिया किंवा कोणतेही ऊत्तर आलेले नाही. आपण स्वतः मला सांगितले होते की, शनिवारी बघू या किंवा सोमवारी बघू या. आज लोकांना जी ५४० रुपयाची घरपट्टी पावती दिली असेल तर त्याच्यावर २० रुपये परत मिळतात. त्या एखाद्या कर धारकाने ५४० रुपयाचा चेक दिला तर तुम्हाला त्यांने चेकने केलेलं पेमेंट तुम्हाला २० रुपयासाठी चेक द्यायला लागेल. म्हणजे आपण महानगरपालिकेचा फायदा करतो, कर धारकाचा फायदा करत आहे. की, अधिकाऱ्यांना त्रास देत आहोत ह्याचे तुमच्याकडे कोणतेही ऊत्तर नाही. २० रुपयाचा चेक देणे हे किती फायदेशीर ठरेल हे तुम्ही ऊत्तर द्यावे आणि ज्यांना गरज आहे. जे कॅशने पेमेंट करतात तर कॅश पेमेंट केल्यानंतर पेमेंट करणारा माणूस तो जो करधारक आहे तो नाही. मग तुम्ही कोणाची सही घेता हे जे पेमेंट करणार आहेत ते पेमेंट तुमचे नक्की महानगरपालिकेच्या कायद्यानुसार आहे की, बेकायदेशीर आहे. याला जबाबदार कोण राहणार आहे? ज्या एका कर धारकाला तुम्ही ५०० रुपये किंवा १००० रुपये रिबिट म्हणून दिले तर त्याच्यावर त्या कर धारकांची सही नाही. करधारकाची सही नसल्यामुळे आपण बेकायदेशीररित्या एखाद्या व्यक्तीच्या हातात महानगरपालिकेचा आपण १ रुपया तरी देऊ शकतो का? आज जे काऊंटरवर चाललेले आहेत तो करधारक कॅश भरायला येत नाही. त्याचा शिपाई येतो, त्याचा क्लार्क येतो किंवा त्याचा शेजारी येतो आणि पैसे भरुन जातो. फॉर्म जो भरतो त्या फॉर्मवर रोहिदास शंकर पाटील ह्यांची सही नाही. फॉर्मवर दुसऱ्याची सही असताना आपण त्याला रिबिट करतो हे नियमात आहे की, नियम बाह्य आहे. ह्या दोन गोष्टीचा खुलासा करावा. ५ टक्के सवलतीचे लोकांनी स्वागत केलं आहे. महानगरपालिकेसाठी कॅश मिळत आहे हे चांगलं आहे. पण महानगरपालिकेचा जो ठराव झाला त्या दिवशी आपण चर्चा करुन त्याची रिसीट कोणती देणार नगरसेवक सन्मा. सदस्य नरेंद्र मेहतांनी सांगितलेलं त्याच बरोबर मी चौकशी केली असता ज्या महानगरपालिकेने २ कोटी रुपये संगणकासाठी खर्च केले आहेत. असिस्टंट म्हणून १ लाख ८५ हजार रुपये आपण डोंबिवली महानगरपालिकेला देत आहोत त्या एजन्सीला आपण विश्वासात घेतलच नाही. नाही तरी त्यांनी ४८ तासात हा प्रोग्राम दिला असता की, जो माणूस कॅश पेमेंट करतोय तत्क्षणी त्याला पावती मिळाली असती आणि त्याच क्षणी त्याला पैसे भरावयास लागले असते हा प्रोग्राम आहे. ४८ तास अजूनही म्हणतोय त्यांना विश्वासात घ्या. त्यांच्याकडून प्रोग्राम घ्या. जे काही थोडं फार पेमेंट झालं असेल. आज आपण ४ पद्धतीने पेमेंट केलं त्याची मागील थकबाकी दिली होती. त्यांनाही डिस्काऊंट देऊन आपण पैसे घेतले. ज्यांनी चेक पेमेंट दिलं चेक पेमेंट नाही आपण डिस्काऊंट दिले म्हणजे ज्याचं आपल्याला कॅश झालचं नाही आपल्याकडे डिपॉझिट झालीच नाही त्याला आपण रिबिट परत केले. ह्या ज्या टेक्निकल काही अडचणी आहेत. त्या प्रेस्टिज इश्यू न करता लोकांच्या सोईचे आणि महानगरपालिकेच्या अधिकाराच्या नियमानुसार त्यांची वर्तणुक असावी म्हणून त्यांनाही कुठे अडचण नाही आली पाहिजे. आणि मग आपण जर सांगाल की, हा मा. महासभेचा ठराव होता. तर त्यात मा. महासभेचा काय दोष आहे. सिस्टम नीट होणे गरजेचे आहे. नाहीतर पुढे कधी ना कधी ऑडीट ऑब्जेक्शन घेईल. त्याला मा. महासभा जबाबदार राहण्याचा प्रश्न येत नाही. आपण एवढी सिस्टम केल्यानंतर आपण एवढा खर्च केल्यानंतर त्या संगणक प्रणाली वाल्याला आपण का विश्वासात घेतले नाही? ज्या दिवशी आपण हा एक मताचा ठराव केला होता त्या दिवशी तो कॉम्प्यूटर प्रिंट असणे गरजेचे होते. ही पावती या पद्धतीने मिळणार.

**परशूराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. साहेब, आपण जो मागच्या टाईमाला ठराव केला त्याची अंमलबजावणी त्वरीत चालू झाली आहे आणि त्याच पद्धतीने जी लोक जे नागरिक टॅक्स भरण्यासाठी जातात त्याच पद्धतीने त्याच टाईमाला टॅक्स भरला जातो. पण त्याचवेळेस तोच टॅक्स ५ टक्के प्रमाणे कमी केला जात नाही. चेक पेमेंट असेल तर एक वेगळी गोष्ट आहे. तेव्हा आपण त्यांचा अर्ज मागवतो असे आपले अधिकारी लोक म्हणतात की, तुम्ही अर्ज द्या. मग तुमचा ५ टक्के चा जो टॅक्स आहे तो मा. आयुक्ताच्या नावाने द्या मग तुमचा टॅक्स माफ केला जाईल. मग साहेब आपण जो ठराव केलेला आहे. तर त्या ठरावाच काहीच मिनिंग राहत नाही. म्हणून आपल्याला विनंती आहे की, त्यांना अर्ज न देता कॅश पेमेंटने असेल तर त्याचवेळेस त्यांना आपण ५ टक्के चेकने दिले तर ते लगेचच होणार नाही. तर त्याच पद्धतीने तो टॅक्स आपण ५ टक्के कट करुन त्यांना आपण ताबडतोब पावती दिली तर बरे होईल. अर्जाचं असेल तर मग आपण ठराव केला त्याला काही अर्थ नाही. ५ टक्के कमी केलं काय किंवा नाही केलं काय असे आपल्या प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे ऐकायला येते म्हणून हे ऐकायला न येण्याच्या अगोदरच आपणाला मी एवढेच सुचित करतो की, कॅश भरल्यानंतर ५ टक्के रक्कम ताबडतोब त्यांना पेड करण्यात यावी.

**रिटा शाह :-**

कमिशनर साहेब, तसे नाही. सकाळी माझा एक प्रॉब्लेम निर्माण झाला. मी आपल्याकडे आल्यानंतर मा. ऊपमहापौर यांच्याकडे गेली आणि तो प्रॉब्लेम त्यांनी सॉल केला. पद्धत तशी नाही. आपल्याकडे चेक भरणा करायला जी लोक येतात. ते आपण बाहेर बोर्ड मारले की, तुम्ही चेकने भरणा केली तर तुमचा चेक पास झाल्यानंतर तुम्हाला ५ टक्के सुट मिळणार आणि त्यासाठी एक फॉर्म आहे आणि फॉर्म चेक भरताना भरुन घ्यायचा असतो आणि ते पास झाल्यानंतर त्यांना नक्की मिळणार आहे. आणि दुसरा एक सन्मा. रोहिदास पाटील (काकांनी) यांनी मुद्दा ऊपस्थित केला की, आता रिटा शहा यांचा फ्लट आहे तर बरोबर

आहे. रिटा शहा ते भरायला येणार नाहीत. परंतु, मला जी रिसीट घरी मिळते त्याच्या एक रिसीटवर माझी सही घेतली जाते आणि एक रिसीट आपण आम्हाला देऊन जातात आणि जेव्हा भरणा करायला माझा नोकर अथवा भाऊ , बहिण किंवा कोण पण येणार आणि तेव्हा ते भरताना परत एक फॉर्म भरतात ५ टक्के सूट देताना आणि तिकडे त्या इसमाची सही घेतात. मला असे वाटत नाही की, कुठलाही फ्लॅटधारक येऊन बोलणार की, मला ५ टक्के सूट मिळाली नाही. माझा टॅक्स भरणा झाला नाही. असे होणारच नाही कारण कोणाचे पैसे घेऊ न कोण बिल भरायला येणार असे ही गोष्ट शक्यच नाही. कारण हे जे काही चालले आहे ५ टक्के सूट आहे आणि जी काही कार्यवाही चाललेली आहे ती खरोखरचं ऊत्कृष्ट चालली आहे. फक्त आपण लोकांची एवढी सोय करा कारण आपली लोक तिथे टॅक्स घ्यायला बसली आहेत तर लोक जास्त आहेत आणि आपला स्टाफ कमी पडत आहे. आज सकाळी श्री. योगेश म्हात्रे म्हणून आपले कर्मचारी आहेत. त्यांना काल आमच्या वॉर्ड मधील एका बाईकडून पैसे घेतले तर त्यांना ८२ रुपये कमी दिले होते. तिला संध्या ७.०० वाजेपर्यंत तिथे थांबून ठेवले आणि शेवटी पैसे दिले नाही आणि सकाळी आल्यावर सांगतात की मला मिळत नाही. मी तुम्हाला देणार नाही. असा प्रकार घडू नये आणि लोकांमध्ये रॉंग मेसेज जाऊ नये त्याबद्दलची जाणीव ठेवावी आणि साहेब स्टाफ वाढवावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी दि. २१/८/०६ रोजी महासभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे प्रशासनाने ५ टक्के आणि ३ टक्क्याची सवलत सुरू केलेली आहे. ही सवलत सुरू करत असताना हा महानगरपालिकेने प्रभाग व्हाईज वॉर्ड व्हाईज जी बिले तयार केलेली आहेत. ही बिल आपण संबंध शहराची एकत्रित रित्या तयार केलेली नाहीत. प्रत्येक प्रभागावर आपण बिल तयार करतो दोन दिवसाच्या गॅप किंवा चार दिवसांचा गॅप ठेवत आहोत आणि नंतर आपण पुढच्या प्रभागाची बिल आपण तयार करण्याचे धोरण अवलंबिले आहे ह्या बाबतीत मी सभागृहात माहिती देऊ इच्छितो की, आपल्याकडे २ लाख ३७ हजार ८२५ बिले आपल्याला तयार करायची आहेत. त्याच्यापैकी आपण १ लाख १ हजार २८५ बिले तयार केलेली आहेत. १,३६,५४० बिले खतवली सुद्धा आहेत.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, हा कोणता विषय चालू आहे? हा विषय पटलावरील विषय आहे का? साहेब, ही सगळी माहिती आपण आपल्या केबिनमध्ये द्या. त्यांना केबिनमध्ये बोलून माहिती द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, एक गोष्ट लक्षात घ्या की, मा. महापौरांनी जे काही मला निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशाप्रमाणे मी सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचं ऊत्तर देत आहे.

**याकुब कुरेशी :-**

मी मा. महापौरांनाच विचारतो की, ह्या विषय पटलावर हा विषय आहे का? कशाला ऊगाचच सभेचा वेळ वाया घालवता?

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी २ लक्षवेधी आल्या आहेत पहीली लक्षवेधी सन्मा. सदस्या रिटा शाह यांची आहे. दुसरी लक्षवेधी मा. ऊपमहापौर चंद्रकांत वैती यांची आहे. अनुक्रमे पहिली लक्षवेधी विचारात घ्यायची असते. आपल्या नियमाप्रमाणे एकच लक्षवेधी विचारात घ्यायची आहे.

**रिटा शाह :-**

मी माझी लक्षवेधी दिलेली आहे. परंतु, आमचे मा. ऊपमहापौर ह्यांनी आमच्या पक्षातर्फे सर्व नगरसेवकांची सही घेऊ न लक्षवेधी दिलेली आहे. तर मी माझी लक्षवेधी मागे घेते.

**नगरसचिव :-**

आता एकच लक्षवेधी शिल्लक राहिली आहे. मा. महापौरांना विनंती करतो की, ती लक्षवेधी विचारात घ्यायची आहे. ती लक्षवेधी मा. महापौंरांकडे सादर करतो.

**मा. महापौर :-**

सचिवांनी लक्षवेधी वाचावी.

(नगरसचिवांनी सभागृहासमोर लक्षवेधीचे वाचन केले.)

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे...

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधी ज्यांनी मांडली आहे त्यांनी चर्चा करायची आहे की, आम्ही करायची आहे. लक्षवेधी आपण मांडली आहे, त्याच्यावर चर्चा मा. ऊपमहापौर करतील त्यानंतर आम्ही करु.

**रतन पाटील :-**

चर्चा आपण करतात की, सर्व सभागृहाने करायची. मिरा भाईंदरच्या नागरिकांच्या दृष्टीने चांगला विषय आपण आणलेला आहे.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयाबद्दल मा. आयुक्त ह्यावर खुलासा करतील.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जी काही इथे लक्षवेधी सुचना सादर केलेली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने यापूर्वी जो ठराव पारित केलेला आहे त्याच्यामध्ये सुधारणा करावी किंवा तो रद्द करावा अशा प्रकारची लक्षवेधी आहे.

**रतन पाटील :-**

साहेब,काय सुधारणा आणि काय रद्द हे जरा नीट वाचून दाखवा.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये लोकसंख्येचा ऊल्लेख केलेला आहे आणि वेगवेगळ्या अडीअडचणी त्यात नमुद केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पाणी दराच्या संदर्भामध्ये सुद्धा ऊल्लेख केलेला आहे. सन्मा. सभागृहाला मी सांगू इच्छितो की, महासभेने यापूर्वी जो निर्णय घेतलेला आहे की, मोरबे धरणातून १०० एम.एल.डी. पाणी त्यांच्याकडून ऊपलब्ध करुन घ्यावे आणि त्याप्रमाणे आपण सभागृहामध्ये मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महानगरपालिकेला, त्याचप्रमाणे मा. महापौरांना, त्याचप्रमाणे मा. आयुक्तांनाही आपण याबाबतीमध्ये पत्रव्यवहार सुरू केलेला आहे. त्याच्याकडे मोरबे धरणाच्या बाबतीमध्ये दोन, चार बैठकाही झाल्या आणि त्या बैठकांमध्ये एक सुर असा दिसला की, त्याचं एक मिरा-भाईंदर महानगरपालिकेला १०० एम.एल.डी. पाणी द्यावे अशा प्रकारची तत्वता मान्यता दिलेली आहे. परंतु, अद्यापपर्यंत लेखी स्वरूपात आपल्याकडे प्राप्त झालेली नाही. मा. आयुक्त हे परदेशी दौऱ्यावर गेले असल्यामुळे एखादं पत्र यायला ऊशीर झाला असेल. परंतु, सन्मा, सदस्यांनी याबाबतीत जी काही लक्षवेधी मांडलेली आहे. त्याच्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने असे सांगितलेले आहे की, स्टेम प्राधिकरणाकडून जे काही आपल्याला ८६ एम.एल.डी. पाणी प्राप्त होत आहे. त्याच्यामध्ये स्टेम प्राधिकरणामध्ये तर थोडीशीही अनियमितता झाली तर त्याचा इफेक्ट १० मिनिटाचा जरी फरक पडला तर ३ तासाचा इफेक्ट आपल्याला मिरा-भाईंदर शहराला जाणवतो. ह्या सर्व बाबी जरी खऱ्या असल्या तरी आज काही ८६ एम.एल.डी. पाणी आपल्याला मिळत ते ८६ एम.एल.डी पाणी हे आपल्या शहराच्या लोकसंख्येच्या मानाने फारच अत्यल्प आहे. हे जे आज आपण फ्लोटींग पॉप्यूलेशन पकडली तर जवळ जवळ साडे सात लाख जे पावणे ८ लाखांपर्यंत या शहराची फ्लोटींग पॉप्यूलेशन आहे. आणि त्या फ्लोटींग पॉप्यूलेशनचा जर आपण विचार केला तर दर मानसी १०० एम.एल.डी याप्रमाणे जवळ-जवळ २३५ एम.एल.डी. पाण्याची आज या शहराला गरज आहे. याबाबतीमध्ये पाटबंधारे विभागालाही आपण विनंती केलेली आहे. जशी आपण नवी मुंबई महानगरपालिकेला विनंती केलेली आहे त्याचप्रमाणे आपण पाटबंधारे विभागालासुद्धा विनंती केलेली आहे आणि त्यांनाही आपण सांगितले आहे की, आम्हाला जो काही पाणी पुरवठा ऊपलब्ध होतो त्याच्यामध्ये आणखीन ५० एम.एल.डी पाणी आम्हाला वाढवून तुम्ही द्यावे की, जेणेकरून आज शहराची तात्पुरती गरज भागेल आज ८६ एम.एल.डी पाणी संबंध शहरामध्ये पुरेसे होत नाही. हे आपल्याला माहित आहे. त्यांनाही आपण विनंती केलेली आहे आणि नवी मुंबई महानगरपालिकेस सुद्धा विनंती केलेली आहे. आपण जो काही आता सन २०२५ पर्यंतचा व्हिजन तयार केलेला आहे. त्या व्हिजनमध्ये २३५ एम.एल.डी. पाण्याची गरज आपण ऊद्दिष्ट आज ठेवलेले आहे. तर त्या ऊद्दिष्टांचा विचार केला तर १०० एम.एल.डी. पाणी आणि हे आणखीन ५० एम.एल.डी. पाणी जरी १५० एम.एल.डी. पाणी मिळाले आणि अतिरिक्त पाणी मिळाले आणि हे काही ८६ एम.एल.डी. पाणी जे आपल्याकडे ऊपलब्ध होते तर अशाप्रकारे २५० एम.एल.डी. पर्यंत पाणीपुरवठा जर आपल्या शहराला झाला तर आपल्या शहराची जी पाण्याची गरज आहे ही जवळ-जवळ सन २०२५ पर्यंत संपुष्टात येईल असा मला विश्वास वाटतो. या संदर्भामध्ये आणखीन काही कोणाला माहिती हवी असेल किवा सन्मा. सदस्यांना काही विचारायचे असेल तर त्यांनी विचारणा करावी त्याला ऊत्तर मा. महापौरांच्या परवानगीने देण्यात येईल.

**चंद्रकांत वैती (मा. ऊपमहापौर) :-**

मा. आयुक्त साहेब, ह्या शहराची जी लोकसंख्येची वाढ आहे ती २९६ टक्के ची आहे. शहरामध्ये १९८० साली ७४ हजार लोक राहत होती आणि १९९० साली १,७५,००० लोक राहत होते, २००१ च्या सेन्सस प्रमाणे ५,२०,३०१ आगामी अंदाज आहे सन २०१८ चा त्याच्यामध्ये १३,००,००० ची लोकसंख्या झालेली असेल आणि या शहराला पाणी पुरवठ्यासाठी मागे आपल्याकडे दुसरा काही पर्याय नव्हता. आपण त्यावेळेला मोरबे धरणातून पाणी मिळेल असा मा. पालकमंत्र्यानी आपल्याला विश्वास दिला होता. परंतु, ती योजना राबवताना आपल्याला साधारणपणे ३०० कोटी रुपये खर्च येणार आहे. कारण तिथून मोरबे धरणापासून ते मिरा-भाईंदर पर्यंत आपल्याला लाईन टाकावी लागणार आहे. सम्प आणि पंपची व्यवस्था करावी लागणार आहे. परंतु, सध्या विद्यमान आपल्याला शहाड टेंमघर पाणी पुरवठा योजनेतून जे पाणी मिळते. तर ह्या लाईनमधून अजून ५० एम.एल.डी पाणी आपण घेऊ शकतो. आणि त्याच्यासाठी खर्च आता सध्या आपल्याला ४ रुपये प्रती हजार लिटरला खर्च येतो. तोच खर्च आपल्याला येणार आहे आणि दुसरा पर्याय सभागृहासमोर आम्ही आणलेला आहे. तो सुर्या नदीच्या प्रकल्पातून जर आपण पाणी घेतलं तर शहाड-टेंमघर योजनेपर्यंत जी जवळची पाईप लाईन पडेन जी जवळची पाईप लाईन येईल तिथपर्यंतच पाईप लाईन जोडायची आहे. त्याच्यासाठी पण आपल्याला ४ रुपये प्रति हजार लिटरने पाणीपुरवठा मिळेल आणि तिसरा पर्याय या विषयावरती बऱ्याच वेळेला

महानगरपालिकेतल्या या शहरातील लोकांनी विचार केलेला आहे की, चेना येथे डोंगरावरून जे पाणी ऊतरते तर त्याच्यासाठी आपल्या स्वतःच्या डॅम विकसित केला तर आपल्याला स्वतःच्या मालकीची ही पाणी पुरवठा योजना होईल. त्याची फिजीबिलिटी चेक करण्यासाठी आपण एम.जी.पी. कडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तज्ञ असे व्यक्ती नेमावेत आणि शहरासाठी लवकरात लवकर पाणी पुरवठा कुठच्या योजनेमधून होईल आणि स्वस्तात पाणीपुरवठा कुठच्या योजनेतून होईल या विषयी विचार विनिमय व्हावा. आजच्या लक्षवेधीच सभागृहापुढे आणण्याचे प्रयोजन असे की, आज शहरामध्ये वारंवार आपल्याला मागे टँकर मधून आपण ८ ते १० एम.एल.डी पाणी विकत होतो. परंतु, ते पाणी विकण्याचे बंद झाल्यानंतर आज शहराच्या विविध परिसरामध्ये आज आपण जे ३२ तासावरती, ३० तासावरती पाणी पुरवठ्याचे प्रमाण आणले होते. पाणी वितरणाचे प्रमाण आणले होते. आज पुन्हा ते ४० ते ५६ तासापर्यंत गेलेले आहे आणि याला कारण असे आहे की आपण सगळ्यांना कनेक्शन द्यायला सुरूवात केली. पाण्याचे वितरण जास्त व्हायला लागले. पाण्याचा ऊपभोग जास्त लोक घ्यायला लागले. त्याच्यामुळे जिथे जिथे पाणी मोठ्या प्रमाणात चांगल्या दाबाने जात होते. तर आज त्या दाबाने पाणी जात नाही. म्हणून आपण जो पूर्वी ठराव केलेला आहे. मोरबे धरणातून पाणी आणण्याचा तर त्याच्यासाठी आपल्याला ७ रुपये प्रती हजार लिटरने पाणी मिळणार आहे. असा आपण ठराव केलेला आहे. म्हणजे आपल्याकडे पाणी येण्यासाठी जेवढा २-३ वर्षाचा कालावधी लागेल. आणि त्यानंतर तो वितरण करण्यासाठी आपल्याला तोपर्यंत १० रुपये प्रती हजार लिटरने आपल्याला वितरण करावे लागेल. असे आमचे मत आहे. म्हणून सभागृहाला विनंती करतो की, आजची लक्षवेधी आहे. ही लक्षवेधी पुढच्या सभेसमोर आपण रेग्युलर विषय घेऊन आणली आणि त्याच्यावर आपण योग्य पर्याय काढला तर शहराला लवकरात लवकर आणि स्वस्त दरात पाणी पुरवठा ऊपलब्ध होईल असे माझे मत आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. पहिल्यांदा तर मी मा. ऊपमहापौरांचे अभिनंदन करतो आहे की, ते मा. ऊपमहापौर आहेत आणि त्यांनीच ती लक्षवेधी दिली आहे आणि मा. महापौरांना स्विकारल्या शिवाय पर्याय ही नव्हता. त्यामुळे त्यांनी खुल्या दिलाने ती लक्षवेधी स्विकारलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे की, महानगरपालिकेमध्ये पाणी टंचाई सुरू झालेली आहे. त्यांनी निवेदन करतेवेळी मोरबे धरणाचा जो एक ऊल्लेख केलेला आहे ही पण वस्तुस्थिती खरी आहे. याच सभागृहात ज्यावेळी मोरबे धरणाच्या पाणी पुरवठ्याचा एक मताचा ठराव देते वेळी काही ऊत्साही नेत्यांना इतका आग्रह होता की, अन्य पक्षांचे मत घेण्याची सुद्धा इच्छा नव्हती. त्याचं विमान ऊभे आहे आणि ते जायला निघाले होते. अशा पद्धतीने तो ठराव केलेला होता आणि मा. आयुक्त साहेबांनी तर स्पष्ट निवेदन केलेलं आहे की, मा. आयुक्तांनाच आजच्या घटकेला इतके महिने, वर्ष होऊन गेले तरी सुद्धा नवी मुंबईत महानगरपालिका मा. आयुक्तांच्या सकारात्मक एक ओळीचे सुद्धा पत्र नाही. तरी त्या मोरबे धरणाच्या पाण्यावर आपण बाणेदार नेते आपण आशा धरुन बसलेलो आहोत. आले तर चांगले आहे. पण तेवढे बाणेदार नेते सक्षम नाहीत असा आमचा आरोप आहे. कारण जे पत्र गेले त्याचा पाठपुरावा होत नसेल तर पत्र देऊन पाणी मिळत नाही. पाण्यासाठी पाण्यासारखे प्रयत्न करावे लागतात आणि तो प्रयत्न त्याच्याकडून झाला नाही. दुसरी बाब अशी आहे की, स्टेममध्ये जेव्हा मिटींग होते. ती वस्तुस्थिती आहे. आपल्याला पर डे ८६ एम.एल.डी. पाणी महिन्यात २,०२,५८६ एम.एल.डी पाणी ८६ एम.एल.डी. पाणी हा सरासरीचा आकडा त्यांनी पूर्ण केला पाहिजे. असे मा. आयुक्तही आग्रह धरत नाही आणि सत्ताधारी पक्षाचा हा विषयच नाही म्हणून ते विषयच मांडत नाही. ही वस्तुस्थिती आहे की आपल्या शहराला स्टेमने दिलेल्या लेखी आश्वासनानुसार जर दर दिवशी ८६ एम.एल.डी. पाणी दिले पाहिजे. पण ज्यावेळी विज-पुरवठा बंद होतो, त्यावेळी एखादे यंत्र बंद होते, एखादी आपत्ती निर्माण होते त्यावेळी ते पंप बंद राहतात आणि पाणी पुरवठा कधी खंडीत होतो ती तुट भरुन काढण्याचे पत्र आपण दिलेले नाही. तुट भरून काढण्याच पत्र न दिल्यामुळे आज आपण जो दावा करतो, की आपण ३६ तासावर, ४२ तासावर तर वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या ठिकाणी आपण २ तास पाणी देत होतो. त्या दोन तासाचे दिड तासावर आणलं त्याचे परिणाम काय झाला की, ज्या इमारती पाईप लाईनच्या जवळ आहेत. त्यांना थोडेसे पाणी मिळते. पण ते शेवटी आहेत. ज्याला म्हणतात बजेट ते लेट आहे किंवा पाईप लाईनपासून १०० फूट किंवा १५० फूट आत मध्ये बिल्डिंग आहे. त्या लोकांना पाणी मिळतच नाही आणि पुर्ण एका विभागातच असे नाही. पुर्ण मिराभाईंदरमध्ये पाणी टंचाईस सुरूवात झालेली आहे. परवाच्या दिवशी केबिनरोडवरून मॅडम, एक मोर्चा आला. कोणत्याही मोर्चाचे आयोजन स्वयंस्फूर्तीने. ४०० लोकांचा मोर्चा मा. आयुक्त साहेबांच्या केबिनमध्ये आला. मा. आयुक्त साहेबांनी खुल्या दिलाने त्या मोर्चाचे स्वागत केले. त्यांना सांगून दिले मी माझ्या परीने त्यांना पाणी देण्याचा प्रयत्न करीन. लोकांनी विश्वास ठेवला. हे महानगरपालिकेचे आयुक्त आहेत म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवला, कोणीही कोणती वेगळी घोषणा केली नव्हती. पण मा. आयुक्तांनासुद्धा त्याच्यात पुर्ण यश आलेले नाही. ते काम सुद्धा युद्ध पातळीवर होणे गरजेचे होते. मा. आयुक्त साहेबांनी लोकांना विश्वास दिला आणि विषय थोडासा बाजूला राहिला असे माझे मत आहे. पण थोडी सुधारणा होत चालली आहे. त्याबद्दल मा. आयुक्तांना धन्यवाद देतो. पण त्या प्रभागाचे नगरसेवक बाहेर का गेले कुणास ठाऊक? चांगला विषय पाण्याचा विषय त्यासाठी त्यांनी थांबवायला पाहिजे. आमचा असा आग्रह आहे की, पाण्याच्या प्रश्नासाठी संपूर्ण सभागृह एक साथ आहे. यात पक्षाची कोणती भुमिका नाही. कोणताही पक्ष त्यास विरोध करणार नाही.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य सभागृहात आले.

**रोहिदास पाटील :-**

पुन्हा त्यांना जागे करू नका. त्यांना बसू द्या.

**मोहन पाटील :-**

काकांना माझ्या शिवाय चैन पडत नाही आणि नंतर म्हणता काका मला वाचवा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्या शिवाय आपलं पण जमत नाही असे आहे ते असू द्या.

**रतन पाटील :-**

अशी वेळ तुमच्यावर नको यायला. काका मला पण वाचवा.

**रोहिदास पाटील :-**

आताचा जो विषय आहे की, आधी ३ ठराव दिले होते. सुर्या प्रकल्पासाठी आपण ठराव दिला होता, स्टेमकडून ५० एम.एल.डी पाणी मिळावे त्याच्यासाठी ठराव दिला होता आणि मोरबे प्रकल्पाचाही आपण ठराव दिला होता. चेन्याचाही होता, ऊत्तनच्या तलावामधून ही पाणी ऊचलण्याचा ठराव आपण केलेला आहे. कोशी धरणाची मोठी स्टेमची घोषणा आहे. त्यामध्ये आपण सहभागी होण्यासाठी आपण ५ ठराव केले असून आजच्या घटकेला फक्त येणारे पाणी आपण शहरात वाटण्याचे काम करतो. खरोखरचं मा. आयुक्त साहेबांनी याच्यावर निर्णय घ्यावा की, आता १ डिसेंबर पासून नवीन कनेक्शन द्यायची की नाही आहेत त्या लोकांना पाणी द्यायचे की, नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपल्या सुचना समजल्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण चर्चा करत आहोत. काय सुचना समजल्या? न बोलतानांच समजल्या.

**मा. महापौर :-**

आपल्याला काय बोलायचे आहे ते समजले आहे. आपण बसून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मला जे बोलायचे आहे ते मी न बोलता आपल्याला बरेच समजते हीच तर पुण्याई आहे. पण ते यशस्वी करण्यामध्ये आपल्याला यश येत नाही हे दुर्दैव आमचे आहे. आपण जे समजता त्याचे आम्ही स्वागतच करतो पण ते यशस्वी करा ना. आपण महापौर झाल्यापासून एक लिटर ही पाणी आपण वाढवले नाही. आम्ही तुमच्यावर कसा विश्वास ठेवायचा?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

शहर मे पानी की कमी नही है। पानी बढानेकी बात करिए। लेकीन इस समय शहर मे पानी कम नही आ रहा है। शहर मे पानी और बढाईए और दुसरी स्कीम लाईए। लेकीन अभी पानी की टंचाई नही है।

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपकी इजाजत से बोलना चाहूँगी, शनिवार को आयूक्त साहेब के दालन मे जो मोर्चा आया व पानी के संबंध मे मोर्चा आया था ना।

**शुभांगी नाईक :-**

लोकांना तीन-तीन दिवस पाणी मिळत नाही. लोकांना व्यवस्थित पाणी पुरवठा होत नाही.

**सुधा गोयंका :-**

हमारे यहा ४४ घंटोसे पानी आ रहा है।

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आमच्या इथे ९० फिटला तीन दिवस पाणी येत नाही.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य चौहाण साहेब कहते है की, पानी की कमी नही है। तो में बताना चाहूँगा की, ३८ घंटे के बाद पानी आता है।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. १४ मध्ये सुद्धा पाणी येत नाही.

**मा. महापौर :-**

सचिवजी परवानगी न घेता बोलणाऱ्या सदस्यांचे शब्द कामकाजातून वगळण्यात यावे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, महेंद्रसिंग चौहाणजीने आपसे परमिशन ली थी क्या?

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदरमध्ये पाण्याची टंचाई नाही हे त्यांना कसे समजले. एका ठिकाणी बरोबर पाणी येते आणि दुसऱ्याकडे ४०-४० घंट्यानंतर पाणी येते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. आपल्याला बोलण्यास वेळ दिला जाईल.

**रोहिदास पाटील :-**

मी महापौरांना विनंती करतो की, आपल्या नेतृत्वाखाली स्टेमच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घ्या. ज्याच्यामध्ये गटनेत्यांना किंवा तुम्हाला जे योग्य वाटतील. फक्त आम्ही गटनेते कॅटेरियल लावत नाही. आपल्याला जे योग्य वाटतील त्यांना बोलवा. पण जे दोन हजार....

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडमजी, स्थायी समितीचे सदस्य काल स्टेमकडे जाऊन आले ना. आपणही असाल ना.

**रोहिदास पाटील :-**

कधी ?

**लिओ कोलासो :-**

काल गेले होते ना. आपण स्थायी समितीचे सदस्य काल गेला होता ना.

**रोहिदास पाटील :-**

स्थायी समितीचे सदस्य गेले नाही.

**लिओ कोलासो :-**

स्थायी समितीचे अध्यक्ष सांगतील ना. गेले होते की नाही.

**एस. ए. खान :-**

आम्ही काल गेलो होतो. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर वगैरे असे आम्ही मिळून काल गेलो होतो.

**रोहिदास पाटील :-**

आपण चांगल्या विषयाला कशाला मुरड घालता हे आम्हाला समजत नाही.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवनगीने बोलतो, पाण्यासारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू आहे. सन्मा. महापौरांना विनंती करतो की, आपण प्रत्येकाला त्या त्या विषयावर पाच मिनिटे बोलायला द्या आणि शहरामध्ये पाणी टंचाई आहे आणि ते पाच प्रकल्प आपण सुरू करावे अशा पद्धतीची धारणा सर्वांची आहे.

**सुधा गोयंका :-**

हम लोग कबसे हाथ ऊपर करके खडे है।

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) चिमट्या मारल्याशिवाय जमत नाही. त्यांना चिमट्या मारण्याची सवय आहे. ते चिमट्या मारतात. जर चांगले काम होत असेल तर आम्ही चिमट्या सहन करायला तयार आहोत. तुम्ही आम्हाला नेहमी चिमट्या मारता तर ते चिमट्या घ्यायला तयार आहोत ना. पण त्या चिमट्यामधून जर चांगले पाणी मिळत असेल, चिमट्यात पाणी असेल ना.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, ह्यांना चिमटा लागेल तर ना. ह्यांना चिमट्या घेऊन घेऊन असर झाले आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) आपण सर्वांना बोलायला द्या ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण बसून घ्या.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता जी लक्षवेधी मा. ऊपमहापौर चंद्रकांत वैती साहेब यांची आली होती आणि ती लक्षवेधी पुढच्या मिटींगमध्ये ठेवावी असे मा. महापौरांना सांगितले होत. तर जे आपल्या प्रोसिंडींगमध्ये असताना देखील जी चर्चा पाण्याच्या विषयी चालली आहे ती अतिशय चांगली आहे. पण त्याच पद्धतीने सदरचा विषय आपण पुढील मिटींगमध्ये घ्याल अशी आपल्याला मा. ऊपमहापौर साहेबांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार आपण हा प्रश्न इथेच संपवावा आणि आपण जी लक्षवेधी आहे त्यांच्याविषयी वाचन करुन घ्यावे ही आपणांस नम्र विनंती.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मुझे बोलने की, इजाजत दिजिए।

**रोहिदास पाटील :-**

मी आपल्याला विनंती करतो आहे की, ती आपण स्विकारत नाही का?

**मा. महापौर :-**

मा. ऊपमहापौरांनी मांडलेली लक्षवेधी पुढील वेळेस रितसर घेण्यात येईल. सचिवजी पुढील विषयास सुरूवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जी आपल्याला विनंती केली आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, १ घंटेसे आप हाथ ऊपर करके रखे है, लेकीन आप हमे इजाजत नही दे रहे है और जो परमिशन लेकर नही बोलते है आप ऊनको इजाजत दे रहे है। आप कुछ हमे भी बोलने दिजिए ना।

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी दिलेली माहिती खरी माहिती आहे का? आपली माणसे सभा संपल्यानंतर गेली आपली माणसे, आपले अधिकारी स्टेमचे विषयपत्रिकेवरील विषय होऊन गेल्यानंतर पोहचले हे आपल्याला माहित आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सचिव इतिवृत्तांताचे वाचन करावे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६९ चे वाचन केले.)

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, मा. ऊपमहापौरांनी दिलेली लक्षवेधी सुचना आहे. त्याबाबत आपण या संदर्भामध्ये स्पेशल मिटींग लावणार आहात का? की, आपण पुढच्या मिटींगमध्ये चर्चा करणार आहोत? मॅडम, पाण्यासाठी आपण आपली जर स्पेशल सभा लावत असाल तर कृपया पाण्यासाठी आपण स्पेशल सभा लावा. जेणेकरून हा पाण्याचा प्रश्न आहे तो आपल्या शहरासाठी फार महत्वाचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आपल्याला सांगु इच्छितो की, आपण पाण्याविषयी खास सभा लावा.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आम्ही सहमत आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, पाण्याकरिता विशेष सभा लावा आणि गटनेत्यांनाही विशेष आमंत्रित करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पाण्यासाठी खास सभा लावा. जेवण-खावणाची सोय करा. स्टेमवाल्यांना बोलवा, कन्स्टलंट अधिकाऱ्यांना बोलवा. आपल्याला प्रयत्न करायला काय हरकत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मॅडम, पाण्यासाठी विशेष सभा लावा.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य महेंद्रसिंगजीने बोला के पानी की कटौती नही है। तो एक महिने से केबीन रोड पर ४४ से ४८ घंटे पाणी क्यों आ रहा है?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, मैने पुरे भाईंदरके बारे मे नही बोला है। भाईंदर वेस्ट मे मेरे एरिया मे पानी है। आपके एरिया मे नही है तो मै क्या करु?

**सुधा गोयंका :-**

मॅडम, मुझे इसका जवाब चाहिए। मै बार-बार शिकायत कर रही हूँ एरिया मे ४४ घंटे से पानी आ रहा है ऊसका क्या करोगे?

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आमच्या येथे ९० फिटवर तीन-तीन दिवस पाणी येत नाही.

**सुधा गोयंका :-**

हमारे यहॉ ४४ घंटो से पानी आ रहा है ऊसका खुलासा किया जाए।

**रतन पाटील :-**

मॅडम, सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेब यांच्या वॉर्डामध्ये पाणी बरोबर येत आहे. म्हणजे त्यांच्याकडे २४ तासामध्ये पाणी बरोबर दिले जाते.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, याचा अर्थ असा होतो की, सत्ताधाऱ्यांच्या स्वतःच्या प्रभागामध्ये पाण्याची व्यवस्था बरोबर केलेली आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, भाईंदर वेस्टमध्ये ४८ तासांनी पाणी येत आहे. मॅडम, मी स्वतः वेस्टला राहते. टाकीमध्ये पाण्याचा तीन-तीन दिवस पुरवठा होत नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपण एक-एक सदस्यांना बोलायला द्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांना बोलू द्या.

**रतन पाटील :-**

आमच्या येथे पाणी वाढवून द्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, कोण काय बोलत आहे हे कळत नाही.

**सुधा गोयंका :-**

एक महिने से पानी कम क्यों आ रहा है? ऊसका आप खुलासा करावाईए। बारकुंड साहेब को बोलिए वह ऊसका खुलासा करवाके देंगे।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी शांत बसावे.

**रतन पाटील :-**

आमच्या यथे ४८ तासात पाणी का?

**शरद पाटील :-**

मॅडम, सन्मा. सदस्यांच्या येथे २४ तास पाणी येते असे ते सांगतात. मग आमच्या येथेच ४८ तासांनी पाणी का येते?

**मा. महापौर :-**

सर्वांनी शांत बसावे.

**शरद पाटील :-**

भाईंदर वेस्टला २४ तासानी पाणी येते आणि भाईंदर पूर्वेला ४८ तासानी पाणी येते. असा भेदभाव का? त्यांच्या येथे जे पाणी येते ते आपण कमी करा.

**रोहिदास पाटील :-**

हा दुजाभाव कशाकरिता आहे?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी खाली बसावे. आपण खाली बसून घ्या म्हणजे आपल्यापर्यंत आवाज जाईल.

**मा. ऊपमहापौर :-**

सन्मा. सभागृहास विनंती करत आहे की, कृपया शांत बसून घ्या. सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी सांगितले आहे की, त्यांच्याकडे पाणी पूर्ण येत आहे. कदाचित ती चांगली गोष्ट असेल. संपूर्ण शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. या शहराला १२ ते १५ एम.एल.डी. पाण्याची अजुन आवश्यकता आहे. हे फॅक्ट आहे. मा. महापौरांना विनंती केलेली आहे. सर्वांच्या विनंती वरुन याच्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात येणार आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पूर्व भागामध्ये पाण्याची भीषण टंचाई आहे. त्याचे इथे आपण निवेदन करावे. पाणी पुरवठा अधिकाऱ्याने येथे सविस्तर निवेदन करावे. आम्हाला पब्लिकला ऊत्तर द्यायचे असते.

**शरद पाटील :-**

आता सन्मा. सदस्यांनी जे सभागृहात बोलले की, हा जर प्रश्न पब्लिकमध्ये गेला तर आमच्यावर फार ताण पडतो.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, पानी कम क्यों आ रहा है?

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, एकीकडे पाणी जास्त येते आणि एकीकडे कमी येते तर आपण एकीकडे पाणी कमी करता का?

**मा. महापौर :-**

पाणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी या बाबतीत सभागृहाला सविस्तर माहिती द्यावी.

**प्रभात पाटील :-**

त्यांनी निवेदन करावे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, एक विनंती करु इच्छितो ........

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पाणी विभागाच्या अधिकाऱ्यांना यावर माहिती द्यायला सांगावी.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला परवानगी दिलेली आहे. माझी फक्त सुचना आहे. त्या सुचनेलाही ते ऊत्तर देतील अशी माझी अपेक्षा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अधिकाऱ्यांनी प्रथम ऊत्तर द्यावे.

**रोहित सुवर्णा :-**

माझी पण तीच अपेक्षा आहे.

**प्रभात पाटील :-**

यावर अधिकाऱ्यांनी निवेदन करावे.

**रोहित सुवर्णा :-**

आपण माझे एकून घ्यावे.

**एस. ए. खान :-**

स्टेमच्या सभेला जाऊन आला आहात त्याबद्दल खुलासा करावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अनेक वेळा स्टेमच्या बरोबर मिटींग झालेली आहे. तसेच आपल्याला............

**मोहन पाटील :-**

मग आपण सर्वांना बोलायला द्या ना. मी याबाबतीत आपल्याला अगोदरच बोललो आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, एकवढी महत्वाची मिटींग असताना सर्व नगरसेवकांना का बोलावले गेले नाही.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, आपण विशेष सभा लावणार आहात ना. मग आता कशाला या विषयावर चर्चा चालू आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अतिशय महत्वाचा विषय चालू आहे. शहरामध्ये पाण्याकरिता आग लागलेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

अधिकारी साहेब, आपण या विषयावर ऊत्तर द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला परवानगी दिलेली आहे. कृपया माझी सुचना ऐकून घ्या.

**एस. ए. खान :-**

पाणी पुरवठा अधिकारी पहिल्यांदा आपण ऊत्तर द्या.

**प्रभात पाटील :-**

आम्हाला आमच्या प्रश्नाचे ऊत्तर पाहिजे.

**एस. ए. खान :-**

काल स्टेमची सभा झाली. त्यात काय झाले त्याबद्दल आपण प्रथम बोला.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण परवानगी दिलेली आहे. आपण माझी सुचना ऐकून घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या ठिकाणी मा. ऊपमहापौर चंद्रकांत वैती यांनी जी लक्षवेधी सुचना केली त्याबद्दल मी त्यांना सभागृहाच्यावतीने धन्यवाद देतो. कारण अतिशय पाण्याची टंचाई चालू आहे. स्थायी समितीच्यामार्फत स्टेमची सभा ठाणे येथे बोलावण्यात आलेली होती. स्टेमचे अधिकारी आले. आपली लोक जरा ऊशीरा पोहचले. तरीसुध्दा त्यांनी जो विषय सांगितलेला आहे. तर आपण सांगतो पाणी कमी येते. तर ते पाणी का कमी येते? तेथे कोणीच लक्ष देत नाही. पाणी कमी यायचे कारण एवढेच आहे की, तारेवरची सर्कस असल्यामुळे तारेवरची लाईट आहे. एम.एस.ई.बी. ची लाईट असल्यामुळे नेहमी हा प्रश्न ऊपस्थित होत आहे आणि म्हणून आपण नेहमी त्यांना सांगितलेले आहे की, आता आपण केबल टाकण्याचे काम तिथे चालू केलेले आहे. १५ दिवसात केबल जोडण्यात येणार आहे. त्याच्यानंतर मोठ्या प्रमाणात आपला प्रश्न सुटणार आहे. तरीसुध्दा काल आपण अशी मागणी केली आहे. त्या सभेला मा. आयुक्त साहेब होते. या ठिकाणी जो पाणी मिळतो. समजा, आज पाणी कमी झाले आहे, अचानक पाणी बंद झालेले आहे आणि जेव्हा ३० एम.एल.डी. पाणी झालेले आहे.

राहिलेले ८६ एम.एल.डी. पैकी जे ऊरलेले पाणी आहे ते आपण आम्हाला दुसऱ्या दिवशी दिले पाहिजे. काल अशाप्रकारची आम्ही मागणी केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

जनरेटर बसवायचे आहे त्याचे काय झाले?

**रोहिदास पाटील :-**

तेच सांगतो जे मिटर बंद आहे त्याचा आग्रह धरा ना. आपण सांगता ना. आंधळा दळतोय आणि कुत्रं पिठ खात आहे. तसेच चाललेले आहे. लमसम बिल देतात. तिथे तुमचे मिटर नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जे मिटर बंद आहे ते मिटर सुरु करण्याविषयी ही काल चर्चा झाली आहे. ते मिटर लवकर लावण्यात येणार आहे. त्यांनी सांगितले की, रिपेरिंगला ते मिटर दिले आहे. ते बंद असल्यामुळेच आपल्याला पाणी कमी येत आहे. ही परिस्थिती सत्य आहे. ते मिटर रिपेरिंग करणार आहेत.

**मोहन पाटील :-**

साहेब, फक्त ४ एम.एल.डी.चा फरक पडेल. आपल्याला त्याच्यापेक्षा जास्त पाणी पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण जनरेटरचाही ठराव केला आहे. जनरेटरची काय माहिती आहे ती आम्हाला द्यावी. जनरेटरच्या ठरावाची अंमलबजावणी कोणत्या प्रकाराने झाली आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा.  महापौर मॅडम, मला जरा बोलायची संधी द्या.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, हम कबसे खडे है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

अशातऱ्हेने चाललेले आहे. आपण पाण्याकडे लक्ष द्या. खरोखरच अतिशय वाईट परिस्थिती आहे. लोक कंटाळली आहेत. मिटर बंद आहे त्यामुळेच पाणी येत नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा.  महापौर साहेबा, पाण्यासारख्या अत्यंत ज्वलंत विषयावर या ठिकाणी सर्वाच सन्मा. सदस्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. आपण विचार करु शकता की, सन्मा.  सदस्यांच्या भावना एवढ्या तीव्र असतील तर माझी आपणास नम्र विनंती आहे. सन्मा.  सदस्य चौहाण साहेब आता बोलता बोलता बोलले की, माझ्या प्रभागात मी सक्षम आहे. त्यामुळे पाणी पुरवठा जास्त आहे. मग बाकीचे नगरसेवक असक्षम आहे का? मला ह्या ठिकाणी सन्मा.  महापौर साहेबा हे सुचित करायचे आहे की, सगळ्याच सदस्यांच्या भावना इथे तीव्र आहेत. नागरिकांच्या अति तीव्र भावना आहेत. माझ्या प्रभागात देखील पाणी येत नाही. आज जवळजवळ ३ आठवडे झाले आहेत. पाणी व्यवस्थित येत नाही. सन्मा.  बारकुंड साहेबांना सांगितले, आमचे प्रभाग समितीचे विद्यमान सभापती सन्मा.  लिओ कोलासो साहेब यांच्या समितीमध्येही मी सांगितले त्यांनी तातडीने मिटींगही बोलावली. परंतु, अद्यापही पाणी व्यवस्थेत काहीच सुधारणा झालेली नाही. पाणी व्यवस्थित येत नाही ही वस्तुस्थिती आहे. तर माझी आपणांस नम्र विनंती आहे की, आपण आता सभागृहाचा जास्त वेळ वाया न घालवता तागडतोब व अजेन्डा काढून विशेष सभा ताबडतोब ३ दिवसात बोलवा. जेणेकरुन या विषयावर आपल्याला सोक्षमोक्ष लावता येईल आणि नागरिकांना जास्तीत जास्त पाणी देण्याचे आपण आश्वासन दिले ते पाणी ऊपलब्ध करुन देता येईल. ते पाणी ऊपलब्ध करुन देऊ आणि मोरबे धरणातुन करुन घेऊ. सन्मा. ऊपमहापौरांनी सुचना केली आहे की, आपल्या मोरबे धरणातुन करायचे आहे. तर कृपया आपण आजच्या आज अजेन्डा काढा आणि ३ दिवसामध्ये विशेष सभा आपण बोलावावी ही नम्र विनंती. धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मला सुचना करायची आहे की, वॉर्ड क्रमांक, प्रभाग क्रमांक २१ चा जेव्हा सन्मा सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी प्रभाग अध्यक्ष होऊनसुध्दा त्यांनी जे स्टेटमेन्ट केले. कारण इथे सन्मा. बारकुंड साहेब आहेत, आमचे वेस्टचे आहेत सन्मा.  अरविंद पाटील त्यांना विचारा. पाण्याबाबत माझे किती फोन असतात. पाण्याची टंचाई मिरा भाईंदरमध्ये ऊत्पन्न झालेली आहे. ही सत्य परिस्थिती आहे. परंतु, मागील जी टंचाई होती तशी नाही. १५ टक्के पाणी आपल्याला अजुन वाढीव पाहिजे आणि ते कसे आणायचे ते आमचे मा. ऊपमहापौर यांनी लक्षवेधी आणून त्याची आता सुरुवात केलेली आहे. म्हणून सन्मा.  सदस्य चौहाण साहेबांनी सांगितले की, रिटा शाहचा वॉर्ड आहे. पण त्यांचा जो वॉर्ड आहे तोच माझाही वॉर्ड आहे. माझ्या वॉर्डामध्ये भरपुर पाणी आहे. लोक सुखात चैनीत बसलेले आहेत असे नाही. साहेब, आमच्याकडे मागील ४ दिवसापासून घाण पाणी येत आहे. मै बोलती हूँ। मॅडम, आपण त्यांना बसवा. मेरा पहिले खत्म होने दो बाद मे आप बोलो। मॅडम त्यांना काही तरी शिस्त पाळायला सांगा ना. मै आपके विरोध मे नही बोल रही हूँ आपके बाजुसे बोलूंगी क्योंकी आपका और मेरा एकही वॉर्ड है। कल कम ज्यादा हो गया तो हम दोनो को नुकसान होगा। पब्लिक आपको भी मारेगी और मुझे भी मारने को आएगी। तर मॅडम, महत्वाचा असा मुद्दा आहे की, पाण्याची टंचाई आपल्याकडे सुरु झालेली आहे. आपल्याला १५ टक्के वाढीव पाणी आजच्या तारखेला आले

पाहिजे. मागे मा. कमिशनर साहेबांना आणि ए.टी.पी. सन्मा. घेवारे साहेब यांना मी धन्यवाद देणार की, त्यांना ते आपले पुढील वीस वर्षाचे सी.डी.पी. कॅसेटमध्ये दाखवले त्यानी आपला प्रोजेक्ट दाखवला आणि त्याच्यामध्ये त्यांनी मेट्रो ट्रेन आणि सन २०११ ते २०२१ पर्यंत पाण्याची टंचाई कशी निर्माण होणार? आणि आपण ते कसे सोडवणार ते सर्व दाखवले. त्याच्यावरुन मा. ऊपमहापौर साहेब त्याच दिवशी बोलले होते की, पाण्याची टंचाई सन २०११ मध्ये नाही तर आजपासुन सुरु झालेली आहे आणि १५ टक्के वाढीव पाणी आपल्याला आजपासून पाहिजे आणि नंतर ती लक्षवेधी आणली आणि एक विरोधकांना बोलायची संधी द्यायला पाहिजे आणि त्यांना विरोधकांनी त्यावर बोलायला पाहिजे. परंतु, मी या १५ वर्षात तीन वेळा निवडून आलेली आहे. या सभागृहात बसलेली नगरसेविका आहे. पहिल्या पिरियडमध्ये मा. बिल्बर्ट मेन्डोसा साहेब, प्रथम नगराध्यक्ष होते. तेव्हाही ११० एम.एल.डी. पाण्याची योजना आलेली होती. त्यानंतर दुसऱ्या कालावधीमध्ये मा. प्रफुल्ल पाटील नगराध्यक्ष झाले. तेव्हा त्यांनी अपुरी राहिलेली ११० एम.एल.डी. पाण्याची सुरुवात करुन घेतली आणि आता तिसऱ्या पिरियडमध्ये पाच वर्षे पूर्ण होत येत आहे आणि पाणी अजून कसे वाढवायचे त्याबद्दल सुचना आज कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी पक्षांनी एकत्रित मिळून ती लक्षवेधी आणलेली आहे. कॉंग्रेस पक्षाचे मा. ऊपमहापौर आणि राष्ट्रवादी पक्ष आपण एकत्र मिळून लक्षवेधी आणलेली आहे. म्हणून असे बोलणे योग्य नाही की, मा. महापौरांनी पाच वर्षात कामे केली नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर साहेबा, मुझे भी निवेदन करना है। आयुक्त महोदय, कलसे नल कनेक्शन देना बंद करिए जब तक के १०० एम.एल.डी. पानी नही आ जाता। यह भी एक टेम्पररी नुकसान हो रहा है। क्या आप कनेक्शन दे रहे है? डेली हजारो कनेक्शन जा रहे है और आपका १०० एम.एल.डी. नही आर रहा है। जो सेक्शन होकर ऐसे ही पडा हुआ है ऊसके लिए अपने यहा से कोई कोशीश नही हो रही है। आज जो नगरसेवको की, जो भावना है ऊसको हम सब संघटीत हो के १०० एम.एल.डी पानी क्यू नही मिल रहा है। मा. पालक मंत्री ने दो-तीन बार वादा किया है की, १०० एम.एल.डी पानी मिल जायेगा मुझे लगता है हम सब लोग पानी के बातपर विरोध न करके एक साथ जाए। मा. ऊपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहबने मुद्दा ऊठाया की किसी की भी पार्टीने, लेकीन यह मुद्दा शहरका है। पानी चाहिए अब ५० एम.एल.डी पानी कम हो गया। ५० एम.एल.डी लाए, ५० एम.एल.डी कम हो गया। कल के लिए यह भी बिल्कुल कम हो जायेगा। तो मेरा मा. महापौरसे निवेदन है अगर हो सके तो कल इमिजेट नए कनेक्शन देना बंद करके पुरानी पूर्ती करीए और १०० एम.एल.डी लाईए। यह मेरा आपसे रिक्वेस्ट है।

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी, मघाशी मा. आयुक्त साहेबांनी एक निवेदन केले. ही लक्षवेधी आणल्याबद्दल मी मा. ऊपमहापौरांचे अभिनंदन करतो. कारण यापुर्वीच पाणी टंचाई या शहरामध्ये आहे की, नाही हे आपल्या सर्वांना मोर्चाच्या द्वारे कळून आलेले आहे. पाणी टंचाई या पुढे भविष्यात येत राहणार आहे आणि म्हणून नव्या योजना आखल्या जातात. नव्या योजना आखल्या जात असताना जुन्या योजनेमध्ये काय गडबड चालली आहे का? जुनी योजना बरोबर चालू आहे का? हे बघणे गरजेचे आहे. काही वेळेला अशी कृत्रिम टंचाई दुसऱ्या महापालिकेच्या काही अधिकाऱ्यांच्या मार्फत घडविली जाते आणि अशा प्रकारचे जिवंत ऊदाहरण जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः धाड टाकून ठाणे महानगरपालिकेच्या अभियंत्यावर अशा केसेस भरल्या. आमच्या तक्रारीवरती की, आमच्या लाईनवरती हिरानंदानी पार्क आजूबाजूच्या वसाहतींना त्यांनी आमच्या लाईन वरती अनधिकृत कनेक्शन जोडली होती. त्यावेळी एम.एल.डी पाणी हे भाईंदरला मिळत होते. असा भाईंदरकरांचा समज होता आणि हे ३१ एम.एल.डी पाणी अपुरे पडत होते म्हणून पाणी टंचाई आणि पाणी टंचाई म्हणून मोर्चे काढले जात होते. परंतु, प्रत्यक्षात जेव्हा मिटर लावले गेले तेव्हा मिटर मध्ये १८ एम.एल.डी पाणी फक्त भाईंदरला येत होते असे सिद्ध झाले. जिल्हाधिकारी स्वतः तिथे ऊपस्थित होते. १३ एम.एल.डी पाणी वर्षानुवर्षे ठाणे महानगरपालिका आपल्याकडून काढून घेत होते. आता ५० एम.एल.डी नवीन योजना सुरू झाली. या योजनेचा खरं रुप जर आपण पाहीले तर त्यांची १०० एम.एल.डी आणि आपली ५० एम.एल.डी या दोन्ही योजना एकत्रित राबविण्यात आलेल्या आहेत असे असताना दोन्ही योजनेचे जे सोर्स आहेत ते वेगवेगळे आहेत लॉ वॉटरचे जे इनटेक आहे ते ठाण्याचे पिसे येथे आहे. सुर्या डॅम वरुन त्याठिकाणी पाणी येत आहे. आणि आपले जे आहे, ते टेमघर-शहाड येथे आहे. शहाडवरुन आपल्याला बारवी डॅमच पाणी येते. ह्या दोन्ही पाईप मधून पाणी आणून एकत्रितरित्या टेमघरला टी.एम.सी. ची आणि आपली स्वतंत्र जलशुद्धीकरण केंद्र आहेत. त्याच्यात जल शुद्धीकरण केल्यानंतर पुढे येणार पाणी दोन हजार एम.एम. च्या पाईप लाईन मधून १०० एम.एल.डी पाणी आपले आणि ५० एम.एल.डी पाणी ठाण्याचे हे एकत्रित एकाच पाईप लाईन मधून येते आहे. त्याच्यापूढे पातली पाडयापासून जी लाईन आलेली आहे त्याच्यामध्ये सुध्दा ठाणे महानगरपालिका आणि आपले पाणी एकत्र येते. पातली पाडयाला आपल्यांना त्यांना वेगळा करायला पाहीजे. अशा प्रकारची व्यवस्था या यंत्रणेत करण्यात आली असताना ५० एम.एल.डी आपले आणि जुने ३१ एम.एल.डी पाणी असे एकूण ८१ एम.एल.डी, ५ एम.एल.डी आपण इतर मुंबई महानगरपालिकेचे असे धरुन ८६ एम.एल.डी पाणी मिळाले तर आजच्या तारखेला शहरामध्ये कुठलेही पाणी टंचाई होता कामा नये. कारण आपल्याला नॉर्म्स ठरवून दिले आहेत. एका माणसाला १०० लिटर आपण शहराची लोकसंख्या ८ लाख धरतो

आणि प्रोटीन पॉप्युलेशन तेवढी नाही. आपल्या टाऊन प्लानिंगचा जो सर्व्हे होता त्याच्यामध्ये प्रोटीन सेन्सेस होतो तो एक लाखाचा धरला होता आणि आता २ लाख झाले असतील. तर आजच्या तारखेला भाईंदर शहरामध्ये जी पाणी टंचाई, त्या ठिकाणी १०० लिटर प्रति माणसाला पाणी मिळत नाही. २०-३० लिटर सुद्धा मिळत नाही. आणि म्हणून ती टंचाई भासते. याचा अर्थ आमच्याकडे ८६ एम.एल.डी पाणी येत नाही. हे १०० टक्के खरे आहे. आता ह्याला सपोर्टींग काय आहे ते मी तुम्हाला सांगतो. सपोर्टींग हे असे आहे की, ज्यावेळी पाणी पुरवठा तपासणीसाठी जे मीटर पातलीपाड्याला लावले गेलेले आहे. ते मिटर कितीतरी दिवसापासून बंद आहे ही दुर्देवाची बाब आहे. हे कोणी मॉनिटर करत नाही. कितीतरी महिन्यांपासून म्हणा दिवसांपासून म्हणा, पण पूर्वी अशी मॉनिटरींगची सिस्टीम होती की, रोज त्याचे रिडींग घ्यायचे. आपला अभियंता जाऊन रोज रिडींग घेत होता आणि आता किती महिन्यापासून किंवा वर्षापासून मॉनिटरींग होत नसल्यामुळे मिटर बिघडलेले आहे आणि मीटर जे आहेत ते १८ साऊंडवरचे मीटर आहेत. ते काय मॅकेनिकल मीटर नाही. पाईपला फक्त दोन वायरी बाहेरून जोडल्या जातात आणि कानाने आवाजाची क्षमता ऐकणारा तसे कानाने किती लिटर क्षमता, किती लिटर पाणी वाहून चालले आहे हे ऐकणारे जे मीटर आहे त्यामुळे त्याच्यावरती कुठल्याही प्रकारचा परिणाम मॅकेनिकल बिघाड वगैरे होऊ शकत नाही. पुन्हा ठाणे महानगरपालिकेचे काही अधिकारी सक्रिय झालेले आहेत आणि तिथल्या क्षेत्रामध्ये ते जास्तीत जास्त पाणी वळवायला लागले आहेत. दुसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, जे संम्प पंपिग सेशनमध्ये जे पंप आमच्यासाठी आम्ही बसवलेले आहेत त्या ठिकाणी आपल्या नवीन योजनेमधला एक एम.बी.आर. आहे. आणि खाली एलिवेटर संम्प आहे. तो एलिवेटर सम्प हा १०० टक्के मिराभाईंदरसाठी आहे. त्याची क्षमता ५० एम.एल.डी जुन्यामध्ये ३१ एम.एल.डी असे करुन ८१ एम.एल.डी चे पाणी आपल्यांना तेथून पुरवठा व्हायला पाहिजे. आता, पंपिग आम्ही करतो. आणि पाणी मात्र ठाणे महानगरपालिका घेत आहे. हे मी तुम्हाला ठामपणे सांगतो. ठामपणे म्हणजे पुराव्यासहित असे पुरावे आम्ही पूर्वी सुद्धा दिलेले आहेत तर ह्याच्यावर आमचे कुणाचेही लक्ष नाही. दुर्देवाने ह्याच्यावर मॉनिटरींग व्हायला पाहिजे. आणि रोजच्या रोज परिक्षण व्हायला पाहिजे. ८१ एम.एल.डी पाणी आमच्या शहराकडे डायव्हर्ट होते आहे किंवा नाही. दुसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, या योजनेमध्ये माझ्या काळामध्ये जे काम झाले होते त्याच्यानंतर ऊर्वरित जी कामे होती मागे एक चांगला विषय मा. ऊपमहापौरांनी आणला होता. घोडबंदर मध्ये टाकी बांधण्याचा तेव्हा काही विरोध झाला. आम्ही त्यांना सपोर्ट केला की, ही टाकी व्हायला पाहिजे. ह्या ज्या टाक्या आहेत आणि सम्प आहेत. ज्या ज्या ठिकाणी सम्प प्रस्तावित केलेले आहेत त्याच्या मागची कल्पना काय आहे ते मी तुम्हाला सांगतो. ह्याच्या पुर्वीच्या योजनेमध्ये सम्प नव्हते. ग्रॅव्हीटीने पाणी आपल्या टाकीमध्ये येईल अशा प्रकारची व्यवस्था असताना जेव्हा जेव्हा पॉवर फेल्युअर होते तेव्हा या ग्रॅव्हीटीचे काही काम लागत नाही. कारण पाणीच येत नाही तर ग्रॅव्हीटी नाही. पॉवर फेल्युअर झाल्यानंतर सम्पमध्ये जे पाणी असेल ते पाणी आपल्याला वापरण्याची सुविधा असेल तर तितके पाणी आपल्याकडे ॲडिशनल राहते. या ठिकाणी दुर्देवाने सगळेच सम्प कुठल्यांना कुठल्यातरी अवस्थेत बंद पडलेले आहेत. गेल्या ४ वर्षामध्ये आपण कोणीही ह्याच्यामागे प्रयत्न केला नाही. ही जबाबदारी एम.जी.पी वर दिलेली आहे. एम.एम.आर.डी.चे कर्ज आहे. एम.एम.आर.डी.कडून एम.जी.पी.ला पैसा मिळत नाही. म्हणून एम.जी.पी. पुढचं काम करत नाही असे मला ऐकिव आहे पण पुर्वी एम.एम.आर.डी. ची हिंमत नव्हती. पैसा न देण्याची त्यांना प्रत्येकवेळी आम्ही प्रेशर आणत होतो की तुम्ही पैसे द्या म्हणजे एम.पी.जी पुर्ण काम करील. आता ही जी सम्पची काम आहेत ती जर आपण केली नाही. तर मघाशी स्थायी समितीचे माजी सभापती तुलसीदासजी म्हात्रे बोलले की, ही तारेवरची कसरत आहे. तर खरचं ही तारेवरची कसरत आहे की, जेव्हा जेव्हा पॉवर फेल्युअर होईल तेव्हा प्रत्येक ठिकाणी म्हणजे ज्या ज्या ठिकाणी सम्प आहेत गोडदेवमध्ये सम्प आहेत, नवघरमध्ये सम्प आहेत, काशीमिरा, शितलनगर, सिल्व्हर पार्क ह्या ठिकाणी सम्प आहेत. वेस्टला सुद्धा सम्प आहेत. हे जर आमच्याकडे झाले जे सम्प आमच्याकडे झाले असते आणि परिपूर्ण अवस्थेमध्ये ते जर काम करत असते तर ह्या सम्पाचे पाणी आम्हाला ॲडिशनल सोर्स म्हणून वापरता आले असते दुर्दैवाने ते झालेले नाही. कृपया, प्रशासनाने त्याच्यावर कार्यवाही करायची आहे आणि ती कार्यवाही त्यांनी करावी. तिसरी गोष्ट अशी आहे की, नुसते ८१ एम.एल.डी किंवा ८६ एम.एल.डी पाणी पूर्णपणे आम्हाला मिळेल आणि आमच्या शहराचा कारभार नीट चालेल अशा प्रकारची अपेक्षा करणे चुकीचे आहे. वाढत्या लोकसंख्येला पुढच्या योजनेमध्ये पाणी कसे जास्त देता येईल ह्याच्याकडे आम्ही जर विचार केला तर मोरबे सारखे स्वप्नातील योजना आम्ही आमच्या डोक्यात ठेवली. मोरबेचे डॅम पुर्ण झाले का? आणि ते डॅम पूर्ण झाल्यानंतर त्याच्यावर जी प्रस्ताविक योजना नवी मुंबईसाठी आहे त्याची आज परिस्थिती काय आहे कुणी अधिकाऱ्यांपैकी इथे सांगू शकेल का? की, नवी मुंबईची मोरब्याची पाणीपुरवठा योजना पुर्ण झालेली आहे. म्हणजे मोरब्याचे पाणी नवी मुंबईपर्यंत आलेले आहे. आता नवी मुंबईमधून फक्त भाईंदरलाच ते पाणी आणायचे बाकी आहे. असे कोणी तरी ठामपणे मला सांगेल का? तर नाही. कारण प्रत्यक्षात नवी मुंबईची सुद्धा ती योजना पुर्ण झालेली नाही. किंवा सुरू झालेली नाही. आता नवी मुंबईची योजना सुरू झाल्यानंतर यात फार मोठी तांत्रिक अडचणही आहे की त्यांचा जो आहे त्यांचा जो एम.बी.आर आहे तो एम.बी.आर तिथे पारसिक टेकडी म्हणून नवी मुंबईमध्ये आहे. त्या ठिकाणी जर तो एम.बी.आर दिला तर त्याच्यानंतर तेवढ्या ऊंचीचा एम.बी.आर कुठेही भाईंदरच्या साईडला आम्हाला मिळत नाही. हा फार मोठा लॅक्युना त्या योजनेमध्ये आहे. तो टेक्निकली आहे. हे जे मी

सांगितले आहे त्या गोष्टीला कोणीही टेक्निकल माणसांनी चॅलेंज करावे. तर त्या योजनेवर आम्ही आज अवलंबून आहोत आणि आजच्या तारखेला नवी मुंबईची योजना कुठे चालू नाही. तर आमची योजना कधी चालू होणार आणि ती योजना पुर्ण होणार कधी? म्हणून मघाशी मा. ऊपमहापौरांनी त्याच्यावर चांगला पर्याय सुचवला. आपण किती तरी ठिकाणी पाण्याचे आम्हाला ॲलोकेशन व्हावे म्हणून कितीतरी लोकांना आम्ही कॉन्ट्रीब्यूशन दिलेले आहे. थोडक्यात बोलायचे झाले तर बारवी डॅमला ऊंची वाढविण्यासाठी आम्ही काही पैसे भरलेले आहेत. ती माहिती आपल्या खात्याकडे आहे. चेना येथे प्रपोझ डॅमसाठी आपण ५ लाख रुपये भूजल सर्व्हेक्षण खात्याला दिलेले आहे. फॉरेस्ट डिपार्टमेंट खो घातला आणि त्यांना तो सर्व्हे करुन दिला नाही. तो सर्व्हे झाला नाही. म्हणून तसे आम्ही फॉरेस्ट डिपार्टमेंटला विचारले तर फॉरेस्ट डिपार्टमेंट असे म्हणाले की, पाण्याचा साठा जर फॉरेस्टला लागून झाला तर आमच्याच प्राण्यांची सोय होऊन जाईल. त्या जंगलातील प्राण्यांची सोय होते पण, मनुष्य प्राण्यांना हे हानीकारक आहे का? तुम्ही हे का अडवत आहात. जर हे सर्वेक्षण झाले तर प्रपोझ चेना येथे आपल्याला छोटा का होईना डॅम बांधता येईल. तिथे १० एम.एल.डी १५ एम.एल.डी पाणी नुसते रिझरवेल म्हणून जर रिझरवेल जरी केला तरी १५ एम.एल.डी. पाणी प्रतिदिन प्राप्त होऊ शकते अशा प्रकारचे सर्व्हेक्षणाचा, भूजल सर्व्हेक्षणाचा पुर्वीचा रिपोर्ट आहे. तिसरी गोष्ट त्यांनी सांगितली की, प्रस्तावित योजनेमध्ये ४ रुपये लिटर पाण्याच्या खरेदीची किंमत आहे. ती योजनेची किंमत नाही. मा. ऊपमहापौरांच्या माहितीसाठी सांगत आहे की, मॉडीफीकेशन आणि ॲमडेमेंट ऑफ दि एक्झीस्टींग स्कीम असे....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजी आपजी सुचना थोडक्यात मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

थोडक्यात काय बोलावं तेच मला सुचत नाही. कारण मी जे काही बोलतोय ती वस्तुस्थिती ज्या ठिकाणी मी पाहिलेली आहे आणि तुम्हाला ह्याच्यावरती पुर्ण तोडगा काढता येईल. अशा प्रकारची वस्तुस्थिती सांगत आहे. मी कोणावरही टिका करत नाही. किंवा मी कोणाचे विक पॉईंट सांगत नाही. जर तुम्हाला आताच्या योजनेमध्ये वाढीव पाणी जर घ्यायचे असेल तर शहाड इंन्टेकला ५० एम.एल.डी. पाणी आपण बारवी डॅममधून ॲडिशनल मागवुन घ्यावे एम.जी.पी.कडे पाठपुरावा करावा. सत्ताधारी पक्षाची सत्ता महाराष्ट्र शासनामध्ये आहे. तर ५० एम.एल.डी. पाणी जर बारवी डॅममधून आम्हाला शहाडमध्ये ऊपलब्ध केले तर तिथे असलेल्या पाण्याच्या पाईपलाईन्सची क्षमता ही १८३० एम.एम. पाईपलाईन्स आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपल्याला या विषयावर स्पेशल मिटींग लावायची आहे. त्यावेळेस आपल्यांला सविस्तर सर्वांना चर्चा करण्यांस वेळ देण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी माझा मुद्दा संपवतो. कारण मला वाटतं नाही आपण ऐकण्याच्या मनस्थितीत आहात तर मी विषय संपवतो. कारण त्या दृष्टीने कदाचित आपल्या शहराच्या दृष्टीने मी सांगत असलेला विषय अतिशय महत्त्वाचा ही नसेल कदाचित तो आपल्या सभेमधून घ्यायचा असेल. परंतु, अशी योजना शहाड इंटेक मधून आपण स्पेशली राबवून या योजनेमधून सध्याच्या असलेल्या पाईप लाईन्समधून कुठलीही पाईप लाईन्स आपल्याला नवीन टाकावी लागणार नाही. टाक्या सुद्धा नाही, फक्त पंप सेट नवीन बसवावे लागतील. अशाप्रकारे मी या ठिकाणी सुचना केलेली आहे आणि मला सुचना मांडायला खास करुन वेळ दिला. सगळ्या गडबडीच्या काळात सर्व लोकांना बोलायचे असताना सुद्धा आपण मला जास्त वेळ दिला त्याबद्दल आपल्या सर्वांचे मी धन्यवाद करतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला परवानगी दिलेली आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आपल्याकडे परवानगी मागितली होती. माझ्या नंतर कमीत कमी पंधरा जण बोलले. परंतु, मला काही बोलायला दिले नाही. मॅडम, आमची इच्छा असते. आम्हालाही बोलायला दोन मिनिटे दिली तरी चालतील.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. नगरसेवक माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब, जे बोलले त्याला अनुसरुनच मी या ठिकाणी बोलत आहे की, मा. ऊपमहापौरांनी जी लक्षवेधी सुचना आणलेली आहे ती एका प्रकारच्या बर्निंग लिस्टवर आणलेली आहे. अतिशय ज्वलनशील विषय असल्यामुळे आपण एक मिटींग देखिल लावत आहात. मला फक्त या ठिकाणी काही सुचना मांडायच्या आहेत. आपण माझ्या सुचना नोट करुन घ्या आणि पुढच्या मा. महासभेमध्ये किंवा आपण जर विशेष सभा लावाल त्याच्यामध्ये कृपया मला ऊत्तर द्याल. जे हिरानंदानी कॉम्लेक्स ठाण्यामध्ये आहे. फक्त तेच आपले पाणी चोरी करतात असे नाही. त्याच्या थोडेसे पुढे आल्यावर आझाद नगर म्हणून एरिया आहे त्याठिकाणी सुद्धा पाणी चोरी केली होती. मा. कलेक्टर साहेबांच्या निर्देशनामध्ये त्यावेळी आणलेलं आहे त्यांच्यावर गुन्हा देखील दाखल केलेला आहे आणि मिरा

भाईंदर महानगरपालिकेचे मुख्य अधिकारी त्याठिकाणी जाऊन निर्देशनास आणलेले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे भाईंदर पश्चिमेला सुदामा नगर येथे गंगाधरजी गाडोदिया पाणी कुंभ आहे. जो पाण्याचा टँक आहे त्याच्याखाली जो संप आहे त्याचे काम सध्या एक महिन्यापूर्वी चालू झालेलं आहे. पण, नेताजी सुभाष मैदानात मोठी पाण्याची टाकी आहे जी ऊत्तनच्या भागाला जाणारी पाण्याची टाकी आहे त्याच्या खाली देखिल आपण सम्प बनवायला घेतले आहे. त्याचे देखील काम अर्धवट बंद पडलेले आहे. कदाचित एम.एम.आर.डी.कडून आपल्याला जे कर्ज मिळणार होते ते एम.जी.पी.च्या माध्यमातून किंवा एम.एम.आर.डी.च्या किंवा फायनान्समध्ये जर अडचणी येत असतील तर मिरा भाईंदरची जनता सत्ताधाऱ्यांना किंवा कुठल्याही नगरसेवकाला माफ करणार नाही. आपण सन १९८१ पासून वेळोवेळी आंदोलनच्या माध्यमातून बघितलेले आहे तरी माझी आपल्याकडे नम्र विनंती आहे की, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथील पाण्याचे सम्प आहे त्याच काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मनपा के आर्थिक निधी से यह टाकी का काम चालू हो गया है। यह बोलने के हिसाब से अपनी निधी से अपना ठराव पास करके सारी टाकीओंका काम दुबारा से चालू हो गया है।

**दिनेश नलावडे :-**

धन्यवाद, चौहान साहब, मा. महापौर मॅडम, पाण्याविषयी या शहरातील मोठ्या समस्येवर भरपूर चर्चा झाली. मा. ऊपमहापौर साहेबांनी लक्षवेधी या सभागृहामध्ये आणलेली आहे. त्याबद्दल सर्वांनी त्याचे आभार मानले आहेत मी देखील त्यांचे आभार मानतो. मा. महापौर मॅडम, ह्या शहरामध्ये २००० पर्यंत पाण्याची अवस्था फार बिकट होती. अनेक आंदोलने झाली. ज्यावेळी ही नगरपालिका असताना नगराध्यक्ष म्हणून मा. प्रफुल्ल पाटील साहेब हे ज्यावेळेस अध्यक्ष स्थानी आले त्यावेळी मुख्य अधिकारी म्हणून मा. संपतराव शिंदे साहेब या ठिकाणी होते. त्यांच्या आदेशानुसार आणि नगराध्यक्ष मा. प्रफुल्ल पाटील साहेबांच्या आदेशानुसार मा. महापौर मॅडम, त्यावेळेला २००० मध्ये मा. आर. आर. पाटील पाणी पुरवठा मंत्री होते. त्यावेळेला आम्ही देखील तेथे प्रयत्न करुन विधानभवन मध्ये, विधानपरिषदेमध्ये जाऊन आम्ही मिटींग घेतली त्यावेळी मा. आर. आर. पाटील साहेबांच्या वतीने त्या ठिकाणी सन २००० मध्ये चांगली मिटींग झाली. नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब त्यावेळी होते. मा. महापौर मॅडम, आपण थोडीशी मा. आर. आर. पाटील म्हणजे आबा. आबांबरोबर आमची मिटींग झाली. अतिशय चांगली मिटींग मुख्याधिकारी मा. शिंदे साहेब, नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब होते, सन्मा. शशिकांत भोईर साहेब होते, प्रभात पाटील मॅडम होत्या. चांगले काम केले त्याच्यानंतर त्यांच्या प्रयत्नाने....

**रतन पाटील :-**

शिवशाही संघटना होती आणि शिवशाही सरकारने प्रयत्न केले होते तेही आपण बोला.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय गंभीर आहे. ५० एम.एल.डी पाणी आपल्याला सन २००० मध्ये मिळाले ह्याच्या अगोदर ३१ एम.एल.डी पाणी मिळत होतं. आज लोकसंख्या कमीत कमी आठ ते साडे आठ लक्ष झालेली आहे. आज आपल्यांना ८१ ते ८२ एम.एल.डी पाणी मिळत आहे. मा. महापौर मॅडम, आपली पाण्याची जी पहिली लाईन आहे ३१ एम.एल.डी ती आता सध्या कार्यान्वित नाही. ती बंद आहे. नवीन पाण्याची पाईप लाईन ५० एम.एल.डी. पडले त्यातून आपल्याला संपूर्ण पाण्याचा पुरवठा केला जातो. त्याही पाण्यामधून त्याही पाईपलाईनमधून आपल्यांना एक्स्ट्रा पाणी मिळू शकते आणि पहिली ३१ एम.एल.डी. ची पाण्याची पाईप लाईन आपल्याकडे पडली आहे. कमीत कमी अजून ८० ते ९० एम.एल.डी पाणी पुरवठा याच पाईप लाईन मधून मिळू शकतो. आज लक्षवेधी आणलेली आहे. त्याच्यावर मा. महापौर मॅडम आपण बारवी डॅमच ऊंची वाढविण्याचे काम चालू आहे. पाणी पुरवठा विभागामार्फत आपला पत्रव्यवहार चालू आहे. तर बारवी डॅमच काम चालू असल्याने आपल्यांना एक्स्ट्रा पाणी मिळू शकते. जर आपण सर्वांनी आज तुमच्या कारकिर्दीमध्ये तुम्ही या ठिकाणी असताना अजून आपला कारकिर्द एक वर्षाचा आहे. जर तुम्ही प्रयत्न केले तर निश्चितपणे आपल्या या शहराला ५० एम.एल.डी. पाणी कमीत कमी जास्त मागवू शकतो. मा. महापौर मॅडम, आज प्रभाग समिती क्र. ३ चा अध्यक्ष आहे. मी आपल्यांना निश्चितपणे सांगू इच्छितो, गोल्डन नेस्ट, क्विन्स पार्क, जैन शांती पार्क, रामनगर, रामदेव पार्क, हिडन रोझ कॉम्प्लेक्स, सुंदर नगर, सुंदर सागर ह्या परिसरात रोजच्या रोज टँकर चालू आहे. आपण ही समस्या सांगितली आहे की, या शहरामध्ये टँकर बंद झालेले आहे. परंतु, ही परिस्थिती तशी नाही. संपूर्ण शहरामध्ये भाईंदर ईस्टला भाईंदर प्रभाग क्र. ३ ला आज देखील टँकर चालू आहेत. आपण लवकरात लवकर हा प्रश्न हाताळण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली आपण आणि मा. ऊपमहापौर वैती साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आपली महाराष्ट्रामध्ये सत्ता आहे. आपली सत्ता केंद्रामध्येही आहे.

**रतन पाटील:-**

अगोदर पाणी आणा.

**दिनेश नलावडे :-**

आणि या पाण्याचा प्रश्न फार लवकर मिटेल सत्ता आहे आणि आम्ही पाणी आणू.

**रतन पाटील :-**

आज या आम्ही सगळे येतो आपल्या बरोबर.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, एरिगेशनचे चिफ इंजिनियर श्री. बाबर साहेब आहेत. कळव्याला कार्यकारी अभियंता श्री. मुसळे साहेब आहेत. कमीत कमी जर आपण त्यांची भेट घेतली तर बरे होईल. आम्ही त्यांची भेट घेऊन आलेलो आहोत. आपण सर्वांनी प्रयत्न केले तर आपल्यांना लवकरात लवकर ५० एम.एल.डी पाणी मिळेल आपण ह्याच्यावर निश्चितपणे लक्ष द्याल आणि हा पाण्याचा प्रश्न आपल्याच नेतृत्वाखाली सुटेल अशी आम्ही आशा बाळगून आपण याचे पुढाकार घेऊन पाण्याचा प्रश्न सोडवाल एवढीच मी आपल्यासमोर आशा व्यक्त करतो.

**रतन पाटील :-**

पाणी पाहिजे कृती नको. मिरा भाईंदर लोकांसाठी पाणी पाहिजे.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. प्रभाग समिती क्र. ४ चे सभापती श्रीम. नुरजहाँ नजर हुसैन (मम्मी) ह्यांचे देखील मी नाव घेत आहे. आपल्या काकाच्या आदेशाप्रमाणे मी मम्मीचे देखील या ठिकाणी नाव घेतो. तसेच 'काका' ह्यांचे ही नाव घेतो.

**प्रभात पाटील :-**

मघाशी मी बोलले की सभागृहामध्ये गोंधळ झाला. तर मा. ऊपमहापौरांची लक्षवेधी स्विकारली आणि तिला आपण विषयाचे स्वरुप देणार आहोत. येणार जे पाणी आहे. माझा मुळचा प्रश्न आणि मला असं वाटतं मघाशी सभागृहात बोलणाऱ्या सगळ्यांचा प्रश्न असा होता की, आपण पाणी वाढवून घेऊ आणि घेणारचं. त्यासाठी सगळेच प्रयत्नशील राहणार आहेत. परंतु, आज शहरामध्ये जी परिस्थिती आहे, मॅडम त्यांचे निवेदन कुठेही झालेलं नाही. जे येणार पाणी होते ते गेले कुठे, आणि आज शहरात पाणी कमी आहे ती परिस्थिती आणखीन किती दिवस चालणार आहे आणि त्या पाण्याचे काय होतं आहे? नेमकं काय आहे ते सदस्यांना कळावे अशी मी मगाशी आपल्यांना विनंती केली होती. आज परिस्थिती खराब आहे. कृपया, त्याच्याविषयी आपण काही सांगावे आणि काय सुधारणा होईल याची माहिती द्यावी.

**शिवाजी बारकुंड (पा. पु.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे, या बाबतीत गेले २० दिवस शहाड, टेमघर, स्टेम ॲथोरिटी कडून मिराभाईंदर साठी पाणी येत होते. त्याच्यामध्ये कमालीची घट झालेली आहे. त्यामुळे पुर्ण शहरभर पाणी टंचाईची परिस्थिती आहे ही वस्तुस्थिती आहे. याबाबत काल गर्व्हनिंग समितीची बैठक होती. मा. सभापती साहेब स्थायी समिती, सन्मा. शशिकांत भोईर, सन्मा. सदस्य रतन पाटील, सन्मा. रोहिदास पाटील (काकांना) मी फोन केला होता परंतु, त्यांना काही महत्त्वाचे काम असल्यामुळे ते आले नाही. ही सर्व वस्तुस्थिती स्टेमच्या अधिकाऱ्यांना, ठाण्याचे सदस्य सचिव श्री. लाला साहेब, मा. आयुक्त सेठी साहेब या सर्वांना मी स्वतः ही बाब कानावर घातलेले आहे. त्या संदर्भात पत्रव्यवहार ही केलेला आहे. आणि सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेबांनीही मुद्दा ऊपस्थित केला. आज जे पातली पाड्यावरुन मिरा भाईंदरसाठी येणार जे पाणी आहे त्याच्यावरुन हिरानंदानी आणि त्याच्या पुढच्या सगळा भाग आहे आणि तो सगळा अनमिटर आहे आणि हे सर्व पत्रव्यवहारांनी मी, मा. आयुक्त साहेब, मा. शिंदे साहेब असल्यापासूनच हे पत्रव्यवहार चालू आहेत आणि डी.जी. शेड बाबत आम्ही त्यांना सांगितले की, इलेक्ट्रिक पॉवर किंवा अन्य पर्यायी व्यवस्था ठाणे कमिशनर यांनी मिटींग मध्ये विरोध केला की, डी.जी. शेड परवडण्यासारखे नाही. परंतु, तिथे आम्ही भांडलो आणि म्हणालो डी.जी. शेड नसेल तर अन्य पर्यायी व्यवस्था करा. जेणेकरुन पॉवर सप्लायमुळे पाणी खंडीत होणार नाही. ही सगळी वस्तुस्थिती काल गर्व्हनिंग समितीच्या बैठकीत ह्याच्यावर सिरीयस चर्चा झाली. आणि आज जे चेन्याचे मिटर आहे तिथे स्टेमचे अधिकारी आलेले आहेत. सकाळी १०.३० वाजता त्यांचा फोन होता की आम्ही आलेलो आहोत मिटरचे काम करतोय आहोत. गेली चार दिवस मिटर बंद होता, नंतर परत बंद होता आणि पातली पाड्याचेही मिटर बंद आहे ही सर्व वस्तुस्थिती रायटिंग मध्ये त्यांच्या लक्षात आणून दिलेली आहे. तर त्यांनी कालच्या सभेमध्ये सांगितले की, लवकरात लवकर सुधारणा करु आणि येणारे पाणी कमी असल्यामुळे थोडे डिस्ट्रीब्युशनला अडचण होत आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आप की इजाजत से बोलना चाहूँगी।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, चेन्याच्या मिटरमधून आपल्याना ८६ एम.एल.डी पाणी , पातली पाड्याचा चर्चेचा विषय ठिक आहे. पण चेन्याच्या मिटरमधून ८६ एम.एल.डी पाणी मिळाले आपल्या हद्दीमध्ये आपलं पुर्ण पाणी आले. वितरण करायला ते सक्षम आहे. चेन्याच्या मिटरमध्ये किती पाणी आहे तेच माहिती नाही. आपण येथे दोन गोष्टी बद्दल बोलतो, जसे साप समजून दोर कुटतो, तसे आपले चालले आहे. आज सम्पचा ही विषय नाही. तुमच्या पोत्यातच नाही तर कणग्यात कुठून टाकणार. तुम्ही कोणत्या सम्पमध्ये पाणी ठेवणार? येणारे पाणीच पुरत नाही. सम्प, सम्प करुन खर्चाच्या बाबी तुम्ही काढू नका. नाहीतर ही लोक लगेच परवानगी

देतील त्याचेही टेंडर काढतील आणखी दुरूस्ती करा म्हणून. सम्प हा विषय नाही. जर पाणीच येत नाही तर सम्प, सम्प म्हणून काय लावले आहे.

**सुधा गोयंका :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी (काका) पानी आ रहा है। कहीपर तीस घंटोसे पानी पहुचाया जा रहा है। कही पर ३२ घंटोसे पानी पहुचाया जा रहा है। लेकीन केबिन रोड पे ४४ घंटोसे पानी पहुच रहा है यही मेरा प्रश्न है।

**रोहिदास पाटील :-**

८६ एम.एल.डी पाणी चेन्ना येथे येत आहे. तिथे ऊभे राहून तुम्ही त्याची खात्री करा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, तुम्ही तिथे ऊभे रहा. ८६ एम.एल.डी पाणी येते की नाही ते बघा. आपली यंत्रणा सक्षम राहिल. ते पाणी देतील.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मेरा वही प्रश्न था। पानी कही पे ३० घंटेमे पहोच रहा है। कही पे ३२, केबिन रोड पे लगातार एक महिनेसे ४० के ऊपर पानी पोहच रहा है इसका कारण क्या है? ४० घंटे के बाद ही पानी मिल रहा हे।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. ऊपमहापौर साहेबांच्या लक्षवेधीप्रमाणे आगामी काळामध्ये खास सभेचे आयोजन करायचे आहे. सगळी चर्चा आजच्या सभेतच झाली तर खास सभेत काहीच चर्चा होणार नाही.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मुझे बस इतनासा खुलासा करवाके दिजीए की, मेरे ही वॉर्ड मे पानी इतना लेट क्यों आ रहा है?

**प्रभात पाटील :-**

आगामी भविष्याविषयी बोलत नाही. तो विषय येईल तेव्हा ती चर्चा होईलच. परंतु, आपले सन्मा. अभियंता यांनी कबूल केले आहे की, तिथे पातली पाड्याच्या सम्पच्या येथे ठाणे महानगरपालिका आणि आपण जॉइंट आहोत. तिथेच काहीतरी गडबड आहे आणि अशी जर गडबड असेल तर सन्मा. प्रफुल्ल पाटील नगराअध्यक्ष असताना ती चोरी व्यवस्थित पकडली होती. आपल्यामध्ये ते सन्मानीय सदस्य आहेत. त्यांनी काम केलेलं आहे. तुम्ही आम्ही सुद्धा सक्षम आहोत. पुन्हा एकदा ती चोरी पकडण्यासाठी आपल्या सर्वांना ऊतरावे लागले तर मला वाटते की, सभागृहाची कुठेही ना नसेल आणि आपण सगळ्यांनी मिळून हा प्रश्न हाताळावा आणि ती चोरी पकडून आपले पाणी आपल्या शहरात येईल इथंपर्यंत काहीतरी प्रयोजन करण्याची कृपया या सभागृहाने काहीतरी तजबिज करावी. एवढी विनंती आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, ह्यांना सांगू इच्छितो की, मा. आयुक्त साहेब पूर्वी आपल्या ५-६ वर्षापूर्वी असाच हा घोळ झालेला होता. आणि तो मोठ्या प्रमाणावर होता. मा. शिंदे साहेब असताना त्यांनी मारही खाल्ला होता. आता मला ते दिवस दिसायला लागले आहेत. सध्या तरी चार-पाच मोर्चे झालेतं आणि दिवाळी आता तोंडावर आलेली आहे. तरी आपले सर्व कार्यकारी आणि पाण्याचे अभियंता सर्वांनी या पाण्याच्या समस्यांच्या मागे लागून पाणी कसे सुरळीत मिळेल ह्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्यांना सांगतात, एम.एस.ई.बी.ची लाईट गेली, तर चार-पाच दिवस गोंधळ चालतो. ह्याच्यासाठी मी सांगतो की एक नाही, दोन नाही, तर तीन जनरेटरर्स आणा. आणि तो कायमचा चालू ठेवा. एक जनरेटर बंद झाले तर दुसरे, दुसरं बंद झाले तर तिसरं. पाणी सतत आले पाहिजे. याच्या साठी आजच्या आज पैसे लागून द्या आणि तीन जनरेटरर्स मागवून घ्या. म्हणजे पाण्याचा प्रश्न सुटेल. कारण अधिकाऱ्यांना बोलायला मिळते की, लाईट गेली म्हणून पाण्याचा बंदोबस्त खंडीत पडला आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य बोलत आहेत ते बरोबर आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दिवाळी-दसरा आला आहे. दिवाळी पूर्वीच पाण्याची सुरळीत व्यवस्था होऊन सर्व प्रभागामध्ये, सर्व वॉर्डामध्ये सर्वांना पाणी मिळाले पाहिजे ही मी विनंती करत आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मुझे जरा खुलासा करवाके दिजिए ना। मेरे इधरही इतनी तकलिफ हो रही है। मेरे ही वॉर्ड मे इतनी तकलिफ क्यों हो रही है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या सुधा गोयंका यांनी ऊपस्थित केलेला प्रश्न त्यांच्या विभागात पाणी कमी आहे. पाणी विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन त्या विभागात पाणी का कमी आहे. इतर काही जी कारणे आहेत ती शोधून काढून पाणी व्यवस्था सुरळीत करुन द्यावे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५९ चे वाचन केले.)

**संगिता म्हात्रे :-**

सचिव साहेब, हा जो प्रभाग अध्यक्षांचा कालावधी आहे त्यात कोण अध्यक्ष आहेत, कोण कोणत्या पदावर आहेत ते दिलेले नाही. कालावधी, नावांचा पदांचा ऊल्लेख करण्यात यावा.

**शुभांगी म्हात्रे :-**

सन्मा. सचिव साहेब, इतिवृत्तांत कुठचा घेत आहात १८/४/०६ चा घेता की, नंतरचा घेत आहात.

**नगरसचिव :-**

दि. १८/४/०६ च्या इतिवृत्तांचे वाचन करत आहे.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. ४१ वर, हे सत्ताधारी बाहेर जावे तर सत्ताधारी शब्दात दुरूस्ती करावी.

**केशव घरत :-**

सचिवजी पान क्र. ३३ वर द्यायचे तिथे शाळेला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ६१ वर जो ठराव आहे त्याला अनुमोदन मी दिले होते. त्याच्यावर अनुमोदन देणाऱ्या कोणी दुसऱ्याचेच नाव आहे. ६१ च्या ठरावाला अनुमोदन मी दिलेले आहे. ५९ पानांवरती मा. महापौरांचे रुलिंग पण आहे. आणि सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस हे सुचक आणि सन्मा. प्रफुल्ल पाटील हे अनुमोदक राहतील. ठराव एकमताने मंजूर असे मा. महापौराचे रुलिंग आहे. ह्या ठिकाणी अनुमोदन जे आहे ते माझे आहे.

**नगरसचिव :-**

सदरची दुरूस्ती करण्यात येईल.

**रोहित सुवर्णा :-**

पान नं. ७३ वर ७ वी लाईन ज्या ठिकाणी भारतीय जनता पाटील झालेले आहे. त्या ठिकाणी भारतीय जनता पार्टी पाहिजे आणि त्याचाच पुढे जनता पार्टी असं झालेले आहे. तर जनता दल सेक्युलर असे पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

पान ७९ वर सार्वजनिक रस्ते घोषीत करण्याचा विषय होता. तेथे तुम्ही म्हटलेलं आहे लोकांच्या मालकीच्या जागा आहेत त्या जागेचा मधला टी.डी.आर देणार की एफ.एस.आय अशी माझी सुचना होती. ठरावात तसे काहीच नमुद झालेले नाही आणि आज तो विषय पुन्हा एकदा सभेत चर्चेला आला आहे. विषयपत्रिकेमध्ये विषय आहे हे आपण नियमावलीमध्ये बदल करतो. त्यात मी मांडलेल्या सुचनेचा कुठे अंर्तभाव नाही तर तुम्ही तसा ठरावात अंर्तभाव करण्यात यावा कारण तिथे मालकीची जागा आहेत. आणि मी सुचना केली होती की, तुम्ही त्या लोकांना काय देणार ह्याचा त्या ठरावामध्ये ऊल्लेख व्हायला हवा. परंतु, तो जो ठराव आहे. त्याच्यामध्ये तसा कोणताच ऊल्लेखच नाही. त्यात बदल करुन घ्या. अन्यथा मग तिथले शेतकरी मरतील.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ९० वर शशिकांत शहा यांचे संभाषण होते पण तिथे शशिकांत भोईर असे लिहले आहे.

**नगरसचिव :-**

दि. १८/०५/०६ च्या इतिवृत्तांचे वाचन करत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सचिव साहेब, पान नं. ३४ वर त्याठिकाणी पॅरेग्राफ मध्ये खुप चुका आहेत म्हणून मी सगळा पॅरेग्राफ वाचून दाखवतो. मा. महापौर मॅडम, या ठिकाणी मी आपल्या निर्देशनात आणू इच्छितो की, कलम २० यू.एल.सी. ॲक्ट नसुन यु.एल.सी ॲक्ट आहे. १९७६ च्या नियमाप्रमाणे परत यु.एल.से. झाले. ते यु.एल.सी. करा. अंर्तगत शांती नगर बिल्डरर्सला डेव्हलपर्स करण्यासाठी हाऊसिंग स्किम फॉर विकर सेक्शन म्हणून आपण जी शांतीनगर स्किम डेव्हलप केलेली आहे त्या स्किमच्या वेळोवेळी १९७६ पासून ग्रामपंचायत होती. नंतर १९७८ मध्ये त्यावेळी मा. यशवंत भोईर सरपंच होते. त्या गावाचे त्यावेळी पासून वेळोवेळी त्यांना बिल्डिंग आणा म्हणजे त्या स्किमला इमारती आपण कमेन्टमेन्ट नाही कमेन्समेंट सर्टीफीकेट देताना काही अटी-शर्ती घातलेल्या आहेत. प्रशासक ओ. बी. भगत असे प्रशासक ओ. बी. भगत साहेब असताना देखील १९८८ मध्ये आपण त्या अटीशर्तीनुसार चार सुविधा त्यांनी आपल्यांला बनवून द्यायचे होत्या. आजपर्यंत पुर्ण झालेल्या नाहीत. तर ती आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, १०० फिटी पाहिजे १०० पैकी नाही. १०० फिटी १०० फिट डी.पी. रोड त्या ठिकाणी बी.पी.रोड झाले आहे तेथे डी.पी.रोड करण्यात यावे. डी.पी.रोड त्या ठिकाणी करण्यात यावे. डी.पी.रोड हा शांती नगरच्या स्किम मधूनच जातो. ते देखील शांती स्टार बिल्डरने डेव्हलप करुन आपल्याला डेव्हलप करुन द्यायचे आहे. तसेच, सार्वजनिक दवाखाना, सार्वजनिक वाचनालय १०० फिटी डी. पी. रोड व विभागीय कार्यालय हे शब्द त्यात आलेले नाहीत. कृपया, आपण ते ॲड करुन घ्यावेत. पान क्र. ३५ नंबर मध्ये ज्या ठिकाणी मी बोलतोय पहिला, दुसरा, तिसरा आणि चौथ्या वेळी ज्या ठिकाणी मी बोलत आहे तेव्हा ते शामिल पाहीजे अन्यथा समाविष्ट असे पाहिजे तर त्या ठिकाणी सहमत असे झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सचिव साहेब, दुरूस्तीची सुचना होती पान क्र. ४१ व ४२ वर (१) दिपक हॉस्पिटल समोरील जंक्शन, (२) हटकेस ऊद्योग नगर येथील जंक्शन, (३) नताशा पार्क साई सर्व्हिस समोरील दुभाजक प्रवेश, मा. पोलिस अधिक्षक, ट्रॅफिक डिपार्टमेंटच्या परवानगीने सुरू करण्यात यावा अशी सुचना होती कृपया ती सुचना ॲड करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. आयुक्त साहेबांना गोल्डन नेस्टसमोरचेसुद्धा एक पत्रक दिले होते. ज्या वेळी रस्ता दुभाजक बंद करण्याचे काम सुरू केले. त्यावेळी तेथील नागरिकांची जी कुचंबणा चालली होती त्या अनुषंगाने मी एक पत्रक सन्मा. आयुक्त साहेबांना दिलेले होते. परंतु, मा. महासभेमध्ये ठरल्याप्रमाणे जे दुभाजक रस्ता क्रॉसिंग सोडून इतर सर्व दुभाजकांना मान्यता मिळालेली होती त्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत ते काम केलेले होते. तर त्या वेळेला माझ्या सुचनेचा सुद्धा विचार केलेला नव्हता. गोल्डननेस्टचा जो फ्लायओव्हरचा सिग्नल पासून ते शिवार गार्डन पर्यंत थेट मनुष्य वळायला जातो. फक्त मध्ये जी आपण बसेसची सेवा सुरू केली. त्यामुळे आपण तो दुभाजकावर सुरू केला. अन्यथा बाकी सगळे दुभाजक आपण बंद केलेले आहेत. ज्या प्रमाणे मा. महासभेने मान्यता दिली होती त्याचप्रमाणे ते दुभाजक बंद केलेले होते.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, रस्ता दुभाजकांच्या वेळेला हे सुद्धा मा. महासभेत ठरले होते की, तिथे जे असणारे सिग्नल पासून ते साईबाबा मंदीर पर्यंत असणारे टेम्पो वाले आहेत त्यांना सुद्धा हटवणार.

**मोहन पाटील :-**

त्या दुरुस्त्या ह्याच्यामध्ये कशा येतील? आपण त्यावेळी जो ठराव केला....

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही स्थायी समिती मध्ये असताना साईबाबा मंदीर पासून सिग्नल पर्यंत जे...

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी ज्या दुरूस्त्या सुचवल्या आहेत त्या दुरूस्त्या ह्याच्यामध्ये ॲड कशा होतील? पान क्र. ४२, ठराव क्र. २२ मध्ये ज्या पद्धतीने आपण यात नमुद केले आहे की, ह्याच्यामध्ये दुरूस्त्या कुठे आहेत?

**शशिकांत भोईर :-**

मी सुचना केली होती आणि माझे भाषण वगळले गेलं आहे.

**मोहन पाटील :-**

हा ठराव केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मी स्थायी समितीमध्ये मी सुचना केली होती की माझे भाषण वगळलेले आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळेला काशिमिरा ते साईबाबा मंदीर पर्यंतचा दुभाजक बनवण्याचे काम चालू होते. त्यावेळेला सिग्नल पासून ते साईबाबा मंदीरपर्यंत....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नाही. आपण बसून घ्या. इतिवृत्तांत झालेला आहे ठराव मांडू द्या. आपल्याला नंतर बोलण्याची संधी मिळेल आता तो विषय नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

ऑलरेडी तो ठराव झालेला आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तिथे अतिक्रमण आहे तेथे टेम्पो लावलेले आहेत...

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**रतन पाटील :-**

आम्हाला बोलू द्या.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ५९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वांनुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ५९ :-**

दि. १८/०४/२००६, दि. १८/०५/२००६ (तहकुब) व दि. १८/०५/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४७ :-**

दि. १८/०४/२००६, दि. १८/०५/२००६ (तहकूब) व दि. १८/०५/२००६ (दि.१८/०५/२००६ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, मघाशी मा. महापौरांच्या निर्णयाने व सर्व सन्मा. सदस्यांच्या संमतीने प्रकरण क्र. ६९ ला अगोदर अग्रक्रम देण्यांत येत आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६९ चे वाचन केले.)

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे, मा. आयुक्त साहेब आपल्यालाही माझी विनंती आहे. आपले जे लिपिक कर्मचारी आहेत. हा विषय नाही. पण, मला थोडेसे ह्या विषयाबद्दल बोलायचे आहे. ज्यांना १२ वर्षे होऊन गेले आहेत त्यांना अजून सेवाजेष्ठता मिळाली नाही. जे परमंन्ट आहेत. त्यांना काहीच मोबदला मिळालेला नाही आणि मी हा विषय ह्यासाठी इथे आणला की, श्री. संजय पाटील (लिपिक) आहेत त्यांना मानसिक त्रास होत आहे. तर तो त्रास दुसऱ्यांना होऊ नये ह्यासाठी आपण विचार करायला पाहिजे. ह्याविषयी आपण माहिती द्यावी. सेवाजेष्ठता आपण कधीपासून देणार? १२ वर्ष झाली आहेत त्यांना देणार की, एल.एस.जी.डी. केल्यानंतर ? तसेच ज्यांना १ वर्ष झाले आहेत व त्यांनी एल.एसएजी.डी. केली आहे त्यांना घेणार की, ज्यांना १२ वर्ष झाली आहेत त्यांना घेणार?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जी माहिती विचारलेली आहे त्या संदर्भामध्ये खुलासा करु इच्छितो की, कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठतेच्या बाबतीमध्ये हरकती सुचना मागवल्या होत्या आणि त्या हरकती सुचना ज्यांच्या ज्यांच्या प्राप्त झालेल्या होत्या त्यांची त्यांची सुनावणी घेतलेली आहे आणि सुनावणी घेऊन अंतिम यादी पब्लिश करायची आहे. आपल्याला वर्तमानपत्रात पब्लिश करायची आहे आणि ती यादी झाल्यानंतर त्यांना जे काही बेनिफिटस् किंवा जे काही फायदे द्यायचे आहेत ते आपण त्यांना देणार आहोत.

**संगिता म्हात्रे :-**

हा त्रास एकाला झालेला आहे आणि दुसऱ्याला होऊ नये ह्याच्यासाठी आपण लवकर विचार करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कोणाला काय त्रास झाला आहे?

**संगिता म्हात्रे :-**

श्री. संजय पाटील (लिपिक) यांना याच कारणामुळे त्रास होत आहे.

**मा. आयुक्त :-**

श्री. संजय पाटील यांना त्रास होत आहे म्हणजे नेमके काय होत आहे?

**संगिता म्हात्रे :-**

त्यांना सेवाज्येष्ठता प्रमाणे घेण्यात आलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

सेवाजेष्ठता प्रमाणे जरी त्यांना घेण्यात आलेले नाही म्हणजे......

**संगिता म्हात्रे :-**

१२ वर्षे होऊन गेल्यानंतर......

**रिटा शाह :-**

साहेब, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, आमचे किती कर्मचारी असे आहेत की, सेवाज्येष्ठताची आपण डेफिनेशन काय ठेवणार आहात? एका महानगरपालिकेमध्ये जास्त वर्षे काम करणारा माणूस, की ज्याने

एल.एस.जी.डी. केले आहे. ते कम्प्लसरी करुन त्यांनी जास्त सेवा दिली आहे असा कर्मचारी ह्याच्यामध्ये मा. केळकर साहेब होते तेव्हाही हा वाद निर्माण झाला होता. तेव्हा त्यांना एल.एस.जी.डी. कम्प्लसरी नाही असे काहीतरी रिमार्क दिला होता. मा. महापौर मॅडम, आपल्याला एक रिक्वेस्ट आहे की, हा जो विषय आहे तो आपण विषय पटलावर आणून काही कर्मचाऱ्यांचे ह्यामध्ये खूप प्रश्न आहेत तर आपण विषय पटलावर हा विषय आणून त्यावर साधक बाधक चर्चा करु.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, असे वेतनश्रेणी मध्ये डावलले गेले असेल तर त्या लोकांचा निर्णय घेणे गरजेचे आहे. श्री. संतोष पाटील, श्री. देविदास पाटील हे अनेक वर्षे काम करत आहेत. आपण त्यांना पगार देतो, त्यांचा कुठेही ठिकाणा नाही. कोणत्या प्रमोशन मध्ये नाही. कशातही नाही. म्हणजे त्यांना पगार मिळत आहे कामही करत आहेत. पगार महानगरपालिका देत आहे. पण रेकॉर्डवर कुठेही नाही. हे कसे काय? बारा-बारा, चौदा-चौदा वर्षे झाली आहेत.

**संगिता म्हात्रे :-**

काका शिपाईंना ते दिलेलं आहे.

**मा. आयुक्त :-**

कर्मचाऱ्यांना जर पगार मिळत असेल....

**मोहन पाटील :-**

महानगरपालिका पगार देते आणि ते रेकॉर्डवर नाही, हे कसे?

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील आपल्याला ती केस नक्कीच माहिती आहे. आता ऊगाचच ट्वीस्ट करु नका. संतोष पाटलांची, देविदास पाटलांची केस तुम्हाला नक्की माहित आहे.

**मोहन पाटील :-**

मी ट्वीस्ट कशाला करू. साहेब, जे कर्मचारी आहेत त्यांना प्रमोशनमध्ये इतर गोष्टी मिळायला पाहिजे त्या गोष्टी मिळत नाही. काका, एक शब्द बोलले म्हणून मी बोललो. ती केस संपूर्णपणे क्लिअर माहिती आहे.

**मा. आयुक्त :-**

प्रमोशन, पदोन्नती देणे वेगळं आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी आपण जे म्हणत आहात की, कर्मचाऱ्यांना पगार दिला जातो. परंतु, ते रेकॉर्डवर कुठेही नाही असे कधी होणारही नाही.

**रोहिदास पाटील :-**

१४ वर्षे झाले ते कामे करतात त्यांचे हक्क तर त्यांना मिळायला पाहिजे की नाही? साहेब किती दिवस ते पेंन्डींग ठेवायचं. या कोर्टातून त्या कोर्टात ती दोन मुलं कुठे फिरणार? त्यांनी प्रत्येक अधिकाऱ्याला मान दिला. ज्यांनी ज्यांनी सल्ला दिला तसे तसे ते धावत गेले. पण त्यांचे काम पूर्ण होत नाही.

**मा. आयुक्त :-**

पदोन्नतीच्या संदर्भामध्ये वैयक्तिक माझे मत काय आहे ते ह्याच्यापूर्वीच आपल्याला कळलेले आहे. ह्याच्यापूर्वी तुम्हाला सांगतो की, पदोन्नतीच्या बाबतीमध्ये जी डी.पी.सी. बसणार आहे. त्या डी.पी.सी.मध्ये जेवढी जेवढी रिक्त पदे आहेत आणि ज्यांना हक्काने पदोन्नती मिळणे आवश्यक आहे. त्यांना पदोन्नती मिळणारच आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांचे जे म्हणणे आहे. ते अतिशय योग्य रास्त म्हणणे आहे. ते दोन कर्मचारी सर्व कोर्टात भटकत आहे त्यांचे प्रकरण निकाली निघायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे सन्मा. सदस्यांनी जर ही बाब सांगितली असती जेव्हा मी आलो तेव्हा मी त्यांना कोर्टात फेरी मारण्याची संधीच दिली नसती.

**रतन पाटील :-**

आता आपल्याकडे पाठवतो आपण त्यांना न्याय द्या. मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. घनकचरा व्यवस्थापन सदर विषय मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये बऱ्याचशा वेळेला हा विषय आलेला आहे. आजचा विषय ऊद्यावर ढकलून आता पर्यंतचा काळ आपण आणि पूर्ण पाच वर्षाचा , साडे चार वर्षाचा हा कालावधी गेलेला आहे. ज्यावेळेला महानगरपालिका स्थापन झाली तेव्हा घाई-घाईने हा विषय घेतला गेला. सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहेत हा प्रकल्प लवकरात लवकर करण्यात यावा नाहीतर सर्वांना त्याची शिक्षा भोगावी लागेल अशा पद्धतीने हा विषय घाई-घाईने त्यावेळेला घेण्यात आला. त्यावेळेला आपण घाई-घाई मध्ये बरेचसे निर्णय घेतले पण आज त्यातील कुठलाही निर्णय अजून तसा जागेवर आलेला नाही. मा. आरोग्य अधिकारी श्री. अजीज शेख साहेब, मागच्या महिन्यापूर्वी हा प्रकल्प पाहण्यासाठी बैंगलोर येथे गेलो होतो आणि बँगलोरचे प्रकल्प आपण बघितलेले आहे. ते चांगले आहेत आणि नाशिकमध्ये जर आपण बघितले तर त्याच प्रकारचा प्रकल्प बैंगलोरमध्ये आहे आणि तो सुद्धा कार्यान्वित नाही. तिथे सगळ्या मशिनरीज आलेल्या आहेत आणि जशाच्या तशा मशिनरी पडलेल्या आहेत. ज्यावेळी त्यांचे डेमोन्स्ट्रेशन झाले तेंव्हा त्यांनी सांगितले की,

आमचा प्रकल्प चालू केलेला आहे आणि आणि ६०० टनाचा प्रकल्प चालू केलेला आहे. आपण येऊन तो प्रकल्प बघा आणि तो प्रकल्प पाहण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व गटनेते आपण पाहण्यासाठी तेथे गेले होते. पण प्रत्यक्ष तिथे मशिनरी येऊन अर्ध्या मशिनरी पडल्या होत्या जागेची कामे चालू होती. बरेचसे काम अर्धवट होतं. शेडची कामे चालू होती. पाहिल्यानंतर अशा पद्धतीने बरीचशी कामे तिथे अर्धवट पडली होती. त्याच्या नंतर पहाणी केल्यानंतर त्या प्रकल्पाचे अधिकारी तिथे होते त्यांती प्रत्यक्षात आम्हाला माहिती दिली की, हा प्रकल्प चालू करण्यासाठी ६ महिने जातील. त्यानंतर आपल्याकडे हेंझर बायोटेक्स त्यांनीसुद्धा आपल्या महानगरपालिकेमध्ये डेमॉन्स्ट्रेशन दाखविले आणि तो त्यांचा प्रकल्प कार्यान्वित म्हणून राजकोट येथे चालू आहे. प्रत्यक्ष मा. महापौर, मा. सभागृह नेते साहेब व मा. आरोग्य सभापती हेसुद्धा त्यावेळेला ऊपस्थित होते. सन्मा. गटनेते हे सुद्धा त्याच्यामध्ये ऊपस्थित होते. त्यावेळी राजकोटला गेल्यानंतर त्यांनी तो प्रकल्प दाखविला आणि ती वस्तूस्थिती मा. महापौरांना माहिती आहे की, जशा पद्धतीने एकदा कचरा शहरातून बाहेर आल्यानंतर तो प्रथम वजन करुन घेतला जातो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील घनकचऱ्याची माहिती देण्यासाठी त्या स्किमचे मॅनेजमेंटचे अधिकारी आहेत ते इथे आलेले आहेत. ते आपल्या सभागृहाला सगळी माहिती देतील.

**रतन पाटील :-**

आम्ही पाहिले आहे. आम्हाला माहिती देण्यापेक्षा सभागृहामध्ये सन्मा. नगरसेवक आहेत त्यांना दाखविण्याची गरज आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला काय अपेक्षित आहे. आपल्याला काही सुचना मांडायच्या आहेत. त्या थोडक्यात मांडा.

**रतन पाटील :-**

सुचनाच मांडत आहे. हे सर्व सभागृहाला कळणं गरजेच आहे की, आपणं कुठले कुठले प्रकल्प बघितले. आजपर्यंत आपण काय केले. एवढे बोलू द्या ना. पहिलं सभागृहाला कळू द्या. त्याच्या नंतर पाहिजे असेल तर आम्ही सुचना मांडू. आम्ही बघितलेले आहे. तिथे तो प्रकल्प चाललेला आहे आणि तो मिरा भाईंदर मध्ये लवकरात लवकर कार्यान्वित करा अशी आमची इच्छा आहे. त्यासाठी तर बोलतोय. जर ते येत असतील तर वेळ न घालवता त्यांना बोलवा आणि समोर त्यांना डेमॉन्स्ट्रेशन दाखवा. वेळ घालवू नका. सभागृहाला समजले पाहिजे.

**नगरसचिव :-**

सभागृहाची परवानगी असेल तर आपण त्यांना बोलावून प्रकल्पाबद्दल माहिती देण्यास सांगू.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, हा अतिशय चांगला विषय असून तो आपण सभागृहासमोर आणलेला आहे. मा. महापौर मॅडम, २३ तारखेपासून ह्या देशामध्ये आणि मिरा भाईंदर शहरामध्ये नवरात्रीला सुरूवात होत आहे. त्याच्यानंतर दिवाळीचे सण आले आहेत आणि आपल्या शहरामध्ये गेले ४ महिने अतिशय मोठ्या प्रमाणात घनकचऱ्याबद्दल चर्चा चालू आहे. मा. महापौर मॅडम, आज देखील आपल्या शहरामध्ये कचरा ऊचलण्याचे काम बंद आहे आणि शहरामध्ये सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे आणि २३ तारखेला नवरात्री येते व नंतर दिवाळी येते आणि आपण हे जर जातीने लक्ष दिले नाही तर मला वाटते आहे की, येत्या नवरात्रीमध्ये आणि दिवाळीमध्ये अतिशय फार मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागेल. तुम्हां-आंम्हाला सहन करावा लागेल. आपण जागरुक राहून डंपिंगच सध्या लवकरात लवकर काम कराव लागेल आणि प्राध्यान्याने हे काम हातामध्ये घ्यावे लागेल. तो विषय आपल्या समोर आलेला आहे. तरी देखिल मी आपल्याला एवढेच सांगेल नवरात्री नवरात्री आणि दिवाळी जोपर्यंत डंम्पिंगच काम होत नाही तोपर्यंत आपण तातडीने समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करावे एवढीच मी आपल्याला याठिकाणी विनंती करीत आहे.

**शुभांगी नाईक :-**

घनकचऱ्याला जबाबदार कोण? आपण एवढे बोललात तर ह्याला जबाबदार कोण?

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयामध्ये गफलत व्हायला लागली आहे. आपण बांधा, वापरा त्याच्यासाठी तुंम्हाला घाई आहे की, आता शहरातील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे त्याच्यावर चर्चा करायची आहे. शहरात डेंग्यु आहे. तुमची साफसफाई होत नाही. आता आपण जी एजन्सी दिलेली आहे ती एजन्सी फिक्स करणार त्यांचा रिझल्ट मिळवण्यासाठी तुंम्हाला सहा महिने, वर्ष लागेल. आता ज्यांना दिलं आहे त्यांच्याबद्दल बोला. आता कुठेही गाड्या कचरा ऊचलत नाही. त्यामुळे ढिगारेच्या-ढिगारे पडलेले आहेत आणि अनेक ठिकाणी दुर्गंधी पसरलेली आहे. ठेका देण्यामध्ये रुची आहे? की कचरा ऊचलण्यात रुची आहे? आपण कुठे गफलत करतो. आमची अशी अपेक्षा आहे की, तुम्ही आताची जी सद्ध्या स्थिती आहे त्याच्यावर १५ मिनीटे, अर्धा तास पहिल्यांदा चर्चा करा. नंतर बांधा वापरा याविषयावर चर्चा करा. ह्याच्यावर पर्याय नाही आहे. ह्यांना ठेका दिला म्हणजे मार्ग निघाला असे नाही आहे. आज शहरात साथीचे रोग चालू आहेत. सगळ्याच ठिकाणी, ज्या ज्या ठिकाणी जाल तिथे तुम्हाला कुत्रे ऊभे दिसतील ही स्थिती काय आहे? कोणते दुधाचे दुकान

सुटलेले नाही, शाळा सुटलेली नाही, प्रर्थना मंदिर सुटलेले नाही, कोणता नाका सुटलेला नाही. कुठेही जा तुम्ही. आज सकाळी फिरुन बघा. कालची, परवाची परिस्थिती काय होती आणि एकच ऊत्तर मिळते की, डंम्पिंग ग्राऊंड नाही. डंम्पिंग ग्राऊंडसाठी तुम्ही कोणाला काय अधिकार दिलेत. स्वतंत्र योजना राबवली का? टेंडर नाही. आता भाईंदर पुर्वेची गाडी, जर चेन्याला जाणार असेल, किती डिस्टंन्स झाले. तुम्ही गाड्या वाढवल्या का? कर्मचारी वाढवले का? ठेकेदाराला परवानगी दिली का? त्यांनी कचरा ऊचलला तर ऊचलला, त्यांनी नाही ऊचलला तर नाही ऊचलला. अशी तुम्ही शहरात स्थिती करुन ठेवली आहे. ही ठेकेदारांवर की, मा. आयुक्तांवर महानगरपालिका चालू आहे. ऊत्तरे पाहिजे हा आरोग्याचा प्रश्न आहे. तो ठेका देण्याचा नंतर विषय आहे. आताचा जो विषय आहे तो पहिल्यांदा तासभर चर्चा होऊन त्याच्यावर निश्चित झाले पाहिजे की, ही ऊपाययोजना आहे आणि १२ तासामध्ये, २४ तासामध्ये, ४८ तासामध्ये तुंम्हाला हा रिझल्ट मिळेल. अन्यथा एक आहे, आपलं हे मतलबाच काम होईल.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये घनकचरा बांधा, वापरा, हस्तांतरीत करा हा जो विषय आहे हा विषय विषयपटलावर आलेला आहे. सभागृहामध्ये सर्वप्रथम बी.ओ.टी. बेसिसवर कार्यान्वित हा विषय करायचा आहे. त्याबद्दल चर्चा करा आणि आजची शहराची जी स्थिती आहे. कालचच ऊदाहरण आहे. काल सुद्धा रात्री गाड्यांवर दगडफेक करुन त्या गाड्या आजच्या स्थितीत ऊभ्या आहेत. सर्वप्रथम बी.ओ.टी. बेसिसच्या बाबतीमध्ये संबंधीत अधिकारी येथे आहेत त्यांची सभागृहाला माहिती द्या. तो विषय पुर्ण झाल्यानंतर आजच्या शहरातील कचऱ्याच्या बाबतीत जी अवस्था आहे. त्याबाबतीत काही ठोस निर्णय घ्या.

**रोहीदास पाटील :-**

नाही, आम्ही आपल्याला स्पष्ट विरोध करत आहोत. तुम्ही ही अशी घाई करु नका. बि. ओ. टी. तत्वावर घेण्यासाठी जे अधिकारी आलेले आहेत. आज वस्तीला राहतील व ऊद्या सकाळी डेमॉन्स्ट्रेशन दाखवतील. शहराच्या आरोग्याच्या दृष्टीने, लोकांच्या जिविताच्या दृष्टीने जी चर्चा होणे गरजेचे आहे. ती चर्चा आधी झाली पाहिजे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, साहेब घनकचरा परिस्थितीच्या बाबतीमध्ये आजच्या तारखेमध्ये जे आरोग्याच्या दृष्टीने जे संत गाडगेबाबा अभियान हे आपण राबवत असतांना आज शहरामध्ये आपल्याकडे जागा ऊपलब्ध नाही. जागा ऊपलब्ध करुन घेतलेली आहे. त्याच्यामध्ये आतापर्यंत आपले काम चालू नाही आणि ह्या गोष्टीला चार ते पाच वर्षे व्हायला आली आहेत. तरी सुद्धा आपल्याला कलेक्टरने जागा दिलेली आहे. त्या जागेच आणि ती जागासुद्धा अशी निवडलेली आहे की, त्याठिकाणी लोक राहतात. आमचे स्थानिक लोक राहतात. ऊत्तन, डोंगरी, तारोडी परिसरातील लोक राहतात आणि या परिसरात ही काही प्रमाणात दुर्गंधी पसरण्याची संभावना आहे. मा. आयुक्त साहेब, मला आपल्याला असे म्हणायचे आहे की, ज्या ठिकाणी तुम्ही कचरा टाकत होता. आता मागच्या वेळेला दोन वर्षापर्यंत तुंम्हाला काही बघायला लागले नाही. आर. एन. पी. नगर, सर्व्हे नं. ७८० मध्ये कचरा टाकला. तिथे कचरा टाकण्यासाठी आम्ही कोणी ऑब्जेक्शन घेतलेले नाही. आणि त्याच्यामध्ये आम्ही त्या कारणाने, त्या पद्धतीने, प्रशासनाला महानगरपालिकेला आपली जागा नसल्या कारणामुळे आम्ही त्याच्यावर ऑब्जेक्शन कुठलेही घेतलेले नाही. कारण बदनामी होऊ नये. तिथे भरणी झाली. लेव्हल नाही व आता सुद्धा तिथे बंद असतांना गाड्या चालू केलेल्या आहेत. पब्लिकने त्यांच्यावर बंधन घातले आहे म्हणून ते बंद केलेले आहेत. मी जागा लेव्हल केलेली नाही. साहेब, असा एक प्रश्न ऊपस्थित होतो की, ज्या ठिकाणी घनकचऱ्याचे हे जे ट्रक जातात. त्याठिकाणी कचरा टाकला जातो व तिथे लेव्हल केली जात नाही. त्याच्यावर औषध फवारणी केली जात नाही. म्हणून लोकांना दुर्गंधी येते. त्या दुर्गंधीमुळे लोकांना ऑब्जेक्शन घेतात. त्यापद्धतीने आपल्याला अडचण येते. साहेब, मी तुंम्हाला सांगतो की, अहमदाबाद हायवे, घोडबंदर सरळ तिकडे तुम्ही जातांना लेफ्ट साईडला बघा. आता तिकडे सगळे व्हि. आय. पी. लोक किंवा सामान्य लोक जातात तिकडे तिथे आपल्या महानगरपालिकेच्या वतीने जर घनकचरा आरोग्याच्या दृष्टीने जर हायवेवर कचरा पडत असेल तर ती आपल्या महानगरपालिकेची बदनामी आहे. शिवाय तेथून गेल्यानंतर काही ठिकाणी सुभाषचंद्र बोस या ठिकाणी ही किती ट्रक भरलेले असतात. तसेच, कॅबिन रोडच्या येथे ही टाकलेला असतो. आणि जी जी जागा मोकळी आहे तिथे कचरा कोण टाकतात. तर बदनामी करण्यासाठी तुमचे जे कॉन्ट्रॅक्टर आहेत ते टाकतात. त्यांना एकचे दोन फेरे कसे होतील दोनचे तीन फेरे कसे होतील आणि एक केला असेल तर त्याचे दोन सही कशा मिळत असतील ते ते बघत असतात. साहेब, ह्याच्यामध्ये असा ऊपस्थित म्हणजे संपुर्ण जागा तिथे सजेस्ट केली पाहिजे की, ज्या ठिकाणी आता सी. आर. झेड. म्हणतो की मध्ये कचरा टाकू नये किंवा दुसऱ्या एखाद्या प्रायव्हेट जागेमध्ये टाकू नये. आता प्रायव्हेट जागेमध्ये टाकल्यानंतर कोणालासुद्धा त्याची तकलीफ होत नाही. त्या ठिकाणी टाकल्यानंतर आपले काही समाजसेवक आहेत त्यांना ही अडचणी येतात. त्यांना त्याच्यापासून काही त्रास होत नसेल तर त्यांनीही थोडा त्रास सहन केला पाहिजे कि, आपल्या महानगरपालिकेला हा आपल्याला घनकचरा टाकण्यासाठी जागा ऊपलब्ध नसेल. थोडे दिवस आपले जे प्रोसिजर आहे ते पुर्ण झाल्यानंतर तिथपर्यंत आपण तकलीफ सहन करायला पाहिजे होती. तर अशा कारणाने कोणत्याही त्याच्यामध्ये आरोग्याच्या दृष्टीमध्ये कोणत्या प्रकारची

अडचण आल्यामुळे कोणती एक व्यक्ती किंवा माणुस आला तर त्यावर आपल्या रितीने कार्यवाही करायला पाहिजे. तर त्या पद्धतीने तुम्ही करुन घ्या आणि तो घनकचरा कुठे टाकायचा याचा विचार करा. आज चार-पाच वर्ष ऊलटून गेली तिथे काहीच होत नाही. आणखीन जागा घ्या. काही अधिकारी लोक आलेले आहेत. साहेब, त्यांच्याकडून माहिती घ्या. सभागृहाला माहिती द्या. आणि जर आपल्याला ह्या सभागृहामध्ये काही सांगायचे नसेल तर त्या पद्धतीने आपल्याला जशी मघाशी मिटींग मा. ऊपमहापौर, मा. महापौर साहेब पाण्यासाठी घेतलेली आहे. अशी कमिटी स्थापन करावी. त्याच्यावर चांगला निर्णय द्या. तरणी ताठी लोक घ्या आणि असा प्रश्न सोडवा आणि आता जवळच नवरात्र आली. त्यानंतर दिवाळी येईल मिठाई वाटायला. मिठाई वाटू नंतर, दिवाळीला टाईम आहे. सद्ध्या ऊद्याच काय होणर आहे ते बघा. आरोग्याच्या दृष्टीने. जिथे जिथे गाड्या थांबलेल्या आहेत आणि ज्या ठिकाणी गाड्यावाल्या कॉन्ट्रॅक्टर असा जर हलगर्जीपणा होत असेल तर त्यांना तुम्ही सक्त ताकिद द्या आणि वॉर्निग देऊन त्यांचा ठेका, टेंडर रद्द करुन टाका. कारण आपले त्याच्यावर नियंत्रण ठेवा. आरोग्य खात्याचे श्री. कांबळे साहेब आहेत बरेचसे लोक आहेत. अतिक्रमणची लोक आहेत त्यांनी लक्ष ठेवायला पाहिजे गाड्या कुठे जातात आपली महानगरपालिकेची बदनामी कशी होत आहे? ह्याच्यावरती आपण लक्ष द्यायला पाहीजे. तिथे अधिकारी ठेवायला पाहिजे. अशा पद्धतीने हा घनकचऱ्यामुळे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कचरा टाकण्यासाठी जागा ऊपलब्ध करावी. अशी आपल्याकडे विनंती करतो आणि त्य विनंतीला मान दिला नाही तर मग तुमचा गेट खुल्ला आहे आंम्हाला बसायला मा. महापौर साहेब, त्याच पद्धतीने तिथपर्यंत आपली पाळी आली नाही पाहिजे. अशा पद्धतीने मी नम्र विनंती करतो हा घनकचरा गाडगेबाबा अभियानांतर्गत आपल्या महानगरपालिकेला.....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, माहिती देण्यासाठी अधिकारी आलेले आहेत. त्यांच्याकडून अगोदर माहिती ऊपलब्ध करुन घ्या. आणि आपल्या सर्वांच्या सुचना दोन-दोन मिनीट ऐकून घेतल्या जातील. सर्वानी बसून घ्या.

**जोजफ घोन्साल्वीस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मी जो अर्ज दिला होता त्या अर्जावर आपण काय कार्यवाही केली आणि सद्ध्याची परिस्थिती अशी आहे की ऊत्तनला डेंग्यु आणि लेप्टोची साथ सुरू आहे. मॅडम, त्याच्यावर स्पष्टीकरण पाहिजे. अजूनपर्यंत तिथे औषध फवारणी केलेली नाही. डासांचे प्रमाण एवढे वाढले आहे की, कल्पनाच करु शकत नाही कल्पनेचे बाहेर. त्याच जरा एक्सप्लेन करा. त्याच्यानंतर तुम्ही हा विषय घ्या. मी कुठे नाही बोलतो.

**अजीज शेख (मा. आयुक्त) :-**

मा. महापौर मॅडम यांच्या परवानगीने बोलत आहे. आपण जो प्रश्न केलेला आहे. त्याच आम्ही ऊत्तर देत आहोत. परंतू, मा. महापौर मॅडमची सुचना आहे की, प्रोजेक्टसाठी आपण जे अधिकारी बोलाविले आहेत तर ते प्रोजेक्ट विषयी चर्चा करुन आपले काही शंकाकुशंका असतील तर त्याबाबत विचार विनीमय करुन हा जो मुद्दा आहे त्याबद्दल आपल्यांना विचार करायचा आहे. त्याच्यावरती चर्चा करायची आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

साहेब, तुम्ही प्रश्नाचे ऊत्तर दिले नाही तरी त्या समस्येचे समाधान करा. तुमच्याकडून होत नसेल तर मी मा. आयुक्तांना सांगतो की, आपण पद सोडून द्यावे. औषध फवारणी करा तेथे साथीचे रोग...

**लिओ कोलासो :-**

आयूक्त साहेबांना हे पद सोडायला सांगत आहेत त्याच्यावर आमचा आक्षेप आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, आपण रुलिंग द्या की, आपण औषध फवारणी करा. ऊत्तन येथे साथीचे रोग पसरत आहेत ते आटोक्यात आणा.

**लिओ कोलासो :-**

मा. महासभेत कुठला विषय आहे आणि कुठल्या विषयावर हे विरोधी पक्ष बोलत आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, विषय तोच आहे.

**रोहीदास पाटील :-**

हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. लोकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. जिवितहानी होण्याचा प्रश्न आहे.

**लिओ कोलासो :-**

आयुक्तांना पद सोडायला सांगत आहे. त्याच्यावर आमचा आक्षेप आहे.

**रोहीदास पाटील :-**

डेंग्यूचा साथीचा प्रसार होत आहे. चिकुनगुनिया सुरू झाला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे जाणुनबुजून करत आहात.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये घनकचरा प्रकल्पासंदर्भात जे अधिकारी आलेले आहेत. जो विषय आहे त्या विषयावर चर्चा करुन नंतर ज्या काही शंका-कुशंका असतील त्यावर चर्चा घडविण्यात येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आंम्हाला चर्चा करायची नाही. आपण त्याच्यावर ऊपाययोजना काय कराल ते सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला प्रश्नाचे ऊत्तर मिळेल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण ऊपाययोजना काय कराल?

**मा. महापौर :-**

आपल्याला ऊत्तर दिले की, आपले लगेच समाधान होईल का? आपण डाय निर्मुलन करा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम ह्यांनी आपल्याला रुलिंग दिले की, आपल्या प्रश्नाला ऊत्तर मिळेल. पण पहिले अधिकाऱ्यांना बोलू द्या.

**रोहीदास पाटील :-**

असे कसे? आम्ही का त्यांना बोलू देत नाही का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटीलजी (काका) तुमच्या शंका आम्ही अमान्य करत आहोत का? त्या शंकेवर चर्चा करत आहोत ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ही शंका नाही परिस्थिती गंभीर आहे. आपण याच्यावर आदेश द्या. म्हणजे प्रश्न मिटला ना.

**रोहीदास पाटील :-**

हि परिस्थिती आहे. कचरा ऊचलत नाही ही परिस्थिती नाही.

**मोहन पाटील :-**

परिस्थिती आहे हे मान्य आहे. त्या विषयावर चर्चा होईल ना. आपण चर्चा करुया.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आंम्हाला चर्चा नको. चर्चा कशाला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

मग तुंम्हाला काय पाहिजे?

**रोहीदास पाटील :-**

कचरा ऊचलायला सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम ह्यांनी आदेश द्यावे की, तिथे तातडीची ऊपाययोजना करावी. संपला विषय. आंम्हाला चर्चा कशाला पाहिजे?

**रोहीदास पाटील :-**

ऊत्तर द्या ना. त्याशिवाय आम्ही त्यांना बोलू देणार नाही. पहिल्यांदा तुम्ही तातडीची ऊपाययोजना काय करता ते सांगा. सात माणसे दगावली. त्यांना तुम्ही ऊत्तर देणार आहात का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ऊत्तन मध्येच नव्हे तर भाईंदर मध्ये स्माईल कॉम्प्लेक्स एक शहरी वस्ती आहे. या कॉम्प्लेक्स टॉवरमध्ये डेंग्यूची साथ आली आहे. म्हणजे ऊत्तनची गोष्ट नाही. ते ग्रामीण क्षेत्र आहे. पण भाईंदरसारख्या शहरामध्ये डेंग्यूची साथ आलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल सन्मा. सदस्यांनी सांगितलेला प्रश्न समजलेला आहे. विनाकारण सगळेजण ऊठून गोंधळ घालू नका आणि तुम्ही बोलायला महापौरांची परमिशन घेत नाहीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, डेंग्यू झालेला व्यक्ती आमच्याकडे आहे.

**मा. महापौर :-**

त्यांच्या व्यतिरीक्त जे ऊठून बोलणार त्यांचे शब्द सन्मा. सचिव कामकाजातून पुर्ण वगळून टाकावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. ते शब्द काढून टाका.

**मा. महापौर :-**

तुम्ही स्वतःला पहिल्यांदा शिस्त लावून घ्या आणि मग सभागृहाला शिस्त लावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या वॉर्डमध्ये एका व्यक्तीला त्याला डेंग्यू आहे. म्हणून चाळीस हजार रुपयाचे बिल आलेले आहे. स्माईल कॉम्प्लेक्समध्ये श्री. मेहता म्हणून एक पेशंट आहे. त्याला जबाबदार कोण? त्याचे चाळीस हजार रुपये कोण भरणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

याबाबत त्यांनी आदेश द्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांचे प्रोसिडिंगमध्ये नाव आले तर फरक पडणार नाही.

**रोहीदास पाटील :-**

अर्धा तास गेला तर काय फरक पडतो. मा. ऊपायुक्तांनी ऊपाययोजना सांगावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी डंपिग ग्राऊंडचा विषय होता त्यावेळी आपले भाजपचे सर्व सदस्य सभा त्याग करुन निघुन गेले होते. आणि ते आता बोलत आहेत की, आम्ही विषय चालू देणार नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

तुम्ही ठराव ठेवा. तुमची सत्ता आहे. तुम्ही ठराव ठेवा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ठराव ठेवतो आणि मंजूर करुन दाखवतो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सगळे ठराव करतात ना, हे मग आपण हाही ठराव करा. तुम्ही सत्ताधारी आहेत मग, ठराव काय तुम्ही तुंम्हाला बहुमताची गरज नाही. ठराव करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणूनच विरोधी पक्षाला विरोधी पक्षाच्या बळावर बोलायला लागते ही या सभागृहाची परिस्थिती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य यांनी विचारलेला प्रश्न व ऊपस्थित केलेली सुचना शहरामध्ये डेंग्यूची साथ आहे आणि ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग असल्या कारणामुळे वेगवेगळे आजार ऊद्‌भवत आहेत. प्रशासकीय आरोग्य अधिकारी यांना मी सुचना देते की, त्वरीत त्या ठिकाणी कार्यवाही करुन तेथील नागरिकांच्या आरोग्याची काळजी म्हणून हॉस्पिटलमध्येही त्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच कचऱ्याचे ढिग आपल्याला लवकरात लवकर हलविण्यासाठी कचऱ्यावर ऊपाययोजना म्हणूनच हा विषय आपण मा. महासभेत घेतलेला आहे. तर त्यामुळे सर्व सन्मा. सदस्यानी ह्या विषयाला सहकार्य करावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, डेंग्यूचा रोग हा डासांमुळे होतो.  तर आपण डास निर्मुलन करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप दुसरेका वॉर्ड जाने दो। आपकेही वॉर्ड में हायवेपर इतना कचरा पडा है वह आप देखो। आप रोज जाते है आपके हायवे पर इतना कचरा पडा है। सभी गाडियाँ ऊधरही डंपिंग की हुई है।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे की, आता जो नगरसेवकांनी डेंग्यूचा विषय काढला आहे. तसा माझा एक गंभीर प्रश्न आहे की, गोकुळाष्टमीच्या दिवशी २१ तारखेला एका मुलाला ताप आला आणि दुसऱ्याच दिवशी तो जे. जे. हॉस्पिटलमध्ये ऑफ झाला त्याच्या मदतीला प्रशासन आणि डॉक्टर सुद्धा गेले नाही. डॉक्टरांना मघाशी फोन केलेला. डॉक्टर म्हणाले मी जाऊन प्रत्यक्ष तिथे पाहणी करुन काय असेल ते पाहून घेईन. म्हणून मी गप्प बसलो. मा. महापौर मॅडम, आपल्या नावाने अर्जही केलेला आहे. त्याच्यावर आपण चौकशी करावी. आणि पुढचा विषय आपण घ्यावा.

**रोहीदास पाटील :-**

आपल्याला ते अर्थसहाय्यही करित नाही. वैद्यकिय सहाय्य नाही आणि अर्थसहाय्यही नाही. आपला ठराव जातो कुठे तेच कळत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर साहेब, रुलिंगमध्ये डासांचा नायनाट करा असे द्या.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण निर्देश दिलेत की, शहरामध्ये साफ सफाई झालीच पाहिजे आणि कचऱ्याचे ढिग हलले पाहिजेत आणि लोकांच्या जिवीताला हानी होऊ नये म्हणून काळजी घेण्यात यावी. याचा एक भाग म्हणून सांगते की, आपण लक्षात घ्या शहरात डेंग्यूचे रुग्ण आहेत आणि ह्याचा रेकॉर्ड जर तुंम्हाला कोणी दिला आमच्यासारख्यांनी किंवा नागरिकांनी तर ह्याच्यावरती काय प्रतिक्रिया आहे. मला एक प्रश्न विचारायचा आहे की, डेंग्यू आहे हे निश्चित आहे हे तुंम्हाला सुद्धा माहिती असेल तुम्ही ह्या शहराचे प्रथम नागरिक

आहात. त्यावर आपली काय ठोस यंत्रणा आहे का? की ऊपाययोजना आहे. जरा प्लिज त्याविषयी माहिती द्या. त्या प्रश्नाचे ऊत्तर मिळू द्या.

**मा. महापौर :-**

डॉक्टरांनी सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आहे की, डेंग्यू आणि चिकन गुनिया संदर्भात औरंगाबाद येथे कार्यशाळा झाली होती त्याला मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम आणि मी स्वतः ऊपस्थित होतो. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने डेंग्यू आणि चिकुन गुनिया हे दोन्ही रोग एकाच डासापासून होतात. एडिस इजिप्त हे एकाच डासापासून होतात आणि त्याच्या प्रतिबंधासाठी काय ऊपाययोजना करायची ह्याच्याकरिता सर्क्युलर प्रस्थापित केले होते आणि त्यानुसार मिरा भाईंदर परिसरात आपण ऊपाययोजना सुरू केलेल्या आहेत. आपल्याकडे साधारणतः जवळपास ३० संशयित डेंग्यूचे रुग्ण पावसाळ्याच्या सुरूवातीपासून आतापर्यंत आढळले आहेत.

**शुभांगी नाईक :-**

संशयित कसे? डेंग्यू झालेले रुग्ण आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ते रुग्ण संशयित आहेत.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रभागात डेंग्यू झालेले आहेत. मी गावी जाण्यापुर्वी अधिकाऱ्यांना कळविले होते. त्याठिकाणी एकही अधिकारी गेला नाही किंवा औषध फवारणी केली नाही. तुम्ही बोलू नका. डेंग्यूचे रुग्ण संशयित आहेत असे कसे म्हणतात पण डेंग्यूचे रुग्ण आहेतच. हा हलगर्जीपणा तुमच्या लोकांचा आहे. आम्ही कळवूनसुद्धा त्याठिकाणी एकही अधिकारी आलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे अनरेकॉर्ड आणि तुंम्हाला जर रेकॉर्ड असे दिले तर त्या रुग्णाच्या बाबतीत त्या कुटूंबाच्या बाबतीत काय योजना आहे आणि एकंदर शहरासाठी आपली काय योजना आहे दोन्ही प्रश्नांची ऊत्तरे आंम्हाला मिळाली पाहिजे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, काल मी सक्सेना हॉस्पिटलला गेली असतांना तेथे दोन पेशंट मुले डेंग्यूचे आहेत. पण ते कोणत्या वॉर्डमधील विद्यार्थी आहेत असे विचारले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या डॉक्टर जो खुलासा करित आहेत तो खुलासा अगोदर ऐकून घ्यावा. एका वेळेस एकाने बोलावे.

**लिला पाटील :-**

आपण संशयित बोलू नका. प्रत्यक्षात हॉस्पिटलचा रिपोर्ट आहे तिकडे आणि मी त्या डॉक्टरला भेटलेली आहे. ते रुग्ण सन्मा. सदस्या प्रभात पाटील आणि सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांच्या वॉर्डमधले आहेत. यांची चौकशी मी केलेली आहे. आपण संशयित कसे सांगता. तुम्ही आजपर्यंत किती हॉस्पिटल मध्ये जाऊन पहाणी केली आहे ते सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डॉक्टर साहेब, आपण कशाला खोटं बोलता. अत्ता कालच डेंग्यूच्या रुग्णाच्या आठ फाईल आणल्या आहेत. त्यांना आपण विचारा काय खरे आणि काय खोटे आहे.

**लिला पाटील :-**

आपण किती हॉस्पिटल मध्ये जाऊन पहाणी किंवा चौकशी केली याची सविस्तर माहिती द्या. संशयित कसे सांगता प्रत्यक्ष डॉक्टर सांगतात.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

यांच्या संदर्भात मी असा खुलासा करेन.....

**लिला पाटील :-**

आपण किती हॉस्पिटलचा सर्व्हे केलेला आहे?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

आम्ही सर्व हॉस्पिटलमधून माहिती घेतलेली आहे.

**लिला पाटील :-**

आपण सर्व पेशंटची नावे आणलेली आहेत?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

होय, आमच्याकडे सर्व नावे आहेत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे....

**लिला पाटील :-**

त्यांच्या रक्ताचे सर्व नमुने तपासुन झाले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या मी आपल्याला विनंती करेन की, वैद्यकिय अधिकाऱ्यांचे जे काही म्हणणे आहे की, जे वैद्यकिय अधिकाऱ्यांनी जे काही रिपोर्ट तयार केलेले आहेत ते रिपोर्ट सभागृहासमोर ठेवू द्या आणि त्यानंतर आपण प्रश्न विचारा.

**लिला पाटील :-**

पण ते संशयित असे कसे बोलतात? प्रत्यक्षात डेंग्यूचे रुग्ण तिकडे आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी जी काही माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. जी माहिती त्यांच्याकडे ऊपलब्ध आहे त्याबद्दल ते आपल्याला सांगत आहेत ना.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

संशयित का म्हणतो याचे कारण मी सांगतो. आपल्याकडे ज्या टेस्ट प्रायव्हेट डॉक्टर करतात त्या इन्डायरेक्ट टेस्ट असतात. म्हणजे ब्लडमध्ये विशिष्ठ ॲन्टीबॉडीज वाढलेल्या ज्या डेंग्यूमुळे वाढू शकतात. परंतु, डेंग्यूमुळे जर वाढल्या असतील तर डेंग्यू असतोच असे काही नाही. त्यामुळे अशा प्रकारे पेशंटची टेस्ट पॉझिटीव्ह आलेली असेल तसे सॅम्पल त्या डॉक्टरांनी एन.आय.बी.ला पाठवले आणि तिथून रिपोर्ट आल्यानंतर तो कन्फर्म डेंग्यूचा रुग्ण आहे असे त्यांना जाहिर करण्याचा अधिकार आहे. केवळ प्लिटलेटची संख्या कमी झाली. बाकीच्या बऱ्याच आजारामध्ये प्लिटलेटची संख्या कमी होते. तेवढयाच आजारावर ही बऱ्याच जणांनी डेंग्यू म्हणून घोषित केलेले आहे. ही एकदम चुकीची प्रॅक्टिस चालू आहे. त्यामुळे आम्ही संशयित म्हणतो. आम्ही असे म्हणत नाही की, डेंग्यू नसतीलच. ठिक आहे, आमच्याकडे १०० टक्के संशयीतांची जी यादी आहे त्यात १०० टक्के डेंग्यूचेही रुग्ण असतील. पण जो पर्यंत कन्फर्मेशन एन.आय.बी. पुणे कडून येत नाही तोपर्यंत त्यांना संशयित म्हणतो.

**रोहीदास पाटील :-**

तोपर्यंत डॉक्टरसाहेब जेंव्हा तुमच्या लक्षात आले की हा डेंग्यूचा संशयित आहे त्यांचा रिपोर्ट यायला दोन महिने लागेल. तोपर्यंत शहराची स्थिती काय होईल. त्याच्याबद्दल काही ऊपाययोजना आहे का? तुम्ही जी औषध फवारणी करतात त्याने एक मच्छर मरत नाही. तुम्ही रोजच्या रोज साडे तीन गोळ्या द्यायला सुरूवात केली आहे. जो पेशंट तुमच्याकडे येतो त्याला साडे तीन गोळ्या देतात.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मा. महापौर महोदया, डॉक्टर साहेबांना खुलासा करु द्या. अन्यथा यांना खुलासा करायला सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डॉक्टर साहेब काल तुमच्याकडे आठ फाईल दिल्या ना?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, त्यांना खुलासा करु द्या. नंतर ह्यांना बोलू द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते संशयित असे कसे बोलतात? त्या फाईलवर कन्फर्म आहेत की ते डेंग्यूचे पेशंट आहेत.

**मोहन पाटील :-**

त्यांना पुर्ण खुलासा करु द्या. सदस्यांना बोलायला नंतर सांगा ना.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

आमच्याकडे त्यांची नोंद संशयीत म्हणून असो किंवा कन्फर्म असो. आम्ही जरी संशयित सांगितले तरी त्याला डेंग्यूचाच रुग्ण म्हणून आम्ही गृहीत धरतो आणि त्यावर ती ऊपाययोजना करणे आवश्यक आहे किंवा जे आमच्याकडून अभिप्रेत आहे. तिच ऊपाययोजना आम्ही त्याठिकाणी करतो, म्हणजे असे की, ज्याठिकाणी डेंग्यूची केस मिळाली आहे त्याठिकाणी डेंग्यूचा ताप आहे असे आम्ही गृहीत धरतो आणि तो डास आणखीन काही लोकांना चावू शकतो. ते लक्षात घेऊन ज्याठिकाणी डेंग्यूची केस आहे त्या अराऊंड आम्ही तिनशे ते चारशे घरांचा सर्व्हे करतो. प्रत्येकाचा रिपोर्ट आमच्याकडे आहे की, किती घरांचा सर्व्हे करुन माहिती मिळाल्या मिळाल्या आम्ही सर्व्हे केलेला आहे. आणि त्यानुसार त्याठिकाणी डेंग्यूसारखी लक्षणे असलेले त्याच बरोबर इतरही रुग्ण असतील तर त्यांना आम्ही तात्काळ औषध ऊपचार देतो. जर कोणाला गरज असेल तर आम्ही संदर्भ रुग्णालयात त्यांना दाखल करतो. मलेरियाचा संशय असेल तर आम्ही त्यांचा स्लाईडवर रक्ताचा नमुना घेऊन तो तपासणीसाठी पाठवतो आणि त्याचबरोबर फवारणी विभागासाठी आपले तलवार जे आहेत त्यांना आम्ही पर्सनली लगेच फोन करतो. त्यांना इनफॉर्म करतो की, अशा ठिकाणी संशयीत डेंग्यूची केस मिळालेली आहे. तुम्ही त्याठिकाणी अराऊंड तिनशे ते चारशे घरामध्ये इनडोअर स्प्रे करा म्हणजे तो इनटन्सीफाय करा. तिथे आणि फॉगिंगचे सात दिवसाच्या अंतरामध्ये दोन राऊंड घ्या त्याचबरोबर आम्ही स्वच्छता विभागाला

सुचना देऊन त्याठिकाणची पुर्ण साफसफाई करुन घेतो. याप्रकारे आम्ही प्रत्येक ॲक्शन आम्ही प्रत्येक डेंग्यूच्या रुग्णाचे केलेले आहे. मग तो संशयीत असो वा कन्फर्म असो त्याच्यामुळे त्या कार्यवाही मध्ये काहीच फरक पडलेला नाही.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा सॉलेड वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प हा आमच्या चांगल्या अशा विभागामध्ये आपण घेत आहात आणि सभागृहातील सदस्य संख्या, सभागृहात असलेले बहूमत याच्यामुळे हा प्रकल्प ऊत्तनकडे सरकलेला आहे हे आमच्या दुदैवाची गोष्ट आहे. पण व्यवहाराला सुद्धा सामोरे जाण्याचे दृष्टीकोन आमच्याकडे आहे. म्हणून त्यामुळे ह्या प्रकल्पाच्या संदर्भात आदरणीय महापौरजी, आदरणीय पिठसिन अधिकारीजी या संदर्भामध्ये आमचे जे काही प्रश्न आहेत. आम्ही आता पाचर मारण्याचे काम करणार नाही. परंतु, जी वस्तुस्थिती आहे. ते विचारुन त्याचे स्पष्टीकरण करुन घेऊन त्याचे निराकरण करण्याच्या ऊद्देशाने मी, ह्या प्रश्नातील दोन प्रश्नाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. माझे दोन प्रश्न टेक्निकल दृष्टीकोनातून आहेत आणि दोन प्रश्न धोरणात्मक दृष्टीकोनातून आहेत. टेक्निकल दृष्टीकोनातला माझा प्रश्न आहे की, आता चर्चा होताना दोन्ही बाजूंनी शब्द आले आर.एन.डी रिसर्च ॲण्ड डेव्हल्पमेंट. जर ह्या प्रकल्पावरती होणार असेल तर ही फार धोक्याची गोष्ट आहे. डोन्ट बिलिव्ह इन रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट राईट नाऊ. वी मस्ट हॅव समथिंग ॲबस्ल्युट, क्रॉक्रिट. आय रिपीट क्रॉंक्रिट असायला यु मे रिप्लाय मी लेटर ऑन. बट आय गॉट डाऊट की, आर.एन.डी शब्द वापरल्यामुळे आपला प्रकल्प वी डोन्ट हॅव १०० परसेन्ट कॉन्फीडन्स इन युअर प्रोजेक्ट आणि ते जर नसेल तर मग उत्तनला तो घनकचरा घेऊन जा किंवा सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्या पाठी मागे स्थापन करा याचा रिझल्ट सारखाच येईल. सन्मा. सदस्य मोहन पाटील माझे मित्र आहेत. तर आर.एन.डी ह्याला माझा आक्षेप आहे. पण ही हॅज अ लरनेड पर्सन. यु आर एक्सपल टाईप पिपल. वी विल रिसपेक्ट वॉट क्लेरिफिकेशन विल गिव्ह अप ऑन ते आम्ही मान्य करु. माझा दुसरा एक प्रश्न आहे शायद आप मेरी भाषा समझ गये है। मराठी मे बोल रहा हूँ तब भी। आप जो इसके लिए मशिनरी इस्तमाल करेंगे वेदर दॅट मशिनरी इज ब्रॅन्ड न्यू ऑर इट इज बॉरो, इट इज सेकंन्ड हॅन्डेड ऑर इट इज इंपोर्टेड. यु गव्ह मी युअर क्लेरिफिकेशन आफ्टरवर्डस् तो माझा धोका आहे. कारण कधीतरी मोठ्या प्रकल्पाच्या नावाने सेकंन्ड हॅन्ड मशिनरी लावतील आणि मग ती दुरूस्त होताना ६ महिने जातील आणि त्या ६ महिन्यात सगळ्याचं भारताचं भलं होईल. म्हणून मला त्यावर आपल्याकडून क्लेरिफिकेशनची गरज आहे. यु क्लेरिफाय समथिंग मोर. माझ्या मनात तो डाऊंट होता की, गोळा झालेला कचरा साईडस् वरती डम्प झाल्यानंतर त्याचं वजन झाल्यानंतर एकझ्क्टकली त्याचे प्रोसेसिंग किती वेळात सुरू होईल. वेदर इट विल टेक १० मिनिटस् ओर इट विल गो अव्हस ॲन्ड अव्हर्स इफ इट इज गो अव्हर्स ॲन्ड अव्हर्स इट व्हील क्रिएट न्युसेंस म्हणून आमचा त्याला आक्षेप आहे. अशा स्वरुपाची आमच्याकडे यंत्रणा आहे. जब मटेरियल डम्प हो जाएगा तुरंत ही उसका डिस्पोझल सुरु हो जाएगा। प्रोसिजर शुरु हो जाएगा और ऊसमे न्युसेस नही बढेगा। इसका भी आपको हमी देना पडेगा। म्हणून या दोन गोष्टी क्लेरिफाय केल्यांनतर तत्पुर्वी माझ्या दोन धोरणात्मक गोष्टींचा उहापोह करतोय की, मागच्या सभेमध्ये जेव्हा या घनकचऱ्याच्या प्रकल्पाचा विषय आला त्यावेळी आम्ही मागणी केलेली आहे की, शहराच्यासाठी त्या परिसरातील लोकांनी एवढी रिस्क घ्यायची, धोका पत्कारायचा आणि सुहास्य वदनाने हसता-हसता समोर जायचे, प्रकल्पाचे स्वागत करायचे. पण त्या ठिकाणच्या लोकांची ह्या प्रकल्पावर काही अंशी त्यांच्यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. तो अंकुश कसा ठेवायचा? ते मी त्या सभेत सांगितलेले होते की, त्यासाठी एखाद्या जुन्या सरपंचाची, माजी नगरसेवकांची, कार्यकर्त्यांची एखादी एक समिती त्याठिकाणी असायला पाहिजे आणि ती आपल्या ॲग्रीमेंटमध्ये करुन घ्यायला पाहिजे अशी माझी त्या भागाच्या वतीने सुचना आहे. दुसरा एक धोरणात्मक असा प्रश्न आहे. घ्यावी की नाही हा धोरणात्मक प्रश्न राहील. सभागृह समर्थ आहे सभागृह ठरविल. दुसरा एक धोरणात्मक प्रश्न आहे की, या ठिकाणी ४०० टन कचरा रोज जाणार आहे. ४०० टन एका गाडीची, एका डम्परची दोन टनाची कॅपेसिटी धरली तर २०० वाहन त्या उत्तनच्या वेशीवर जाणार आहेत. जो रस्ता आपण प्रस्तावित केलेला आहे. त्या ठिकाणी जर वळन घ्यायचा प्रश्न घेतला तर त्या वाहनांची रांग सन्मा. सदस्य बोर्जीस साहेबांच्या दारापर्यंत जाईल. एवढी मोठी वाहनाची रोग त्या परिसरात लागेल. दुसरे, ४०० टन कचरा नेताना २०० गाड्या उत्तनला पाठवाव्या लागतील आणि त्याच २०० गाड्या भाईदरला परत सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांच्याकडे येतील. तर त्यामुळे त्या रस्त्याची पोजिशन काय? हा धोरणात्मक दृष्टीकोनातून विचार व्हायला पाहिजे. जे काही सन्मा. सदस्य रस्त्यांच्या रुंदी कमी करा, रस्ता करुच नका बोलतात. सर्व समर्थ सभागृहाने त्याचा विचार करावा अशी विनंती आहे.

**हेन्जर बायोटेक एनर्जी (प्रतिनिधी) :-**

साहब, के जो दोन प्रश्न थे। पहला था आर.एन.डी के संदर्भ मे आर.एन.डी से मेरा मतलब यह नही है के हम आपके यहा लगाके आर.एन.डी करेंगे। दो सालसे राजकोट मे ३०० टन पर डे सक्सेस फुली प्रोसेस करने का अपने पास ट्रक रेकॉर्ड है। और यह ट्रक रेकॉर्ड का जे.यू.एन.आर.एन जवाहरलाल नेहरू, अर्बन रिन्युअल मिशन ने सहकारा है। और हमारी प्रोजेक्ट के बेस पर राजकोट सिटी को म्युनिसिपल सॉलिड वेस्ट कलेक्शन सिस्टम इम्प्रु करने के लिए डम्पर इम्प्रु करने के लिए ३५ करोड रुपया ऊन्होने सॅक्शन किया है। जो जे.यु.एन.आर.एन. की, वेबसाईड है ऊसपे आपको देखने के लिए मिलेगा। तो यह सर, आर.एन.डी. से मेरा मतलब नही था की, इस प्रोजेक्ट की आर.एन.डी जैसे आपने बोला हमारे यहा बफिंग पावडर को प्रोसेस करने के लिए आर.एन.डी डिपार्टमेंट रखा है। क्योंकी हम यह प्रोजेक्ट ठाणामे कर रहे है। नासिक मे करनेवाले है। सुरत मे करने वाले है। हर शहर का अलग टाईप का कचरा है। उस कचरे को हमे पुरी तरह सॉल करना है। क्योंकी हम कमिटमेंट दे रहे है। २० टक्कासे १९ टक्का से ज्यादा हम आपको रिटर्न नही दे रहे है। तो एक फुल फ्लेट्स बायोटेक्नॉलॉजी का आर.एन.डी डिपार्टमेंट है। जैसे साहाब ने बोला की आपका लिमिटेड टेक्नॉलॉजी नही है। आपकी टेक्नॉलॉजी अॅडेपटेबल है। यह प्रॉब्लेम सॉल करने के लिए अॅडपटेबल टेक्नॉलॉजी चाहिए और अॅडपटेबल टेक्नॉलॉजी के लिए नए नए डिपार्टमेंट चाहिए। नए नए शोधा करते रहने चाहिए क्योंकी अगर हम आज आपका बफिंग पावडर का सॉल किया कल कही टेट्राप्याक का प्रॉब्लेम आयेगा कही वेस्ट का प्रॉब्लेम आयेगा अगर हम यह कहेंगे के हम यह ४ आयटम ही बनाते है और बाकी हम नही करते है। दॅन वेस्ट विल इनक्रिज। जो डंम्पिंग का वेस्ट है वह बढ जायेगा। इसलिए आन.एन.डी यह इम्प्रुव्हमेंट के लिए है। प्रुव्ह इन टेक्नॉलॉजी के लिए नही है। जो आपका नेऊ टका जो कचरा है ९० टक्का कचरा है वह हम ऑलरेडी प्रोसेस कर रहे है। अभी एक नयी आयटम आ गई वह १० टक्का के लिए आर.एन.डी डिपार्टमेंट रखा है। जो ऊसको भी फिनीश कर देगा और बाय द टाईम हम ये प्रोजेक्ट इम्लिमेंट करेंगे शायद हम बफिंग पावडर का सोल्युशन भी निकाल देंगे तो आर.एन.डी डिपार्टमेंट इज नॉट फॉर दि बेसिक प्रोजेक्ट, इट इज फॉर इम्प्रुव्हमेंट इन दि प्रोजेक्ट ॲण्ड आपका जो सेकंण्ड प्रश्न था की कितने टाईम मे कचरा प्रोसेस होगा जैसे मैंने पहिले बताया की कचरा आते ही हम स्प्रे करते है। स्प्रे करनेसे सबसे ज्यादा प्रॉब्लेमॅटीक चिज है बदबू वो बदबू खत्म हो जाती है। इसको टिपींग फ्लोअर पर डालने के विथीन प्यु ३० टू ४५ मिनिट्स मॅक्झीमम एक घंटा वह सेग्रीकेशन मे चला जाता है। सेग्रीकेशन होने के बाद ऊसकी अलग अलग जो प्रोसेस है उसमे वो जाएगा तो ओरिजनल फॉर्म मे वह कचरा ज्यादा से ज्यादा १ घंटा हम पकड सकते है। लेकिन वह ओरिजनल फॉम नही बोला जाएगा। क्योंकी आतेही कंपाऊन्ड मे स्प्रे कर दिया तो ओरिजनल फॉम मे कचरा टिपिंग फ्लॉर पर भी नही जाता है। ट्रीटेड जाता है। ट्रीटेड के बाद प्रोसेस के लिए जात है। तो ऐसे के ऐसा कचरा पड नही रहेगा। जो प्रॉब्लम आप कह रहे है बदबु वगैरे का वह प्रॉब्लम आए तो इट इज ऑलरेडी ट्रिटेड ऑन दी फस्ट स्टेप विथींग दन दी फस्ट स्टेप।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आता त्यांना विचारायचे आहे की, डॉ. इरफानजी............

**हेन्जर बायोटेक एनर्जी (प्रतिनिधी) :-**

मशिनरी का जहॉ तक सवाल है। वह ब्रॅन्ड न्यु मशिनरी इंडियन मॅन्युफॅक्चरल ॲन्ड ब्रॅन्ड न्यु मशिनरी ऑल ओव्हर इंडिया से सोर्स करके अपने बिझनेस के लिए ऊसे सुटेबली डिजाईन करके हम बनवाते है, स्पेशली बनवाते है और दुसरी चिज साहब कोई सेकंड हॅन्ड मशिन लगाऐगा कब जब इसमे कोई सबसिडी है। इसे धंदे मे कोई सबसिडी नही है। हम को ही काम करना है। कमाना है, खाना है। इसमे अगर कमाई नही होगी तो हम खाऐंगे नही। कोई गर्व्हरमेन्ट सबसिडी नही है, कोई इंटरेस्ट सबसिडी नही है, कोई बेनिफिट्स नही है।

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. महापौरजी डॉ. इरफान से कुछ सवाल करने है। मै आपसे जानना चाहता हूॅ।

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ६९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैंनदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प उभारणे कामी या अंदाजपत्रकास मंजुरी देणेबाबत. सन्मा. महापौर साहेबा या ठिकाणी हा विषय अनेक महिन्यानासून का असे ना पण, आपण विषय सभापटलावर आणलेला आहे आणि त्यासाठी मी आपल्या सर्वांचे अभिनंदन करतो. मा. कमिशनर साहेबांचे सन्मा. नगरसेवकांचे अभिनंदन करतो. सर्वात जास्त उत्तन परिसरातील असलेले सर्व मोठे मन दाखविले. त्याठिकाणी आणि या प्रकल्पाला या ठिकाणी त्यांनी सकारात्मक रित्या सहकार्य केलेले आहे. सन्मा. सभागृहातील माजी नगराध्यक्ष सन्मा. प्रफुल्लजी पाटील, सन्मा. आमचे जेष्ठ सदस्य लिओ कोलासोजी, सन्मा. जयंत पाटील आदी सर्व सदस्यांनी आपल्या शंका आणि जे प्रश्न ऊपस्थित केले त्यांना अत्यंत समाधानकारक प्रभावीपणे ऊत्तर डॉ. इरफानजी यांनी चांगल्या पध्दतीने अभ्यासपूर्ण उत्तर दिलेले आहे आणि सर्व सभागृहाचे असे मत झालेले आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा आणि सर्वोच्च न्यायालयाने जे आपल्यांना बंधन

घातलेले आहे. त्या बंधनातुन आपण लवकरात लवकर मुक्त होऊ. तर मला असे वाटते की, आजच्या सभेत आपण ऐतहासिक निर्णय घेत आहोत. त्या बद्दल मी सर्वांच्यावतीने अभिनंदन करित आहे.

(सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख ह्यांनी प्रकरण क्र. ६९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

मेरा अनुमोदन आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

अनुमोदन देताना मला असे बोलायचे आहे की.........

**मा. महापोर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी आपण चांगला निर्णय घेतलेला आहे. ठरावही झालेला आहे. मघाशी सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी प्रस्ताव मांडला. त्याच्यामध्ये त्यांनी गाड्यांची संख्या सांगितली. पहिली गोष्ट आता ह्यापुढे ६३ प्रकरण येणार आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला वेगवेगळा कचरा गोळा करण्याची आवश्यकता नाही. एक विषय झाला त्याच्या अनुषंगाने सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी प्रश्न याठिकाणी मांडला. त्याच्यामध्ये त्यांनी जी गाड्यांची कॉन्टेटी दाखवली त्यामध्ये आजच्या तारखेला आपल्या ज्या गाड्या आहेत. कचरा उचलून आपण हे शहर सुंदर करित आहोत. आपण शहरामध्ये कॉंक्रीटचे रस्ते करित आहोत, गार्डन्स बनवित आहोत. परंतु, ज्या गाड्यांची जी खस्ता अवस्था आहे. त्यामुळे कचरा पॅक होत नाही, कचरा बंद होतो. कचरा बिल्डींगवर उडतो. त्यामुळे दुर्गंधी येते. आपण हा चांगला प्रोजेक्ट राबवित आहोत. त्याकरिता जर आपण बंद गाड्या घेतल्या आणि मोठ्या गाड्या आपण घेतल्या तर कचरा कॅरिंग करायला सोपे जाईल. पोल्युशन होणार नाही. २० टनाचे आपण गेन घेतले तर त्या गाड्या आपल्या सभागृहातील नेत्याच्या घरापर्यंत लाईन लागणार नाही. आपण जर अशाप्रकारे कचरा कॅरिंग करायची व्यवस्था केली. तर हा महत्वाचा विषय आहे. मागच्या वेळी आपण ही पध्दत आणली होती. परंतु, ही पध्दत आणल्यानंतर त्या लोकांना गाड्या घ्यायला परवडणार होते. म्हणून आपण ते एक वर्षाच टेन्डर बोललो होतो. पण आपण स्वतः अशी पध्दत अवलंबिली आणि असा जर कुठला कॉन्ट्रॅक्टर मिळाला तर तो भाग वेगळा आहे. पण याठिकाणच्या लोकांनी जर काम करायला सुरुवात केली त्यांनी माणूसकी दाखवली. तर त्यांना ते कॉन्ट्रॅक्ट आपण एक वर्षाचे तीन वर्षाकरिता दिले तर त्या गाड्या घेऊन इन्व्हेस्टमेन्ट करु शकतो. अशा दोन्ही पध्दतीचा अवलंब करुन अशा गाड्या आपण शहरात आणल्या तर पोल्युशन कमी होईल. कचरा त्या जागेवर लवकरात लवकर पोहचेल. शहरात कुठेही दुर्गंधी पोहचणार नाही. म्हणून अशी पध्दत आपण अवलंबली तर या घनकचरा प्रकल्पाला ती पुरक ठरेल. अशी माझी सुचना आहे. ही सुचना जरा आपण विचारधिन घ्यावी.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी काही सूचना दिलेल्या आहेत. जे निर्देश दिलेले आहेत त्या प्रमाणेच प्रस्ताव सादर करण्यात येईल. थोडक्यात मला असे महत्वाच सांगायच आहे की, हे जे नवीन पद्धतीचे जे ठेकेदार आलेले आहेत. जे जवळ जवळ बारा-बारा, तेरा-तेरा टनाचे कॉन्ट्रॅक्टर आहेत म्हणजे एकच कॉन्ट्रॅक्टर हा बारा-बारा टनाचा कॉन्ट्रॅक्टर असतो त्यामुळे सन्मा. सदस्य कोलासो साहेब मनामध्ये आपल्या जी भीती आहे. २०० गाड्या त्या ठिकाणी सन्मा. सदस्य बोर्जिस साहेबांच्या घरापर्यंत गाड्यांची रांग लागेल तर ती भीती कृपया मनातून काढून टाका. असे काही होणार नाही.

**जयंत पाटील :-**

माझी सूचना आहे आपल्या ॲग्रीमेंटमध्ये ४ नंबर कॉलममध्ये आपण लिहीले आहे की, मिरा-भाईंदरमहानगरपालिका वापराकरिता सेंद्रिय खत पुरवठा बाजार मुल्यापेक्षा २५ टक्के कमी दराने मी आपल्याला रिक्वेस्ट करतो की, या शहरातील जे शेतकरी आहेत. आय ॲम ऑलसो फार्मर. मी मागे नाशिकवरुन एक टेंपो भरुन खत आणले होते. त्यांनाही आपण काही डिकस्काऊंट मधून दिल तर....

**मा. आयुक्त :-**

हे जे डिस्काऊंट आपण त्यांना दिलेले आहे हे महानगरपालिकेकडून खरेदी करणार आहेत त्यांच्यासाठी डिस्काऊंट आहे.

**जयंत पाटील :-**

मला ते कळलं. ते समजले, आपल्यासाठी ३५ टक्के शहरातील शेतकरी खासकरून ऊत्तन मध्ये जे आहेत. उत्तनमध्ये, इतर या शहरामध्ये राहणारे त्यांना आपण काही परसेंटेज डिस्काऊंटमध्ये जर दिले तर विक्री आपोआप होईल आणि इथे राहणाऱ्या शेतकऱ्यांचाही फायदा होईल. आणि जैविक खते वापरण्याची त्यांना सवय लागेल. तेवढे ॲग्रीमेंटमध्ये कंडीशन टाकून घ्या. त्याच्याशी जरा चर्चा करा. त्याचा ठरावामध्ये उल्लेख करून घ्या.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचरा बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा हा जो ठराव आपण मांडला खरोखरच विषय फार महत्त्वाचा होता. गेल्या वेळेस सुचक म्हणून ठराव मांडला होता आणि अनुमोदक म्हणून सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब यांनी मान्यता दिली होती आणि आज हा विषय आपण घेतला त्याबद्दल मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. शेख साहेब ह्या सर्वांचे मी इथे मनःपुर्वक आभार मानत आहे. रोगराईबद्दल इथे भरपूर चर्चा झाली पण कचराच जर आपल्या शहरात राहिला नाही तर रोगराई होणार नाही. आणि येणाऱ्या काळामध्ये मिरा-भाईंदर शहराची कायापालट होईल. आणि त्यासाठी आपण हा विषय घेतला त्याबद्दल धन्यवाद.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६० चे वाचन केले.)

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. नगरसचिव जरा थांबा मा. महापौर मॅडम तुंम्हाला ऐकावच लागेल. ६ महिने कलेक्टरने जेंव्हा गुन्हा दाखल केला त्यावेळी मी ६ महिने कचरा टाकायला जागा दिली होती. आज आपण बोलता की माझे ऐकणार नाही याचं मिनींग काय? आता माझे असे म्हणणे आहे की पुढचे जे ६ महिने बाकी आहेत. तेंव्हा आता तो कचरा कुठे डंपिंग करणार त्याची माहिती देण्यात यावी.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी तो त्यांचा प्रश्न नाही. त्या संदर्भात मा. आयुक्तांना विचारा.

**शुभांगी नाईकः-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी तो त्यांचा प्रश्न नाही. मा. आयुक्तांना तुम्ही प्रश्न विचारा.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ह्यांना माझा असा प्रश्न होता की, आपल्याकडे प्रकल्पासाठी जी लॅन्ड आहे कचरा तिथे आपण डंपिंग केला आणि ६ महिन्यानंतर ज्यावेळी हा प्रोजेक्ट चालू होईल त्यावेळी त्याचा युटीलाईज करून सेल करता येईल का?

**लिओ कोलासो :-**

आम्ही देणार नाही. आमच्या भागात कचरा आणून टाकायला. घन कचरा प्रकल्पसाठी ती जागा आहे. तिथे प्रकल्प आला पाहिजे डंपिंग ग्राऊंड नाही.

**हेन्जर बायोटेक एनर्जी (प्रतिनिधी) :-**

एम.एस.डब्ल्यु. रुल्स २००० में सिंपल थिंग नही कर सकते। अभी जो आप कर रहे है वो सिंपल डंपिंग है। और यह लँड जो गव्हर्नमेंटने दिया है वो एम. एस. डब्ल्यु प्रोसेस के तहत दिया है। अगर वो करेंगे तो गुन्हा होगा।

**नरेंद्र मेहता :-**

तो कचरा आप यहाँ आप कही पर भी डालते हो। अभी कही पर भी कचरा डाल रहे हो वह गुन्हा नही है।

**मा. आयुक्त :-**

वह गुन्हा है पर यह खास स्किम आपको दि गई है।

**नरेंद्र मेहता :-**

यह भी तो गुन्हा ही है। मा. आयुक्त साहेब बर झाल हा विषय चर्चेला आला. गेल्या ६ महिन्यात सर्वांना चांगल्यारित्या माहिती आहे की मी माझ्या प्रभागात जेवढी मदत करता येईल तेवढी मदत कचऱ्यासाठी केलेली आहे. त्यानंतर आश्वासन देण्यात आले होते की, त्या कचऱ्यावर माती टाकून बुजवण्यात येणार आहे. आता मला दसऱ्याला भुमीपुजन करायचे होते. पण ते पोस्टपोन्ड झालेले आहे आणि अजूनही तिथे माती टाकण्यात आलेली नाही. त्यावर तरा लक्ष द्या.

**रतन पाटील :-**

अजून तिथे कचरा टाकायचा आहे का? पाहिजे असेल तर टाकून देऊ.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो काही मुद्दा ऊपस्थित केलेला आहे त्याप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या जागेमध्ये महानगरपालिकेने यापुर्वी कचरा टाकलेला होता आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जी काही माती भराव करून पाहिजे होते किंवा यापुर्वी करणे गरजेचे होते. परंतु कुठल्या तरी कारणावरुन ते शक्य झाले नसेल मी आपल्याला आश्वासन देतो की, त्या ठिकाणी जो कचरा टाकलेला आहे तो कचरा त्या ठिकाणी जे.सी.बी. किंवा पोकलन मशिन लावून तो पसरला जाईल आणि त्यावर माती टाकून देण्याची मी व्यवस्था करून देतो.

**नरेंद्र मेहता :-**

कधी पर्यंत?

**मा. आयुक्त :-**

दुसरा एक महत्वाचा विषय आहे.

**परशुराम पाटील :-**

साहेब, माझ्या ७८० मध्ये माती टाकून द्या. मला अडीच वर्ष झाली.

**मा. आयुक्त :-**

ज्या ज्या ठिकाणी महानगरपालिकेने कचरा टाकलेला आहे. त्या त्या ठिकाणी मी तुंम्हाला करून देतो ना.

**परशुराम पाटील :-**

त्याची कॅसेट करा.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाला माझी एक विनंती राहिल की, हा जो प्रोजेक्ट आहे. या प्रोजेक्टला आपण सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. मी सभागृहाचे मनापासून हार्दिक अभिनंदन करतो आणि धन्यवाद देतो. परंतू प्रशासनासमोर एक फार महत्त्वाची अडचण आहे. ती अडचण अशी आहे की, हा प्रोजेक्ट सुरू होण्यासाठी लागणारा जो कालावधी आहे तोपर्यंत जो काही कचरा या शहरामधून निघणार आहे तो शहरातील कचरा कुठेतरी टाकण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी खाजगी जागा जर उपलब्ध होत असेल आणि खाजगी जागेचे जर भाडे द्यायचे असेल तर ते भाडे महानगरपालिका देईल किंवा सभागृहामध्ये आपण सांगितले या ठिकाणी मातीचा भराव करून देऊ किंवा त्याच्यावर माती टाकू. ती सगळी मदत महानगरपालिकेमार्फत केली जाईल. परंतु, सर्व सन्मा. सदस्यांना माझी नम्रतेची विनंती राहील की, हा प्रोजेक्ट सुरू होण्यापुर्वी किंवा सुरू होईपर्यंत कुठेतरी आम्हाला सगळ्यांनी सहकार्य करावे आणि प्रशासनाने डे टू डे च्या ज्या अडचणी होतात आता मघासपासून जी चर्चा झाली वीस-वीस, पंचवीस-पंचवीस नंतर एका लाईनने उभे राहीलेले ते मीसुद्धा पाहिलेले होते. त्या ठिकाणी पोलिसांची ही व्यवस्था होती. परंतु, काही मंडळी तिथे विरोध करतात तर त्यांचा विरोध खरोखर युनियन असेल तर तो मान्य करायला हरकत नाही. परंतु, जर विरोधाला विरोध करीत असतील तर ते ही बरोबर होणार नाही.

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब आपले बोलून झाले. धन्यवाद, साहेब जसे आपण आम्हाला आता वचन दिले की जे.सी.बी. लावून कचरा टाकलेली जागा आहे तिथे माती टाकुन प्लेन करून देण्यात येईल. पण आम्हाला हे लेखी द्याल तर बरे होईल. साहेब, ७८० मध्ये माझी स्वतःची जागा आहे. माझ्या जागेतून ३ वर्ष झाली गटारं गेली मी कधीही रोकले नाही. मला एफ.एस.आय. आणि टी.डी.आर.सुद्धा मिळालेले नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, जिथे कचरा टाकायला जागा दिलेली आहे तिथे अजुन पर्यंत माती टाकलेली नाही.

**प्रकरण क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर प्रक्रिया करणेसाठी प्रकल्प ऊभारणेकामी प्राप्त प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर **बांधा, वापरा व हस्तांतरीत** करा या तत्वावर उत्तन व पाली येथील जागेवर प्रक्रिया करणेसाठी प्रकल्प उभारणीकामी मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाकरिता आवश्यक क्षेत्र | ३० एकर ३० वर्षाकरिता |
| २) | महापालिकेस मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांच्याकडून प्राप्त होणारे जागाभाडे | रु. १ प्रति चौरण मिटर प्रति वर्ष |
| ३) | प्रक्रिया पूर्णत्वाअंतीचे Rejection Material | 19% |
| ४) | महापालिका वापराकरिता खत पुरवठा बाजार मुल्यापेक्षा | ३५ टक्के कमी दराने |

मे. हेंजर बायोटेक एनर्जी यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावास ही महासभा मंजुरी देत आहे.

वरील प्रकल्पामधून निघणारे Rejection Material ची विल्हेवाट लावणेसाठी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० मधील तरतुदीनुसार Land fill साईट तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

उत्तन येथे महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणारा घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खाजगी जागा भाडे तत्वाने घेण्यास यावी याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६० चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे, प्रकरण क्र. ६० चा सभागृहासमोर ठराव मांडला

**परशुराम पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. मा. महापौरांचे पहिल्यादी आभार मानतो कारण मागच्या मा. महासभेत ठराव झाला आणि आपण हा विषय घेतला. पण सदर संक्रमण शिबीराची जागा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये कुठे जाहीर केलेली आहे. कुठे बांधणार ते प्रथम जाहिर करावे.

**प्रकरण क्र. ६० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी आपत्कालिन परिस्थितीत तात्पुरत्या स्वरूपात राहण्यासाठी संक्रमण शिबिराची व्यवस्था करणे बाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३१/०७/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ६५)

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतीतील रहिवासी तसेच आपात्कालीन परिस्थितीत बेघर होणाऱ्या रहिवाश्यांकरिता तात्पुरत्या निवारा पाणी, विज, बाथरुम, शौचालय, इ. व्यवस्थेसह शेड, तंबू बांधणे करिता, महानगरपालिका हद्दीतील जागा मा. आयुक्त यांनी निश्चित करुन रहिवाशांना तात्पुरत्या स्वरुपात निवारा उपलबध करुन देणेबाबत मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६१ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. हा चांगला विषय आहे. ह्याच्यावर बोलण्यासारखे काहीच नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, संक्रमण शिबीर असतांना.....

**रतन पाटील :-**

मा.महापौर मॅडम, आम्ही चुकीचे काही बोलत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

या विषयावरच्या सूचना आहेत.

**रोहीदास पाटिल :-**

आम्ही या विषयावर बोलायचे नाही का? जर बोलायचे नसेल तर आम्ही सरळ बाहेर जातो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण विषय सरळ पास करा आम्ही बाहेर जातो.

**रतन पाटील :-**

आम्ही या विषयाला विरोध करत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महासभा कोणासाठी आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या सूचना ऐकून घ्या. मग आपण ठराव मांडा.

**रोहीत सुवर्णा :-**

या विषयावर आमच्या काही सूचना आहेत. आंम्हाला बोलण्याची संधी द्या.

**रतन पाटील :-**

आम्ही विरोध करत नाही तरीसुद्धा बोलायला देत नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

आपल्या ज्या काही सूचना असतील त्या प्रत्येकाने कृपया पक्षाकडे देऊन एकत्रित करून द्याव्यात.

**रतन पाटील :-**

लेखी देऊ ना. आयुक्तांकडे सूचना द्या. असेच आहे ना.

(सभागृहात गोंधळ)

**रोहीत सुवर्णा :-**

आमच्या सूचना आपण ठरावामध्ये समाविष्ट करून घ्या.

**रोहीदास पाटिल :-**

ही सूचना सभागृह नेते देत आहत की, पिठासिन अधिकारी देत आहेत?

**मा. महापौर :-**

एका वेळेस आपण एक जणांनी बोलावे. आपण चार-चार जण उठून गोंधळ करता. मग आपल्याला कशी परवानगी देणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर चर्चा करायची नाही. तर हे सभागृह कशाला आहे?

**मा. महापौर :-**

विषयावर चर्चा करण्यासाठी गटनेत्यांना दोन मिनीटे देण्यात येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे नाही. सभागृहामध्ये बोलण्याचा आंम्हाला अधिकार आहे. धोरणात्मक विषय असेल तर आपण गटनेत्याला केबिनमध्ये बोलवा आणि तिथे निर्णय घ्या. या सभागृहामध्ये सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. फक्त गटनेत्यांना बोलण्याचा अधिकार नाही.

**शरद पाटील :-**

सर्व सदस्यांना बोलायला द्यायचा अधिकार हा आपलाच आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मॅडम, सबको अधिकार है तो, हमलोग ऐसे बैठे रहेंगे क्या? इनकोही इतना बोलने का अधिकार है क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपको बोलने के लिए नही आता है इसलिए आप चुप बैठते हो। आपको बोलने को आता है क्या?

**महेंद्रसिंग चौहान :-**

गटनेता बोल रहे है तो दुसरा आदमी क्यो बोल रहा है? ठराव दो इधर मैं पढता हूँ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपको बोलने के लिए नही आता है इसलिए आपको इनका सुनके पाणी आता है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, जब सन्मा. नगरसेवक आसिफ शेखजी ठराव मांड रहे थे। तब सन्मा. नगरसेवक लिओ कोलासोजीने बडी दादागिरी से बोला था की, हमको पहले बोलने दो।

(सन्मा. सदस्यांना महेंद्रसिंग चौहान यांनी प्रकरण क्र. ६१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ६० च्या विषयावर मला बोलू द्या. हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्याच्यावर आपण स्वतः निर्णय घेऊ शकत नाही. सभागृहाचे म्हणणे एकून घ्या.

**मा. महापौर :-**

नगरसचिव पुढचा विषय घेण्यात यावा.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, हे काय चालले आहे?

**प्रकरण क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस भाड्यात स्वातंत्र्य सैनिकांना सवलत देणे बाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. ०३/०७/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १५)

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम दि. १५/०९/२००५ पासून प्रत्यक्षात बस सेवा कार्यान्वित झालेली आहे. परिवहन उपक्रमाकडे स्वातंत्र्य सैनिकांकडून बस प्रवासासाठी सवलतीच्या दराने बस भाड्यामध्ये सवलत मिळणे बाबतची मागणी होत आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तसेच ठाणे महापालिका परिवहन उपक्रम यांच्याकडील उपलब्ध माहितीनुसार स्वातंत्र्य सैनिकांना मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शहरातील स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या कडील ताम्रपत्राची ओळख पटवून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस भाड्यामध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्याकरीता मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहाण. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, हे काय चालले आहे? कदाचित तुमची ही शेवटची सभा आहे की काय?

**रोहीदास पाटिल :-**

आरामसे सहा महिने आपण काम करा. पण त्याची फळ तुंम्हालाच भोगावी लागतील. हे सांगुन ठेवतो.

**कैलासबेन जानी :-**

हा सगळा मनमानी कारभार चालला आहे. कोणालाही बोलायला देत नाही त्याचे कारण काय आहे?

**रोहीत सुवर्णा :-**

हे काय चालले आहे?

**धनराज अग्रवाल :-**

आपण कोणाला बोलायला देत नाही म्हणजे काय?

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही सत्ताधारी म्हणून काहीही करू शकता का?

(भारतीय जनता पार्टीचे सदस्य व शिवसेनेचे सदस्यांनी सायं. ५.०० वा. सभागृहातून ऊठून बाहेर गेले.)

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही आपल्या या पद्धतीचा निषेध करत आहोत. निषेध. आपण निषेध लिहून घ्या.

(सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी प्रकरण क्र. ६२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ६२ :-**

विद्यार्थी व प्रवासी पास योजनेच्या दराबाबत फेरविचार करणे व इयत्ता १२ वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेत सवलतीचे भाडे आकारणेबाबत. (मा. परिवहन समिती सभा दि. १४/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २३)

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने शालेय विद्यार्थी व प्रवाश्यांकरीता मासिक, द्वैमासिक व त्रैमासिक पास योजना मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. ४ दि. ०४/०१/२००६ व मा. महासभा ठराव क्र. ८० दि. २०/०१/२००६ अन्वये ठराव पारित करुन प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, कोकण विभाग यांच्याकडून भाडेसारणीस अंतिम मंजुरी प्राप्त केल्यानंतर दि. १८/०७/२००६ पासून सदर पास योजना सुरु करण्यात आलेली आहे. परंतु सदर योजनेस फारसा प्रतिसाद मिळत नाही. सदर योजनेअंतर्गत इयत्ता दहावी पर्यंत १८ वर्ष वयाच्या शालेय विद्यार्थ्यांनाच त्यांचा फक्त लाभ होत आहे. त्यामुळे इयत्ता १२ वी पर्यंत उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्यामुळे व मनपा हद्दीतील शाळांना साप्ताहिक सुट्टी वगळता फक्त २४ दिवस काही शाळांचे कामकाज चालत असल्यामुळे सदर पास योजनेचा फारसा फायदा होत नाही. सद्यस्थितीत परिवहन उपक्रमाकडून मासिक पास योजनेसाठी २६ दिवसाचे दुहेरी प्रवासाचे भाडे आकारुन ३० दिवसासाठी प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दिली जात होती. सदर मासिक पास

योजनेमुळे शालेय विद्यार्थ्यांना व प्रवाशांना कोणताही आर्थिक फायदा होत नाही. अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी सन्मा. परिवहन सदस्य, नगरसेवक व शालेय विद्यार्थी, प्रवाशांकडून येत आहेत.

त्यानुसार सदर पास योजनेबाबतच्या दरांची फेर रचना करतांना पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना २० दिवसांच्या दुहेरी प्रवासाचे भाडे आकारुन सवलतीच्या दराने मासिक पास देणे व सर्वसाधारण प्रवाशांकरीता २० दिवसांचे दुहेरी भाडे आकारुन ३० दिवसाच्या प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देणे योग्य होईल. विद्यार्थ्यांना ही सवलत फक्त शाळेच्या व महाविद्यालयाच्या वेळेत घरापासून शिक्षण संस्थेपर्यंत जाणेयेण्याकरीता उपलब्ध राहील. नोकरी धंदा करणारे विद्यार्थी या सवलतीला पात्र असतील. १२ वी व पदवीधर शिकरणारे विद्यार्थी नोकरीधंदा करणारे पात्र असतील.

सदर योजना राबवितांना परिवहन उपक्रमाच्या उत्पन्नात काही प्रमाणात तूट येण्याची शक्यता आहे. परंतु सदर योजना सुरु केल्यास परिवहन उपक्रमास हमखास प्रवासी उपलब्ध होऊ शकतील. तसेच आगाऊ रक्कम प्राप्त होईल. त्यामुळे पर्यायाने प्रवासी परिवहन उपक्रमाच्या बस सेवेशी बांधिल राहतील. यापेक्षा पास योजनेत जास्त सवलत देणे संयुक्तीक व हितावह ठरणार नाही.

तसेच ही सभा या ठरावान्वये असा निर्णय घेते की, दहावी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तिकीट दरात देण्यात येणारी सवलत यापुढे पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येईल. तिकीट दरामध्ये सवलत फक्त शाळेच्या व महाविद्यालयाच्या वेळेत घरापासून शिक्षण संस्थेपर्यंत जाणे-येण्याकरीता उपलब्ध राहील. पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तिकीट दराच्या सवलती करीता कोणतीही वयाची अट असणार नाही. तरी वरील प्रमाणे पास योजनेच्या दरात फेरबदल करणेबाबत मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६३ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, प्रकरण क्र. ६९ मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचरा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर प्रक्रिया होण्यासाठी प्रकल्प उभारणीसाठी प्राप्त प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबतचा विषय झाला होता. या विषयाच्या अनुषंगाने डॉ. इरफान यांनी आपल्याला सूचना केल्या की, कोणत्याही प्रकारचा कचरा एकत्र करण्यासाठी आपल्याला वेगवेगळा करण्याची गरज नाही. म्हणून हा विषय याठिकाणी आपण तहकुब करावा. कारण आपल्याला ६३ विषय घेण्याची गरज नाही. पुढचा विषय घेण्यात यावा. मा. महापौर महोदया, पुढचा विषय घ्यावा हा विषय तहकुब करावा.

**रोहीदास पाटिल :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहामध्ये सर्व सदस्य सन्मानित आहेत. कोणताही पक्ष जरी असला तरी तो त्या पक्षाचा.......

**मा. महापौर :-**

आपण जागेवर बसून घ्या.

**रोहीदास पाटिल :-**

कोणत्याही पक्षाचा असला तरी आपण एकसारखे सदस्य समजून वागले पाहिजे. आपण ज्यापद्धतीने हे सभागृह चालवत आहात. त्या पद्धतीचा आम्ही निषेध करतो आणि त्यात वॉर्निंग ही देतो की, हे सगळे रेकॉर्ड होत आहे. चार महिन्या नंतर येणाऱ्या निवडणूकीसाठी आपण तयारीत रहा. आपल्याला जनता माफ करणार नाही. हे आपल्याला आम्ही सांगून देतो.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्रमांक. ६३ हा विषय या मा. महासभेपुरता पेंडिंग ठेवण्यात येत आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, या विषयाची आवश्यकता नाही. आपण लिहून द्या हा विषय कॅन्सल करण्यात यावा.

**प्रकरण क्र. ६३ :-**

महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) अध्यादेश २००६ चे नियम ३ मधील तरतुदीनुसार मनपा क्षेत्रातील सोसायटींना सुका कचरा व ओला कचरा वेगवेगळा साठविण्यासाठी प्लास्टीक डब्बे देण्याबाबत. (मा. आरोग्य परिरक्षण समिती सभा दि. २४/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्र. १२)

**ठराव क्र. ५१ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६४ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

बंदिस्त बाल्कनीचा जो विषय आहे तो विषय आज सभागृहापुढे आणलेला आहे. सर्व प्रथम श्री. घेवारे साहेबांना मी धन्यवाद देते. कारण सदर विषय त्यांनी मागच्या मिटिंगमध्ये आणला होता. परंतु, काहीतरी कारणास्तव की, गोषवारा नाही, हे नाही, ते नाही त्यामुळे ते पुढे ढकलले. आणि हा विषय त्यांनी परत आणलेला आहे आणि खुप चांगला विषय आहे कारण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त विकासक ओ. सी. काढत नाही आणि ओ.सी.चे जे पैसे जमायला पाहिजेत ते आपल्या कार्यालयात जमा होत नाही. म्हणून हा विषय त्यांनी पोटतिडकीने आपल्यासमोर मांडला होता. परंतु, मागच्या सभागृहामध्ये ते आपण स्थगित केले आणि ते पुढच्या सभेमध्ये घ्या असे आपण ठरवले. आज तो विषय आलेला आहे आणि त्या विषयाला मी मान्यता देते. परंतु, त्यामध्ये श्री. घेवारे साहेब अजुन एक इन्क्लुड करून द्या की, वॉटर कनेक्शन, पाणी देतांना ओ.सी. कंम्पलसरी करा. अशी मी सूचना देते.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, बंदिस्त बाल्कनीचा जो विषय आहे. या विषयामध्ये गेल्यावेळी मा. आयुक्त साहेबांनी गोषवाऱ्यामध्ये असे नमुद केले की, जर आपण बंदिस्त बाल्कनीच फी वाढवले तर बिल्डरला ओ. सी. घेणार नाही. बिल्डरला ओ. सी. घेणे हे बंधनकारक आहे. मा. महापौर मॅडम, बिल्डरला ओ. सी. घेणे हे बंधनकारक आहे. बिल्डींगला ओ. सी. घेतल्याशिवाय कुठलेही बिल्डर आपला फ्लॅट विकू शकत नाही. आणि ज्यावेळेस लोक फ्लॅट बुकिंगला येतात. त्यावेळी त्यांच्याकडून प्रत्येक बिल्डर पहिल्या माळ्यातील बाहेरील जागा विकतो. तर त्यावेळी कोणताही बिल्डर दोन हजार रुपये मागणार नाही. त्यावेळी तो पर स्वेअर फिटच्या हिशोबाने मागेल आणि दॅट कम्स टू मोअर दॅन लॅक्स ऑफ रुपिज. ह्याचा फायदा महानगरपालिकेला होत नाही. तो फायदा बिल्डरला होणार आहे. बाल्कनी बेडरुममध्ये असो किंवा हॉल मध्ये असेल बाल्कनी जर आपण इन्क्लोज केलात तर तो फ्लॅटधारकाला माफ करणार आहे का? तर नाही. नवी मुंबई महानगरपालिकेने २१ हजारप्रमाणे प्रिमियम लावलेला आहे. मुंबई महानगरपालिकेचे नेहमी ऊदाहरण देऊन चालणार नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आपल्या महानगरपालिकेने उत्पन्न वाढवायचे ठरवले आहे. एका बाजूला आपण १४१ कोटी कुठेतरी आपण आपल्या बॅलन्सशिटमध्ये इनबॅलन्स बॅलन्स आहे. असे असतांना बिल्डरच्या बाजूने जो निर्णय घेत आहात हे साफ चुकीचे आहे. बिल्डर महानगरपालिका चालवत नाही. पण याठिकाणी हा जो आयुक्तांनी गोषवारा आणलेला आहे तो पूर्णपणे बिल्डरांच्या बाजूने आहे. आणि याला आमचा निषेध आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सदर विषयाला जर त्यांची अनुमती नसेल तर, त्यांनी त्यांचा विरोध नोंदवावा. प्रकरण क्र. ६४ बंदिस्त बाल्कनीसाठीच्या दंडनिय.....

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण जे डी.सी. रुल्स वापरतो ते नवी मुंबई प्रमाणे त्याप्रमाणे हे दर द्यायला काही हरकत नाही.

**परशुराम पाटील :-**

बरोबर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

प्रत्येक डी.सी रुल्सच्या प्रमाणे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपला जो पहिल्यांदा ठराव झालेला आहे. ती जागा त्या लॅन्डपेक्षा जास्त आहे. लॅन्डचे मार्केट रेट जो असतो तो रेडीं फ्लॅटपेक्षा जास्त असतो आणि ॲक्च्युअल लॅन्डवर कमी असतात. त्याप्रमाणे हे बरोबर आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, हे तिघेही बिल्डर्स आहेत म्हणून ते गरिबांचा विचार करत नाही.

**मोहन पाटील :-**

बिल्डरचा इथे प्रश्न नाही. सध्या मुंबई मध्ये आकारणी सुरु आहे त्या रेट प्रमाणे आपण वाढ करत आहोत.

**गिता जैन :-**

मी, तर एवढे ही सांगते की आपण मुंबई प्रमाणे रेट कशाला घेता. आपण मुंबईसारख्या सवलती इथे देत नाहीत. मुंबईसारख्या सवलती द्या नंतर रेट लावा. नाहीतर अजुन रेट कमी करा. मा. आयुक्त साहेब, मुबंईसारख्या सवलती लवकर द्या.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ६४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ६४ :-**

बंदिस्त बाल्कनी साठीच्या दंडनिय शुल्काच्या आकारणी बाबत.

**ठराव क्र. ५२ :-**

तात्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ७५, दि. ०५/०८/९२ अन्वये बंदिस्त बाल्कनीसाठी दंडनिय शुल्क म्हणून रु. ५००/- (प्रती बाल्कनी) साठी आकारणे निश्चित केलेले आहे. तेव्हापासून आद्यापपर्यंत या दंडनिय शुल्कामध्ये वाढ झालेली नसल्यामुळे व सदरची दंडाची रक्कम ही सर्वसाधारण मिरा भाईंदर शहरासाठी समान असल्यामुळे विकसनशील क्षेत्रासाठी व अत्यल्प विकसनशील क्षेत्रासाठी तसेच बाल्कनीची लांबी - रुंदी, कमी जास्ती साठीही समान एकच रक्कम रु. ५००/- प्रति बाल्कनी ठरविण्यात आल्याचे दिसून आल्यामुळे व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी विकास आकाराच्या रक्कमेत वाढ अपेक्षित असल्यामुळे याबाबत सुधारणा करुन जमिनीच्या बाजारी दराप्रमाणे प्रिमियम रक्कम (प्रती चौ.मी.) आकारणे बाबत यापुर्वी मा. महासभा ठराव क्र. ९४, दि. २०/०३/०६ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार सदरचे बदल दि. ०१/०४/०६ पासून अंमलात आणण्याचे ठरविले असता सर्व वास्तुविशारद तसेच विकासक बंदिस्त बाल्कनी साठीच्या दंडनिय शुल्कामध्ये एकदम झालेली वाढ ही फारच मोठ्या प्रमाणात असून अन्यायकारक असल्याच्या तक्रारी वारंवार करत असून भोगवटा दाखला घेण्याचे प्रस्ताव फारच कमी झालेले आहे. याबाबत फेरविचार होणेबाबत वारंवार विनंती करुन मा. महासभेने वाढ केलेल्या दंडनिय शुल्कासाठीच्या प्रिमियम ऐवजी मिरा भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दी लगत असल्यामुळे मुंबई महानगरपालिकाप्रमाणे बंदिस्त बाल्कनी साठीचे सद्याच्या प्रचलित दराप्रमाणे दंडनिय शुल्काची आकारणी करण्याबाबत विनंती केलेली आहे.

बृन्हमुंबई महानगरपालिकासाठीचे सद्याचे प्रचलित दर बृन्हमुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. सीएचई /डीपी/६, दि.३०/०४/०२ नुसार खालील प्रमाणे आहेत.

| वर्णन | दंडनिय शुल्काची रक्कम |
|---|---|
| बंदिस्त बाल्कनीच्या ५.०० चौ.मी. क्षेत्रा पर्यंत | रु. २,०००/- |
| व त्यावरील प्रत्येक २.५० चौ.मी. क्षेत्रासाठी | रु. १,०००/- |

दि. ०१/०४/०६ पासून आजपर्यंत भोगवटा दाखला घेण्याचे कमी झालेले प्रमाण व मिरा भाईंदर शहरातील विकासक, वास्तुविशारद यांच्या विनंतीचा विचार करता दि. २०/०३/०६ च्या मा. महासभेने मंजूर केलेल्या बंदिस्त बाल्कनी साठीच्या प्रिमियम ऐवजी मुंबई महानगरपालिकाप्रमाणे बंदिस्त बाल्कनी साठी सध्याच्या प्रचलित दराप्रमाणे दंडनिय शुल्काची रक्कम (वरिल प्रमाणे) आकारणे बाबत ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुरमा पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ६५...

**महेंद्रसिंग चौहान :-**

यह बाहर नही गए क्या?

**रोहीत सुवर्णा :-**

अरे बाहर निकालनेवाले मेरे सामने हार गए भुल मत जाव। ९७ में मैंने ऊनको हराया। बाहर निकालने की बात कर रहे है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

कीस को हराया।

**रोहीत सुवर्णा :-**

आपको।

**महेंद्रसिंग चौहान :-**

कहाँ रह गए थे हाऊस में आए नही?

**रोहीत सुवर्णा :-**

मैं क्या करू सन्मा. धनराजजी अग्रवाल जित गए। तुम तो पिछे के दरवाजेसे आए गए ना?

**महेंद्रसिंग चौहान :-**

तुम तो रोडपर रह गए थे।

**रोहीत सुवर्णा :-**

मैं तो चुनके आया।

**महेंद्रसिंग चौहान :-**

वही पुछा की किधर आए? तीन - चार साल के बाद आए वह भी काँग्रस की मेहरबानीसे आए।

**रोहीत सुवर्णा :-**

लेकिन आपको रोना पडा। मुझे रोना नही पडा।

**महेंद्रसिंग चौहान :-**

अभी भी आपको सही जगह दी है। जहाँ बिठाया।

**रोहीत सुवर्णा :-**

तुमको जा के रोना पडा। मुझे रोना नही पडा। मैं चार पार्टी का वोट लेकर चुनके आया हूँ। प्रकरण क्र ६५ जो एम.आर.टी.पी. १९६६(३७) च्या अनुसार फेरबदलाचा जो प्रस्ताव आहे त्या ठिकाणी मी एक सुचवू इच्छितो की, रिझर्व्हेशन क्र. ८६ त्या ठिकाणी एक्सटेंशन टू प्रायमरी हेल्प सेंटर व त्या ठिकाणी आपले सिव्हील हॉस्पिटल येणार आहे. तसे आपण नमुद करून घ्यावे. कारण आपल्या डी. पी. प्लानमध्ये पब्लिक आणि सेमी पब्लिक असे नमुद आहे. पेज नं. ७३ मध्ये आपण पब्लिक, सेमी पब्लिकच्या ऐवजी मिरा भाईंदर म्युनिसीपल हॉस्पिटल असे नमुद करावे. अशी माझी विनंती आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलज आहे. आता आपण जे कही प्रस्तावित रस्ते विकसीत करण्याचे जे इथे ह्या महासभेमध्ये आलेला आहे. परंतु, माझे असे म्हणणे आहे की एखाद्या जमिन मालकाकडून आपण जागा विकासासाठी घेणार आहोत. रस्ते म्हणा, नाले म्हणा, त्या जागा मालकाला विश्वासात न घेता म्हणजे काही वेळेस त्या जमिन मालकाला माहितीही नसते की, माझ्या जागेवरुन रस्ता प्रस्तावित केलेला आहे. असे न करता आपल्या महानगरपालिकेमार्फत सदर जागा मालकास एक साधी नोटिस देता येत नाही का? असे नाही आहे का? फक्त पेपरला ॲड दिल्यानंतर ठराविक मुदत असते त्या मुदतीमध्ये त्याची हरकत आली नाही की, कोणाची हरकत आली नाही म्हणून की, असे माझे म्हणणे आहे की, सदर जागेमध्ये एखाद्या मालकाच्या जागेमधून रस्ता प्रस्तावित करत असेल किंवा विकास आपल्याला आरक्षित करायचे असेल तर त्या जागेच्या मालकाबरोबर चर्चा करुन साहेब, माझे असे म्हणणे असे की, जागा मालकाला सांगुन जसे हा डाचकुल पाड्याला जाणारा रस्ता आहे. लक्ष्मी बागेकडून तर त्या जागा मालकाला साधी कल्पनासुध्दा नाही की, माझ्या जागेमध्ये हा रस्ता विकसित होणार आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, तुम्ही माझ्या विचारांवरही, माझ्या सुचनेवर देखील रुलिंग द्यावे. सिव्हील हॉस्पीटलचा प्रश्न आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या प्रश्नाशीच संबंधित मघाशी पण, मी बोलले आणि आता ही माझा सेम प्रश्न आहे की, त्यांना जे म्हणायचे आहे. त्यांच्या जागेतुन रस्ते जाणार आहेत, नाले जाणार आहेत. त्यांच्याशी आपला काहीही संपर्क नसतो. मी मघाशी बोललो की, तसे नसेल तर तुमच्या प्रस्तावामध्ये जो मागचा ठराव झाला, ज्याला आपण मंजुरी दिली. त्याच्यामध्ये मी सुचनाही केली होती की, संबंधितांना आपण टी.डी.आर. देणार की, एफ.एस.आय. देणार हे मेन्शन करा. तेव्हाही त्या ठरावात केले गेले नाही. आजही डाचकुल पाडा, माशाचा पाडा येथे जाणारे रस्ते आहेत तिथे मालक आहेत. मुळ मालकांच्या जागा, जमिनी आहेत. त्याचे काय? एक पेपर नोटिस इश्यु केली की झाले. मी सन्मा. सदस्यांच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. प्रत्येकाला

लिहिता-वाचता येते असे नाही. प्रत्येकाला पेपर वाचता येईल असे नाही आणि आपण जमिन मालकांच नाहक नुकसान करतो. म्हणून माझे म्हणणे आहे की, एकतर तुम्ही प्रस्तावामध्ये तसे नमुद करा. अन्यथा त्यांना बोलवून घ्या. जे जमिनीचे मालक आहेत त्यांच्यांशी तुम्ही चर्चा घडवून आणा. मी ॲग्झॅक्टली तुमच्या मताशी सहमत आहे आणि ह्याचा विचार व्हायलाच पाहिजे.

**केशव घरत :-**

जमिन मालकांना साधे चर्चेसाठीसुध्दा बोलावले जात नाही. हा काय प्रकार आहे?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, जमिनीच्या मालकांना विचारणे आवश्यक भाग आहे. हे बरोबर आहे. ३७ गेल्यानंतर अशा पध्दतीची प्रोसिजर आपण केली. तर त्या जागा मालकाचा टी.डी.आर. मिळू शकतो म्हणजे जर आपण ह्या पध्दतीने घेतलेला आहे. ह्या पध्दतीमुळे जागेच्या मालकाला आपल्याला टी.डी.आर. देता येईल. दोन्ही सन्मा. सदस्यांचे मत रास्त आहे. त्यांच्या जागेवर आहे की, आपण त्यांना संपर्क साधुन त्यांना विचारायला पाहिजे. परंतु, त्यांना विचारुन होणार नाही. जर आपण ३७ च्या पध्दतीने केले नाही पेपर नोटिस देऊन तर त्यांना टी.डी.आर. मिळू शकत नाही. आज जे नाले, संभाव्य नाले त्या प्रायव्हेट जागेतुन आलेले आहेत. तर तो नाला बंद करु शकणार नाही. पण त्याला विचारणे जरुरी आहे. पण आज आपण ३७ खाली प्रस्ताव घेतला तरी जो नाला निघतो त्याच्या मालकाला अधिकृत कायदेशीर टी.डी.आर. मागवू शकतो आणि त्याला आपण टी.डी.आर. देऊ शकतो. असे रस्ते जर आपण घोषीत केले त्या रस्त्याला ३७ चा हा भाग घेतला तर त्या जागेच्या मालकाला जर ऊद्या डेव्हलपमेन्ट करायचे असेल किंवा नसेल. तरीसुध्दा त्याला टी.डी.आर. मिळू शकतो. दोन्ही सन्मा. सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांना विचारायला पाहिजे आता कोणत्या पध्दतीने विचारायला पाहिजे हा वेगळा भाग आहे.

**केशव घरत :-**

साहेब, भांडण ते नाही. कोणत्या अर्थाने, म्हणजे तुम्ही कसं म्हणता? त्या मालकाला कल्पना असायला पाहिजे की नको. तुम्ही म्हणता विचारायचा प्रश्नच येत नाही. असे कसं म्हणता? आपण कळवायला पाहिजे की, आपल्या जवळ ऊतारा आहे. त्या जमिन मालकाचा ऊतारा आहे. त्या जमिन मालकाला असा रस्ता तुमच्या जागेतुन प्रस्तावित करित आहोत ही प्रोसिजर आपली आहे ती आपण करु शकतो.

**मोहन पाटील :-**

मी काय म्हणत आहे? नाला आहे तो वहिवाट आहे. रस्ता आहे. तो वहिवाट आहे. बरोबर आहे ना. ह्या गोष्टी आहेत त्या जागेच्या मालकाला माहित आहे. मी त्यांना असे बोललो. जर अशा प्रोसेसने गेल्यानंतर त्यांना टी.डी.आर. कंम्प्लसरी मिळू शकतो.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब ............

**मोहन पाटील :-**

दुसरा विषय मी अगोदरच स्पष्ट केला की, तो प्रशासनाचा भाग आहे. त्याने कोणत्या पध्दतीने संपर्क करायला पाहिजे. आपण त्याचा अर्थ वेगळा करता. मी असे बोललो की, दोन्ही सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे. कोणत्याही तऱ्हेने त्यांना संपर्क करायला पाहिजे किंवा केला पाहिजे. हा भाग प्रशासनाचा आहे. ह्या प्रोसिजरने केल्यास त्यांना टी.डी.आर. मिळू शकेल आणि टी.डी.आर. चे हक्कदार आहेत.

**प्रभात पाटील :-**

बरोबर आहे. पण इथे काही खेडे आणि काही शेतकरी त्याला ३७ काय? टीडी.आर. काय? एफ.एस.आय काय? ह्या गोष्टीची काहीच कल्पना नाही. म्हणून आपल्या ठरावामध्ये हे सर्व अंतर्भुत असायला पाहिजे की, त्यांना त्यांचा एखादा सल्लागार भेटला तर त्याला त्याचा फायदा मिळाला पाहिजे. सगळ्यानांच या कायद्याच्या बाबी माहित नसतात. आता डाचकुल पाड्यासारखी जी परिस्थिती आहे तेथे फक्त आदिवासी लोकच राहतात. त्यांना ॲक्झॅक्टली ह्या गोष्टी माहित पडत नाही.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेबा, हवे असल्यास त्यांना बोलावून चर्चा करायला पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर साहेबांना माझ्या सुचनेवर रुलिंग द्यावी अशी विनंती आहे. जे टेंभ्याला हॉस्पीटल आहे त्याठिकाणी प्रायमरी हेल्थ सेंटर म्हणून आहे. पण आपल्या डी.पी. मध्ये एक्स्टेशन टू हेल्थ सेंटर म्हणून लिहले आहे. त्या ठिकाणी आपण सिव्हील हॉस्पीटल पण आणणार आहोत. त्याची तरतुद केली आहे आणि आर्थिक मंजुरीही आहे. असे असताना फक्त डी.पी. मध्ये त्याठिकाणी एक्स्टेन्शन टू सिव्हील हा हॉस्पीटल असा ऊल्लख करावे असे मी सुचित केलेले आहे. त्याच्यावर कृपया आपण रुलिंग द्यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, न्यु गोल्डन नेस्ट रोडला आपण सहा-सहा मिटरचे नाले डी.पी. शीटवर दर्शवायचे आहे. तर ऑलरेडी आपला रोड जो आहे तो मिटर आहे. नंतर तो ६, ४२ होणार की ३० मध्ये ६-६ प्रस्ताविक

करायचे आहे. ३० मिटर रस्ता डी.पी शीटमध्ये आहे त्याच्यामध्ये ६-६ मिटर दोन्ही बाजुला करायचे आहे की, वेगळे आहेत.

**जयंत पाटील :-**

म्हणजे रोड वेगळा आणि गटर वेगळे.

**नरेंद्र मेहता :-**

रोडमध्ये ते समाविष्ठ होणार आहे. ३० मिटरमध्ये आता समजा ३० मिटरचा रोड त्याच्यामध्ये तुम्ही १२ मिटरचा नाला करणार आणि तो रोड कमी करणार. वर स्लॅप येईल पण त्यावरुन गाड्या जाणार नाही ना. आज १०० फुटचे रोड आहेत ते त्याच्यामध्ये तुम्ही ६-६ म्हणजे ४० मिटर गटार करणार तर रोड ६० फुट रोड करायचे म्हणजे रोड कमी करायचे आणि नाले वाढवायचे याचा अर्थ हाच होतो ना.

**मोहन पाटील :-**

संख्या बरोबर आहे. परंतु, ही शहराची गरज आहे आणि ऊद्या त्या रस्त्याची कामे येणार आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

तो रस्ता कसा कामी येणार? गाड्या काय त्याच्यावरुन जाणार? चला ठिक आहे. आता एका बाजुला प्रस्तावित करतात, एका बाजुला नाल्याचे काम चालू आहे. ६ मिटर प्रस्तावित करतात तेथे २ मिटर जागेवर बांधतात. मग त्याचं काय? आत एस. के. स्टोनच्या समोरच ऊदाहरण घ्या. आपण ६ मिटर दिले आहे तिथे २ मिटरचे काम चालू आहे. साहेब, आपली डी.पी. शीट १० वर्षासाठी आहे. दुसरी गोष्ट सांगितली की, ते फ्युचर प्लानिंगसाठी आहे. तर फ्युचर प्लानिंगच्या आपल्या डी.पी. शीटला १० वर्ष बाकी आहेत. आता आपण बांधणार, करोडो रुपये खर्च करणार. ते नाले १० वर्षात पुन्हा तोडायचे. साहेब, माझे म्हणणे असे आहे की, तुम्हाल रिझर्व्हेशन टाकायचे आहे तर रोडचे जे ऑलरेडी एक्झस्टींग रोड आहे त्याला सोडून टाकावे. कारण त्या रोडची रुंदी कमी होणार आहे.

**मा. आयुक्त :-**

हा प्रस्ताव कधी झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी तेवढे लक्षात नव्हते की, रोडमध्ये येणार आहे की, रोडच्या बाहेर येणार आहे. साहेब, आता दुसरे ज्यावेळी बांधकाम विभाग नाले व गटाराचे काम करतात त्यावेळी त्यांना जेवढी मार्जीन बिल्डीगच्या आतमध्ये मिळते तेवढे आतमध्ये जाऊन तो बांधकाम करतो. हे बरोबर आहे ना. जर ६० फुटचा रोड असेल व जागेवर जाऊन आपण मेजर घेतले तर ८० फुटही मिळणार आणि ७० फुटही मिळणार. पण ज्यावेळी ज्या बिल्डींगला रि-डेव्हलपमेन्ट करायचे आहे किंवा कोणत्या बिल्डरला विकास करायचा असेल तर त्यांनी रोड मार्जीन किती सोडायची?

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. पण आपण जे प्रस्तावित केलेले आहे आणि सुरुवातीला ३७ खाली मॉडीफिकेशनचा ठराव झाला असेल तेव्हा या सगळ्या गोष्टी प्रस्तावित करायला पाहिजे होत्या किंवा तेव्हा विचार करायला पाहिजे होता. पण आता विचार करुन ऊपयोग नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्या म्हणण्याला मी गृहीत धरुन चालतो. आपण जेव्हा अंडर ग्राऊंड ड्रेनेज करणार त्यावेळेला ते काम येणार हे ठिक आहे. आता ज्यावेळी आपण नाले बांधतो तर बिल्डीगच्या साईडला जाता येईल तेवढे १० फुट, १५ फुट, आपण आतमध्ये जातो. जेव्हा आपण स्ट्रेट मार्जीन असते. समजा, आता एकाने बिल्डींग बांधली व बाजुची बिल्डींग बांधायची बाकी आहे. त्याने जेव्हा बिल्डींग बांधायची तर ६० फुट रोड धरुन बांधायची की, गटार पासून १५ फुट सोडून बांधायची तो प्रश्न येतो. कारण ज्याने बिल्डींग बांधली त्याला फ्रंट मार्जीन २ फुट मिळेल किंवा झीरो मार्जीन मिळेल.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांची तब्येत बरी नाही. तर सभा जरा तहकुब करावी.

**आसिफ शेख :-**

सभा तहकुब करा.

**केशव घरत :-**

मा. उपमहापौर वैती साहेब, अनुक्रमांक नंबर १९ सग्नायदेवी मंदिर ते बसस्टॉप रस्त्यालगतचा नाला हा दिड मिटर ............

**परशुराम पाटील :-**

साहेब, त्या रस्त्याचे कसे आहे?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

सन्मा. सदस्य या विषयामध्ये आपण आधीच्या मिटींगमध्ये पास केलेले आहेत. आता ह्यामध्ये आपल्याला काही नाले आणि काही रस्ते हे प्रस्तावित करायचे आहेत आणि ३७ च्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम नंबर ३७ नुसार फेरबदलाच्या प्रस्तावास मान्यता मिळविण्यासाठी

शासनास सादर करावयाचे आहेत. आपण डी.पी. प्लान बनविल्यानंतर आता सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांचे असे म्हणणे होते की, आपण ऑलरेडी नाले बांधले आहेत. त्याचे काय? तर भविष्यात या शहराच्या लोकसंख्येची व्याप्ती किती होणार आहे. या तरतुदी आपल्याला अधिकृतरित्या असलेल्या अधिक चांगल्या राहतील आणि ह्या केल्यानंतर आज जी बांधकामे झालीत त्या गोष्टी आपण सोडून द्या. पण उद्याची जी बांधकामे होणार आहे. ह्याच्यामध्ये चुकीचे काय होईल किंवा कोणावर अन्याय होईल अशातला भाग नाही. सन्मा. सदस्य केशव घरत साहेब आपले म्हणणे होते की, ह्याच्यामध्ये स्थानिक शेतकऱ्यांची जागा जाते. तर जेव्हा शहराचे डी.पी. प्लान बनविले तेव्हा सर्वच मालकीच्या जागेतुन, सरकारी जागेतुन हे रस्ते गेले आहेत. तुर्तात ज्या विषयावरुन आपल्या मनात शंकाकुशंका सुरु आहेत त्याविषयात मालकाशी चर्चा केली असती तर आपण त्यांना काही देऊ शकलो असतो आणि आता काही देऊ शकणार नाही. अशातील भाग होणार नाही.

**केशव घरत :**

साहेब, माझ्या बोलण्याचा ऊद्देश तो नाही. जर आता आपण एखाद्या जमिन मालकाची जागा प्रस्तावित रस्त्यासाठी घेणार आहोत मग त्या जमिन मालकाला बोलावून त्याच्याशी चर्चा केली तर त्यात काय बिघडणार आहे? आपण आपले रस्ते प्रस्तावित करणार आहोतच.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

हे बघा. त्यांना समझवण्याचे काम आपल्याला स्थानिक नगरसेवक म्हणून करावयाचे आहे. की, आपल्या जागेतुन रस्ता गेल्यानंतर आपल्या जागेचं महत्व वाढलेले आहे आणि त्याच्यासाठी महानगरपालिकेकडून त्यांना ज्या गोष्टीमध्ये शहराच्या हितामध्ये त्यांचे योगदान राहिले म्हणून त्यांना महानगरपालिकेकडून काय फायदा करुन देता येईल तो फायदा आपण करुन देणार आहोत.

**केशव घरत :-**

माझ्या बोलण्याचा ऊद्देश हा होता की, रस्ता होऊ नये हे माझे मत नाही. परंतु, माझे असे मत आहे की, आपल्याकडे अशी प्रोसिजर नाही की आपण जमिन मालकाला विश्वासात घेऊन केल तर त्याच्यात काय बिघडणार आहे? त्यात काही बिघडणार आहे का?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

सन्मा. सदस्य घरत साहेब, ती वेळ निघून गेलेली आहे. मात्र ..............

**केशव घरत :-**

नाही ही वेळ निघून गेलेली आहे. पुढे ...........

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

आपण त्यांना पुन्हा बोलावून घेऊन आणि त्यांच्याशी आपण प्रत्यक्ष चर्चा करु.

**मा. आयुक्त :-**

जेव्हा या विषयाला शासनाची मान्यता मिळेल आणि जेव्हा आपण प्रत्यक्ष अंमलबजावणी करु त्याच्या आधी आपण नक्की त्यांच्याशी बोलू.

**रिटा शाह :-**

मा. महापौर साहेब, महत्वाची गोष्ट .............

**लिओ कोलासो :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनाहे जे डी.सी.आर. बद्दल जी काही चर्चा करायची आसेल तर आपण..................

**दिपक खांबित :-**

ही प्रपोझल तशीच करणार आहोत आणि भविष्यात एक्स्टेन्शन लागेल तेव्हा त्याप्रमाणे आपण हे काम करणार.

**लिओ कोलासो :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेबांच्या परवानगीने ठराव मांडत आहे की..................

**नरेंद्र मेहता :-**

६० फुटचा जो रस्ता आहे तिथे नाले बांधताना आपण तिथे परवानगी देणार का?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

या बाबतीत कायदेशीर मार्गदर्शन आपल्याला ए.टी.पी. कडून मिळेल परंतु, सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेब, आपण हा ठराव दि. १८/४/२००६ ला ठराव क्र. १८ नुसार आपण तो मंजुर केला होता आणि याला फक्त शासनाकडे फेरबदलसाठी जी अंतीम मान्यता आहे. त्याच्यासाठी आपण पाठवत आहोत. त्याच्यात आपण काही सुचना केल्या तर त्या किती संयुक्तीक राहतील याबद्दल मला शंका आहे. मात्र याबाबतीत आपल्याला आता नविन सुचना करावयाच्या असतील तर सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा पण एक प्रश्न विचारत होते की, त्याच्यामध्ये आपल्याला रिझर्व्हेशन ते चेंज करायचे आहे. तर ते आता करण्यात येणार नाही. त्याला ३७ नुसार पुर्नबदलासाठी ठेवायला लागणार. फ्रेश मंजुरी घ्यायला लागणार. कारण हा ठराव आपण ऑलरेडी मंजुर केलेला आहे. शासनाला फक्त सादर करावयाचा आहे. परंतु, आपल्या ह्याच्यामध्ये आपले स्वतःचे असेल किंवा जवळपासचे प्रकरण असेल तर त्याला आपण ए.टी.पी.ने मदत करावी असे मी त्यांना सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

ह्यासाठी मी प्रश्न विचारला होता की, जे रोड, डी.पी. रोड एक्झस्टींग शीटवर आहे. ते कमी पडतात आणि लोक जागा द्यायला तयार आहेत की ठिक आहे. तुम्ही १५ फुट आतमध्ये बांधतात पण त्यांना कधी भविष्यात बिल्डींग बांधायची असेल तर ते घाबरतात आणि नंतर आम्हाला सांगितले की १५ फुट जागा सोडा. म्हणून मी तुम्हाला विचारलं की आपण जेव्हा प्लांट सेक्शन करणार तर डी.पी. शीट ६० फुट रोड आहे तर १५ फुट सोडून बांधाव की रोड पासुन त्याने ओपन स्पेस सोडावे.

**दिलीप घेवारे :-**

आपल्याला साईड मार्जीन स्टेन्ड्युल करण्याचे अधिकार आहेत. त्या-त्या परिस्थितीला निर्णय घेता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

अधिकार आहे ते ठिक आहे. समजा ऑलरेडी आपण अधिकाराचा वापर करुन घेतलेले आहे. आता परवानगी द्यायची आहे तर ती झीरो मार्जीन वर देता येईल का?

**दिलीप घेवारे :-**

हा पॉलिसी मॅटर आहे. इन्डीव्हिजुअल मॅटर नाही. धोरणात्मक बाब असेल..................

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे आपले असे म्हणणे आहे की, ज्यावेळी महानगरपालिका आतमध्ये जात असेल तर त्या ओपन स्पेसमध्ये द्यायचं नाही.

**दिलीप घेवारे :-**

त्यांचा मोबदला त्यांना द्यायलाच पाहिजे. जो काही कुठल्या स्वरुपात असेल जसे, टी.डी.आर., एफ.एस.आय. असे जे मागत असेल ते त्यांना देऊ या ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण त्यांना काहीच देत नाही. त्यांची जमिन आपण फुकट घेतो.

**आसिफ शेख :-**

आपल्याला जर सुसंवाद साधायचा असेल तर केबिनमध्ये बोलावून सुसंवाद साधा ना. महासभेत का?

**संगिता म्हात्रे :-**

मा. पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलत आहे की, आमच्या राई गावातुन जाणाऱ्या नाल्याचे नाव त्यात समाविष्ट करण्यात यावे.

**लिओ कोलासो :-**

याबाबत आपल्याला सांगु इच्छितो की, आमच्या भागातीलही नाले आहेत. मागच्या सभेमध्ये आम्ही विचारले, पण ते झाले नाही.

**संगिता म्हात्रे :-**

मागच्या सभेतही मी सांगितले होते, बोलले होते.

**लिओ कोलासो :-**

त्याच्यानंतर काय झाले की, गॅझेट झाले, प्रसिध्दी झाली, आपण ऑब्जेक्शन, सजेशन असे त्याच्यात काहीच नोंदविलेले नाहीत. त्यामुळे आज आपल्याला या ठरावामध्ये काही करता येण्यासारखे नाही. म्हणून आपण ते नंतर करायचे आहे. लेखी प्रस्ताव द्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

यामध्ये आपल्याला कोणतीही गोष्ट ॲड करता येणार नाही.

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, मी मागच्या वेळी सुद्धा सांगितले होते.

**मोहन पाटील :-**

आपण पेपर नोटीस दिलेली आहे व ह्याची प्रसिद्धी केलेली आहे. ठराव पुर्वी केलेला आहे. म्हणून आता ह्याच्यात कोणत्याही गोष्टी समाविष्ट करता येणार नाही. जे करायचे असतील त्याचे तसे पत्र द्या. पुढे विषय घेण्यात येईल.

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, मागे विषय झाला होता, तेव्हाही मी बोलले होते.

**मोहन पाटील :-**

आता या विषयात आपल्या सुचना समाविष्ट करता येणार नाही.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, माझा असा विषय आहे की.....

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, जेव्हा मी बोलले होते तेव्हा करायला पाहिजे होते ना.

**लिला पाटील :-**

आयुक्त साहेब, नाल्यांचा विषय आहे अशा नाल्यांवर अतिक्रमण झालेले आहे. ते तुम्ही हटवणार की, पुर्णपणे ते नाले बंद करणार? कारण माझ्या प्रभाग क्र. ९ मध्ये नाल्यांवर असे अतिक्रमण झालेले आहे. पुर्ण नवघर गावातुन नाला आलेला आहे. तो खाडीला मिळालेला आहे. तिथे बिल्डिंग झाली आहे. तिथे शंकर नारायण कॉलेज झालेले आहे. त्या नाल्यावर कॉलेज कसे बांधु दिले? नैसर्गिक नाला आहे तो तुम्ही मुळात बंद करणार आहात काय? त्यावर अतिक्रमण ही झालेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य लिला पाटील मॅडम यांनी जो प्रश्न ऊपस्थित केलेला आहे की आपण दर्शविलेले नाले आहेत. त्याच्यावर कोणत्या बिल्डरने किंवा कोणत्या विकासकर्त्याने असे अतिक्रमण करून बिल्डिंग बांधली असेल किंवा गाळेवाल्यांनी गाळे वाढविले असतील तर तुम्ही ते पाडणार किंवा काय? ह्याबद्दल खुलासा करावा. तेथे ऑलरेडी बिल्डिंग बांधलेली आहे. तर आपण नाला कॅन्सल करणार की, बिल्डिंग ठेवणार. कारण गावातील पुर्ण पाणी त्या नाल्यातून जाते आणि तो नाला खाडी लगत आहे. मा. महापौर साहेबांनी ह्याविषयावर रूलिंग द्यावे.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

विषयाला अनुसरुन हा विषय आलेला आहे. परंतु, ह्याबाबत संबंधित अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल सादर करावा आणि मा. आयुक्तांनी त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

**लिला पाटील :-**

तशा प्रकारच्या नाल्यावरसुध्दा तिकडे त्यांनी कब्जा केलेला आहे. त्या नाल्यावर स्लॅप टाकला आणि आज हनुमान मंदिर ते खाडीलगत पर्यंत नाला बांधलेला आहे. आपल्या महानगरपालिकेचा पैसा खर्च करुन स्लॅप टाकला तर फेरीवाले त्याच्यावर बसतील. पण तो नालासुध्दा त्यांनी आतमध्ये घेतलेला आहे. तर हे आपल्या प्रशासनाच्या लक्षात कधी आलेच नाही का? तिथे आपले कोणतेही अधिकारी जातच नाही का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अगर ऐसा हे तो वह फौरन तोडना चाहिए। नाला तो बाद मे सवाल पैदा नही होता।

**तुळशीदास म्हात्रे :-**

ही सत्य परिस्थिती आहे.

**लिला पाटील :-**

त्वरीत कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि त्यावर मा. महापौरांनी जे निर्देश प्रशासनाला दिलेले आहेत, आयुक्तांना दिलेले आहेत त्या निर्देशाचे पालन केले जाईल आणि समक्ष जागेची पाहणी करुन त्याबाबतीतला निर्णय त्वरीत घेतला जाईल.

(सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो ह्यांनी प्रकरण क्र. ६५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**परशुराम पाटील :-**

अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ता आपण सांगितले की, ३० फुटचा रोड आहे आणि ते नालेसफाई होणार आहे. ते सगळे रोड खाली येणार आहेत. मग रोड बनल्यावर ते गटार बंद होईल. तर प्रस्ताव कशाला पाहिजे? रोडमधून आपल्याला नाला बांधायचा आहे. पण रोड कुठे आहे नाला बांधायला?

**प्रकरण क्र. ६५ :-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाचा प्रस्ताव मान्यता मिळणेसाठी शासनास सादर करणेबाबत.

**ठराव क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासनाचे नगरविकास विभाग अधिसुचना क्र. टिपीएस १२९६/८४७/ सीआर/ १६२/९६ युडी १२ दि. १४/०५/९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्रं. टिपीएस-१२९८/नपा सीआर-८९/९८/ युडी-१२ दि.२५/८/२००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि.१५ जुलै १९९७ व दि.१५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे. त्यानंतर दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत झालेले आहे.

अ) मौजे - भाईंदर येथील मांडली तलाव क्षेत्र (३७६९ चौ.मी.) ही जागा नगरपरिषद स्थापन झाल्यापासून नगरपरिषदेच्या ताब्यात आहे. तेथे नगरभवनाची इमारत बांधलेली आहे. तिचा वापर सुरु आहे. सदर

जागा विकास योजनेमध्ये सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविण्यात आलेली आहे. सदरची जागा ही सार्वजनिक वापरासाठी असल्याने महसूल व वन विभागाच्या दि.०४/०२/८३ च्या परिपत्रकानुसार सदरची जागा विकास योजना आराखड्यात आरक्षण म्हणून दर्शविणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करुन सदरील जागेत ''नगरभवन'' असे नामाभिदान दर्शविण्याचे आहे.

ब) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रमाणे वर्णन केलेले रस्ते हे विद्यमान अस्तित्वातील रस्ते असून सदरचे रस्ते विकास योजनेने अंतर्भूत केलेले नसल्याने व सदरच्या रस्त्यांचा वापर सार्वजनिक स्वरुपाचा असल्याने मंजूर विकास योजनेत ९.० मी. रुंद रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ११ नुसार मंजूर विकास योजनेत खालीलप्रमाणे रस्ते दर्शविण्याचे ठरविले आहे.

१) दाचकुलपाड्याकडे जाण्याकरिता लक्ष्मीबाग ते दाचकुलपाडा रस्ता.
२) माश्याच्या पाड्याकडे जाण्याकरिता काशि जनता नगर ब्रीज ते मंदीरापर्यंतचा रस्ता.
३) बाभळीचा भाट क्र. १ व २ कडे राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पासूनचा रस्ता.

क) शहरातील विद्यमान नैसर्गिक नाले अस्तित्वात आहेत हे नाले उपरोक्त विकास योजनेत दर्शविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदरचे नाले विकास योजनेत दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत कार्यवाही करणेकामी मा. महासभा दि.१८/११/२००५, ठराव क्र. ६६ अन्वये ठराव मंजूर झालेला आहे. त्यानुसार खालील प्रमाणे नाले आहेत.

**भाईंदर (पश्चिम) मधिल नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १ | मुर्धा ब्रीजच्या बाजूचा नाला | २०.०० | २०.०० |
| २ | जाफरी खाडीकडे जाणारा रेल्वे समांतर नाला | ५.०० | ५.०० |
| ३ | गणेश देवल ते क्रांतीनगर नाला | ४.०० | ४.०० |
| ४ | भाईंदर जयअंबे झोपडपट्टी क्र. १ कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ७.०० |
| ५ | भाईंदर (प.) बाबू मेस्त्री चाळ ते जनता नगर झोपडपट्टी (स्मशानभूमी मागील नाला) | ३.०० | ३.०० |

**भाईंदर (पुर्व) मधिल नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| ६ | किरण नगर मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ७.०० |
| ७ | आर.एन.ए. पार्क मधील खाडीकडे जाणारा नाला | ३.०० | ६.०० |
| ८ | केबिन रोड नर्मदा कुंज, गोडदेव नाका, शिर्डीनगर, नवघर नाका, इंदिरानगर खाडीकडे जाणारा नाला | ३.५० | ५.५० |
| ९ | गोडदेव स्मशानभूमी कडून खाडीकडे जाणारा नाला | ४.०० | ६.०० |
| १० | उड्डाणपूल सर्कल ते गोल्डन नेस्ट ३०.०० मी. रस्ता लगत नाला | ३.०० | ६.०० |
| ११ | दिपक हॉस्पीटल शेजारील नाला | १.५० | ४.०० |

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १२ | कनकिया रोड लगतचा नाला | ३.०० | ३.०० |
| १३ | एस.के. स्टोन समोरील नाला | २.०० | ६.०० |
| १४ | महेश इंडस्ट्रीयल इस्टेट मागील नाला | २.०० | ६.०० |
| १५ | हटकेश उद्योगनगर ग्रीन कोर्ट क्लब समोरील नाला | २.५० | ४.५० |
| १६ | शिवार गार्डन शेजारील सरदार पटेल शाळा समोरील नाला | ३.०० | ३.०० |
| १७ | क्विन पार्ककडे जाणारा नाला | १.५० | १.५० |
| १८ | हटकेश उद्योगनगर पाईप लाईन रस्त्याकडील नाला | २.०० | २.०० |

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| १९ | घोडबंदर सगनादेवी ते बसस्टॉप रस्त्यालगतचा नाला | १.५० | १.५० |
| २० | माशाचा पाडा, लक्ष्मी बाग वेस्टन हॉटेल, विठ्ठल मंदिर कडून वाहत जाणारा नाला | ११.०० | १५.०० |
| २१ | होली क्रॉस शाळा जनता नगर ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ उघाडी पर्यंतचा नाला | ८.०० | ८.०० |
| २२ | महाजन वाडी, महाविष्णू मंदिर, दिल्ली दरबार, पंजाब फॉन्ड्री घोडबंदर खाडीकडे जाणारा नाला | ४, ७, १०, १५, ३० | ४, ७, १०, १५, ३० |
| २३ | पेणकरपाडा, खोडीयार नगर स्मशानभूमी समोरील नाला | ३.०० | ४.०० |
| २४ | मिराधाम ते पंजाब फॉन्ड्रीकडे जाणारा नाला | ३.०० | ३.०० |

**मिरा रोड मधील नाले -**

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण | सरासरी विद्यमान रुंदी (मीटर) | प्रस्तावित रुंदी (मीटर) |
|---|---|---|---|
| २५ | मिरा रोड ते भाईंदर (पु.) रेल्वे समांतर नाला | ३.०० | ३.०० |
| २६ | शांतीनगर मधील नाला | २.०० | ५.०० |
| २७ | शांतीनगर सर्कल ते स्टेशनकडे जाणारा रस्त्यालगत नाला | २.०० | २.०० |
| २८ | शगुन हॉटेल ते जाफरी ब्रीज पर्यंतचा नाला | १०.०० | १०.०० |
| २९ | गोकूळ विलेज, विजय पार्क, शगुन हॉटेल पर्यंतचा नाला | २.०० | २.०० |

ड) मंजूर विकास योजनेत मौजे - उत्तन, स.क्र. ४३, १२०, १०८सी, १७८डी, ही जागा विकास योजनेप्रमाणे डोंगराळ तसेच नाविकास क्षेत्रात दर्शविली असून खाजगी मालकीची आहे. या जागेतून १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करुन विकास योजनेमध्ये फेरबदल करावयाचे ठरविले आहे. त्यानुसार मा. महासभा दि.१८/०४/२००६, ठराव क्र. ६ नुसार मान्यता दिलेली आहे.

तसेच वरील अ.क्र. (अ) ते (ड) विकास योजने मध्ये अंतर्भूत केलेले नसल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा. महासभा ठराव क्र. ४४, दि. २९/०९/२००५, ठराव क्र. ११, दि. १८/०४/२००६, ठराव क्र. ६, दि. १८/०४/२००६, ठराव क्र. ६६, दि. १८/११/२००५ नुसार मंजूरी दिलेली होती. त्या अनुषंगाने दि. ०२/०७/२००६ दै. वृत्तमानस, दि. ०३/०७/२००६ दै. मुंबई संध्या, दि. ०२/०७/२००६ दै. हमारा महानगर, दि. १९/०६/२००६ दै. सकाळ, दि. १८/०६/२००६ दै. नवशक्ति या वृत्तपत्रात जाहीर सूचना देवून संबंधीतांच्या सूचना व हरकती मागविलेल्या होत्या. सदर सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अनुक्रमे दि. २८/०६/२००६, दि. ३०/०६/२००६ रोजी प्रसिध्द झालेल्या होत्या.

जाहीर सूचनेच्या अनुषंगाने मौजे-उत्तन व पाली, स.क्र. ६५, स.क्र. २५ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता १५.०० मी. पोहोंच रस्ता प्रस्तावित करुन फेरबदलाबाबत [अ.क्र. (ड)] बाबत दोन सूचना प्राप्त झालेल्या होत्या. सदर सूचना हरकत धारकांची सुनावणी दि. १८/०८/२००६ रोजी घेण्याचे ठरविले होते. परंतू सदर दिवशी सदर हरकतदार उपस्थित राहिले नाहीत.

इ) मंजूर विकास योजनेतील मौजे - पेणकरपाडा येथील रॉयल कॉलेज समोरुन जाणा-या विद्यमान रस्त्यास १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता दर्शविणे व आ.क्र. ३४० (खेळाचे मैदान) हे आरक्षण रद्द करणे. सदर फेरबदलाबाबत तात्कालीन नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३३, दि. २५/०६/९८ अन्वये खालील प्रमाणे ठराव मंजूर केलेला आहे.

विकास योजना आ.क्र. ३४० - खेळाचे मैदान व आ.क्र. ३३८ - दवाखाना व प्रसुतिगृह या जागेतून विद्यमान रस्ता १०.०० मी. रुंदीचा आहे. सदरचा रस्ता स.क्र. १३७ जवळील विकास योजना ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यास मिळत आहे. सद्यस्थितीतील १०.०० मी. रुंद रस्त्यास ८.०० मी. रुंदीचे उत्तरेस रुंदीकरण दर्शवून १८.०० मी. रुंद विकास योजनेत दर्शविणे व आ.क्र. ३४० - खेळाचे मैदान हे आरक्षण रद्द करणे व आ.क्र. ३३८ चे क्षेत्र ०.१४ हे. प्रस्तावित करणे याप्रमाणे फेरबदलास तात्कालीन नगरपरिषद सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे.

सदर फेरबदल महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०६/०६/९८ पृष्ठ क्र. १५४५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच उक्त फेरबदल दै. सामना दि. ०६/०८/९८ व थाने की आवाज या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन सूचना हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच संबंधीत जमीन धारकांना नोटीस बजावण्यात आलेल्या होत्या. सूचना हरकती ''**निरंक**'' आहेत.

ई) मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील (Appendix - xx) (पृष्ठ क्र. १३७) मध्ये फेरबदल महानगरपालिका क्षेत्रातील (१) हॉस्पीटल, (२) हॉटेल व विश्रामगृह, (३) शाळा, कॉलेज व इतर तत्सम शैक्षणिक संस्था, (४) पोलिस / लष्करी छावणी, (५) कॅन्टीन, (६) प्रयोगशाळा व संशोधन संस्था यासाठी गरम पाण्याची आवश्यकता आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील वाणिज्य वापराच्या इमारती, शासकीय इमारती, जुन्या रहिवाशी वापराच्या इमारती तसेच वर नमुद १ ते ६ प्रयोजनार्थ वापर सुरु असतील त्या वापरदारांना तसेत शासकीय इमारतींना ही तरतुद सक्तीची करणे आवश्यक आहे. तसेच जुन्या रहिवास वापराचे इमारतीसाठी ज्या सोसायटी / मालक अशाप्रकारे तरतुद करतील त्यांना वार्षिक मालमत्ता करात १०% सवलत दिल्यास या योजनेचा चांगला प्रतिसाद मिळू शकतो. त्याअनुषंगाने विकास नियंत्रण नियमावली फेरबदलास मा. महासभा ठराव क्र. ३१, दि.२०/०६/०६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. तसेच शासन राजपत्र भाग दोन दि.२०/०७/२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच दै. सागर व दै. हमारा महानगर दि.२६/०७/०६ रोजीच्या वृत्तपत्रात जाहीर सूचना देवून सूचना हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. सूचना व हरकती ''**निरंक''** आहेत.

वर नमुद केलेल्या (अ), (ब), (क), (इ), (ई) बाबत एकही सूचना वा हरकत प्राप्त झालेली नाही. सबब जाहीर सूचनांच्या अनुषंगाने विकास योजनेमध्ये उक्त (अ) ते (ई) फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार शासनास सादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख ह्यांनी प्रकरण क्र. ६६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

विषय सर्वानुमते मजुर. सचिवजी पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घरांना / गाळ्यांना दुरूस्ती / ऊंचीसाठी व कुंपणभिंत बांधण्यास परवानगी देतांना शुल्क वाढविणे बाबत.

**ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान घराची, औद्योगिक गाळ्याची, दुकानाची दुरुस्ती व उंची वाढविण्यास तसेच कंपणभिंत बांधण्यास परवानगी मिळण्यासाठी या विभागासाठी सुमारे ४०० ते ५०० अर्ज प्राप्त होत असतात. अशा अर्जामधील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यावर, (१) घराच्या व गाळ्याचा मुळ संरचनेत बदल न करणे, (२) चटईक्षेत्राचे उल्लंघन न करणे, (३) विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत न होवू देणे इत्यादी अटींवर दुरुस्ती व उंची वाढविण्यास परवानगी देण्यात येते. सदर परवानगीचे वेळी तत्कालीन नगरपरिषद खास सभा ठराव क्र. १६०(ब), दि. ३०/०३/१९९८ अन्वये घर दुरुस्तीसाठी व कुंपणभिंतीसाठी रु. ५००/- व औद्योगिक गाळा दुरुस्ती व उंची साठी रु. १,०००/- शुल्क आकारण्यात येत आहे. सदरचे शुल्क अत्यंत कमी असल्यामुळे व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी वरील प्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शुल्कात वाढ होणे आवश्यक वाटते. याबाबत मा. स्थायी समितीमध्ये चर्चा होवून मा. सदस्यांनी शुल्क वाढविणबाबत सांगितलेले आहे. यास्तव घर दुरुस्तीसाठी प्रती मालमत्ता रु. ५,०००/- अधिकृत झोपडीसाठी रु. ५००/- तसेच औद्योगिक (गाळा) व वाणिज्यासाठी (दुकान) दुरुस्ती व उंची वाढविणेसाठी प्रती मालमत्ता रु. १०,०००/- व कुंपणभिंत रु. २,५००/- प्रती सर्व्हे क्रमांक इतके शुल्क आकारणे आवश्यक वाटते. वर्षभरात साधारणः घर दुरुस्तीचे ३०० व गाळा उंचीचे २०० अर्ज प्राप्त होत असतात. सदरच्या आकारणीमुळे प्राप्त होणाऱ्या अर्जास परवानगी दिल्यास चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या

उत्पन्नात सुमारे रु. २५,००,०००/- इतक्या रक्कमेची वाढ होण्याची शक्यता आहे. सबब वरील प्रमाणे दुरुस्ती व उंचीसाठी देण्यात येणाऱ्या परवानगीच्या वेळी शुल्क वाढविण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर साहेब, विषयावर आम्हाला बोलू द्या. आमची सूचना अहे. हा फार महत्त्वाचा विषय आहे. आपण झोपडपट्टीवाल्यांकडून पाच हजार रुपये घेणार आहात का? घर दुरुस्तीला पाच हजार रुपये. साहेब, आपण ऐकून घ्या. मा. महापौर साहेब, हे काय चालले आहे? आपण बाल्कनी बंदिस्त दोन हजार रुपये मागता आणि झोपडपट्टीवाल्यांना रिपेअर करण्यासाठी पाच हजार रुपये?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

सन्मा. सदस्य ठराव मंजुर झालेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

साहेब, माझ्या बिल्डरांना काही सूचना आहेत.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

आपण आपली लेखी सूचना सादर करा.

**रोहित सुवर्णा :-**

लेखी देऊन कसे होईल?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

लेखी सूचना द्या.

**रोहित सुवर्णा :-**

आपण माझे म्हणणे ऐकून तरी घ्या. बंदीस्त बाल्कनीला दोन हजार रुपये आणि झोपडपट्टीच्या घर रिपेअरींगला पाच हजार रुपये ही कुठली पद्धत आहे?

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जिस ह्यांनी प्रकरण क्र. ६७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

या ठरावाला आमचे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर साहेब, मी काय बोलतो हे ऐकून तरी घ्या.

**एस. ए. खान :-**

कोणाचे नाव घेतले आहे ते डिक्लेर करा. असे कसे नाव दिलेले आहे. आमचे त्या नावाला विरोध आहे. मी त्या कमिटीमध्ये माझे नाव देतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर साहेब, त्या कमिटीवर मी माझे नाव देतो मा. महापौर साहेब, माझे आपल्याजवळ असे म्हणणे आहे की, झोपडपट्टीमध्ये घर रिपेअर करण्यासाठी पाच हजार रुपये फी किती जास्त आहे?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

जर ती झोपडी अधिकृत असेल आणि गावठाणमध्ये असेल तर त्याच्यासाठी पाचशे रुपये करण्यात येईल.

**प्रभात पाटील :-**

त्या समितीमध्ये नेमके कुणाचे नाव आहे?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

झोपडपट्टी अधिकृत असेल तर पाचशे रुपये.

**रोहित सुवर्णा :-**

पाच हजार रुपये दिले आहे.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

पाचशे रुपये अशी नोंद घेण्यात आली आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, कमिटीवर कोणाचे नाव गेले?

**रोहित सुवर्णा :-**

ह्यांच्यामध्ये माझे नाव द्या. स्विकृत सदस्याचे नाव द्यावे.

**जयंत पाटील :-**

ह्या समितीवर कोणाचे नाव दिलेले आहे?

**रोहित सुवर्णा :-**

माझे नाव देण्यात यावे.

**जेन्वी अल्मेडा :-**

एकच प्रतिनिधी पाहिजे की, नाही? शहराचे महापौर आहेत त्यांचेच नाव त्या समितीवर द्या.

**प्रभात पाटील :-**

कोणाचे नाव दिलेले आहे?

**चंद्रकांत मोदी :-**

यह कमिटी कभी बनाया? यह कीसीको मालूम भी नही है।

**रिटा शाह :-**

या कमिटीवर महिलांचे नाव द्या. महिला का काम करत नाही का?

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, महिलांना प्रधान्य द्या.

**प्रभात पाटील :-**

नेहमी सगळीकडे पुरूष, पुरूष सगळे परुष टेंभा मिरवतात कधीतरी महिलांना प्राधान्य द्या. सगळीकडे पुरुषांना का पाठवता? त्या कमिटीवर माझे ही नाव घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नाव दिलेली असतात आणि हे नंतर सभेसमोर येते.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर साहेब, माझी अशी सूचना आहे की, मा. महापौरांना पठविण्यात यावे. कारण तीन महिन्यातून एकच मिंटींग होते. मॅडम, त्याच्यामध्ये असे असते की.....

**जयंत पाटील :-**

त्याच्यामध्ये जाणकार पाहिजे. त्याला अनुभव पाहिजे आणि मुळात त्याला वेळ पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आयुक्त महोदय, असा विषय असा कसा?

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, मिरा रोड, रेल्वे असोसिएशन का मैं प्रेसिडेंट हूँ। ऊसमे मेरा नाम चल रहा है। मेरे पास आय कार्ड है।

**संगिता म्हात्रे :-**

साहेब, महिलांना प्राधान्य द्या.

**आसिफ शेख :-**

सदस्य उपनगरीय रेल्वे उपभोक्ता परामर्श समिती, या समितीवर यावर्षी सन्मा. नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील ह्यांना सदस्यत्व द्या आणि महिलांना पुढच्या वर्षी सदस्यत्व द्या. असे चेंजेस करा. आता सन्मा. सदस्यांच्या नावाने कार्ड आलेले आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

पुढच्या वेळेला नविन सदस्य नियुक्त करा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सदरचा विषय नंतर घेण्यात यावा.

**चंद्रकांत मोदी :-**

अनुभवी लोगो को अंदर लिजिए।

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण ५ नंबर वाचले आहे. प्लिझ, इट विल बी अर्जंट हे आपण वाचले आहे आणि हे जे पत्र आलेले आहे ह्याला पाच महिने होऊन गेलेले आहेत तरी आपण सांगता की अर्जंट लिहिलेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सभागृहाची मंजुरी नसतांना हे सदस्य कसे काय या समितीवर नेमले गेले? हे असे चालणार नाही. सभागृहासमोर विषय येण्याच्या आधीच त्यांना मंजुरी मिळाली हे कसे काय?

**आसिफ शेख :-**

आता कार्योत्तर मंजुरी द्यायची आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सभागृहाची मंजुरी पाहिजे. त्यांच्याकडे पहिल्यापासुनच आयकार्ड आले आहे.

**आसिफ शेख :-**

आता आपण कार्योत्तर मंजुरी द्या ना.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

बिकट प्रश्न असा आहे की, सर्व सन्मा. सदस्यांना विनंती, सगळ्यांचे अभिनंदन. आत्ताच भारताते ही मॅच जिंकल्याची बातमी आलेली आहे. आपल्या ह्या विषयानुरुप अशी परिस्थिती आहे की, मा. महापौरांनी हे पत्र मला स्वतःलाच दिले आहे आणि मी माझ्या अधिकारात ह्याच्यासाठी एका सदस्याची नेमणूक करू शकते या भावनेने त्यांनी या सदनाचे सदस्य मा. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या नावाची शिफारस केली होती आणि रेल्वेने त्यांना आयकार्ड देखील बनवून दिलेले आहे. ही दोन पत्रे आली होती. एक पत्र मा. आयुक्तांना व एक मा. महापौरांना असे यावर मा. आयुक्त साहेबांनी रितसर हा विषय सभागृहासमोर आणला. मा. आयुक्तांनी हा विषय सभेसमोर आणला नसता आणि कार्योत्तर मंजुरी घेतली असती तर हा प्रश्न मिटला असता. मा. महापौरांनी जर या विषयाला मान्यता दिली होती तर हा विषय सभागृहासमोर आणायची गरज नव्हती किंवा तो विषय आणल्यानंतर परत शुद्धीपत्रक दिले असते आणि फक्त कार्योत्तर मंजुरी मागितली असती तरी चालले असते. येथे सर्व सदस्य सुज्ञ आहेत. हा टेक्निकल मुद्दा उपस्थित झाला. ह्याच्यातून मार्ग काढण्याची जबाबदारी आपली आहे. आपण तो मार्ग काढावा. असे आहे की, मा. महापौरांनी अखत्यारीमध्ये ते पत्र देऊन टाकले.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांनी मंजुरी दिलेली आहे तर मा. महापौर मॅडमच त्यातून मार्ग काढतील. मग त्याला सभागृहाची काय गरज आहे? मा. महापौरांना हा विषय सभागृहासमोर आणण्याची गरज वाटत नाही. तर हा विषय सभागृहासमोर आणायची गरजच नव्हती.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

विषय मंजुरीसाठी आणायचा होता तर कार्योत्तर मंजुरीसाठी तो विषय आणयला पाहिजे होता. ऑलरेडी मंजुरी दिलेली आहे आणि विषय झाला.

**नरेंद्र मेहता :-**

आता काय करायचे?

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये आर्थिक केलेला नाही. हे कार्योत्तर मंजुरीचे होत नाही. जिथे आपण आर्थिक खर्च करतो, पैसे देतो तिथे कार्योत्तर मंजुरी होते.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, त्या पत्राची कॉपी द्या.

**जयंत पाटील :-**

आणि जर तुम्हाला सन्मा. ध्रुवकिशोर पाटील हवे तर जयंत पाटील का नको?

**नगरसचिव :-**

पत्राची कॉपी देण्यात आलेली आहे.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

सर्व सन्मा. सदस्यांना पत्राची कॉपी देण्यात आलेली आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, जर ध्रुवकिशोर पाटील चालतो तर जयंत पाटील का चालत नाही?

**एस. ए. खान :-**

पत्राची कॉपी दिलेली नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

आंम्हाला पत्राची कॉपी मिळालेली नाही.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

आता जी परिस्थिती आहे व जो फॅक्ट आहे तो आपल्याला सांगितलेला आहे. आपल्या लोकांनीच ह्याच्यातून मार्ग काढायचा आहे. मा. महापौरांनी पासपोर्ट दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभागृहाला माझी विनंती आहे की, रेल्वेने ज्यावेळी पत्र दिले होते. त्यावेळी मी मा. महापौरांना विनंती केली की, त्याच्यामध्ये असे क्लिअर लिहिले होते की, टू दि चेअरमन, मिरा भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन. असे आपल्या महापालिकेतर्फे एका सदस्याची निवड करावी तर मी मा. महापौरांना शिफारस केली की, मॅडम ह्या समितीवर माझे नाव शिफारस केले तर बरे होईल. त्यावरुन त्यांनी माझे नाव शिफारस केले आणि त्याप्रमाणे रेल्वेने माझी नेमणूक केली. तरी माझी सभासदांना विनंती आहे की, ही झालेली अपॉइंटमेंट त्यांनी कृपया स्विकार करावी आणि पुढच्या वेळी महिलांना नक्की प्राधान्य देण्यात येईल.

**प्रभात पाटील :-**

कृपया, गैरसमज टाळावा. सन्मा. सदस्य आपल्याला असे वाटत असेल की, ध्रुवकिशोर पाटील या नावाला विरोध आहे किंवा राष्ट्रवादीचे सदस्य म्हणून विरोध आहे तर हे डोक्यातून काढून टाका. फक्त विरोध

एवढा आहे की, सभागृहामध्ये तुमची आणि आमची सत्ता आहे. मेजोरिटीने आपण सगळे विषय पास करतो असे असतांना काही विषय टेबलावर घेतले जाऊ नयेत. पुढच्या वेळी असे होता कामा नये. मा. महापौरांनी सभागृहाशिवाय निर्णय घेतला जाऊ नये कारण तुम्हाला पूर्ण सहकार्य आहे. आमचा विषय असा आहे की, ह्याच्यापुढे असे विषय आले तर कृपया, आम्ही त्याला स्थान देणार नाही. मंजुरी देणार नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

मॅडम, या विषयाची गफलत अशी झाली की, ह्या विषयाचे एक पत्र मा. आयुक्तांना गेले व एक पत्र मा. महापौर मॅडम ह्यांना आले. मा. महापौर मॅडम, यांनी सन्मा. नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या नावाची शिफारस केली.

**जयंत पाटील :-**

हा विषय पुढच्यावेळी आणा.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

हा विषय पुढच्यावेळी कसा आणता येईल. जेंव्हा ऑलरेडी त्यांची अपॉइंटमेंट झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

प्रश्न अपॉइंटमेंटचा नाही आणि आमचा त्यांच्या नावालाही विरोध नाही. पण चुकीच्या तऱ्हेने हे झालेले आहे.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

चूक झालेली आहे म्हणून सभागृहासमोर मी स्पष्ट केलेले की, चूक झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

आपण एखादा सदस्य निवडता आणि नंतर सभागृहासमोर विषय आणता. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रेसाहेब नेहमी सांगतात की ''आंधळ दळतंय कुत्र पिठ खातयं.''

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

ते तसेच झाले आहेत.

**प्रभात पाटील :-**

हे चुकीचे आहे आणि चुकीचा पायंडा पडेल.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

हा चुकीचा प्रकार झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

आमची नावाला हरकत नाही.

**प्रभात पाटील :-**

नशीब आहे की, आता सभागृहामध्ये विराधी पक्षाचे सदस्य नाही. अन्यथा केवढा गजब झाला असता. हे चुकीचे आहे.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, पत्राची कॉपी द्या ना.

**नगरसचिव :-**

कॉपी देतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब यांना या रेल्वेच्या विषयाला धरुन एक बाब मी आपल्या निदर्शनास आणू इच्छिते की, विषय जरा वेगळा आहे. भाईंदर रेल्वे स्टेशन ते वसईकडे जाणारा जो मार्ग आहे. रेल्वेने त्या दोन्ही भिंतीच्यामधे सद्ध्या कंपाऊंड भिंत घातलेली आहे. रेल्वे लोखंडांचे ट्रॅक घातलेले आहे. पलिकडून नवघर रोडवरुन येणारा जो माणूस आहे त्याला आता जेसलपार्कला एक शाखा आहे त्या शाखेपर्यंत चालत जाऊन रेल्वे ट्रॅक पार करून पुन्हा येथे वळून यावे लागते. रेल्वे ट्रॅक पार करणे हा गुन्हा आहे हे आंम्हाला मान्य आहे. परंतु, भाईंदर पुर्वेच्या माणसाला पश्चिमेला येण्याकरिता दुसरा कोणताही मार्ग नाही. रेल्वेचा पुल चालून जायचे म्हटले तर तो पूल रेल्वेचा आहे. पलिकडे जेंव्हा आपण ऊतरतो तेंव्हा रेल्वेची माणसे तुमच्याकडे तिकिट नाही म्हणून पकडले जातात. म्हणजे दोन्हीकडून माणसे भरडली जात आहेत आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, गरोदर महिला आहेत, वयस्कर लोक आहेत, बी. पी. च्या त्रासाची लोक आहेत. त्यांना तर इतका त्रास झालेला आहे की, गेल्या दहा दिवसामध्ये लोकांच्या तक्रारी ऐकून कंटाळवाणी झालेले आहे. आपला जो सब-वे चा प्रश्न आहे त्याला आपण मान्यता दिलेली आहे. तो प्रश्न कुठे आणि का रेंगाळतोय. आता त्याबाबतीमध्ये अगदी जीवन - मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी सब-वेच्या बाबतीत बोलत आहे. आता तिथे मार्ग होणे गरजेचे आहे. आता सब-वे लवकरात लवकर व्हायला पाहिजे. नाहीतर ॲक्सिडंट ठरलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांनी जो काही मुद्दा येथे ऊपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी आपल्याला एवढे आश्वासन देऊ इच्छितो की, या सभागृहाच्या ज्या भावना त्या भावना रेल्वे प्रशासनापर्यंत

पोहचविण्यात येतील आणि सब-वे ची जी रक्कम रेल्वे प्रशासनाकडे जमा केलेली आहे त्याचा पाठपुरावा केरुया. माझ्या माहितीप्रमाणे त्यासंदर्भ प्रपोझलवर वीस ते बावीस सह्या अधिकाऱ्यांच्या लागतात. माझ्या माहितीप्रमाणे जवळ जवळ १४ सदस्यांच्या सह्या झालेल्या आहेत. ऊर्वरित सदस्यांच्या सह्या लवकरच होतील.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महासभेमध्ये ठराव केंव्हाचा पास झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

तेव्हापासूनच आपण प्रयत्न करत आहोत. मी आपल्याला सांगतो ना, जवळ जवळ १४ सह्या झालेल्या आहेत. त्या सह्या आपण लवकरात लवकर घेऊ आणि आता सभागृहातून सन्मा. नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील ह्यांची नियुक्ती झालेली आहे तर त्याच्याकडे त्यांनी जास्त प्रधान्याने लक्ष द्यावे. अशी मी त्यांना विनंती करतो.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ६७ :-**

“Suburban Railway User’s Consultative Committe” वर मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्रतिनिधी पाठविणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ५५ :-**

रेल्वे प्रशासन व रेल्वे प्रवाशी यांच्यामध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने रेल्वेची “Suburban Railway User’s Consultative Committe” वर नव्याने नियुक्त करावयाच्या सदस्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील यांचे नांव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६८ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जिस :-**

प्रकरण क्र. ६८ विषय मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरु करणेस मंजुरी मिळणेबाबत. सन्मा. पिठासीन अधिकारी साहेब मी पूर्ण ठराव वाचत नाही. कारण पूर्ण गोषवारा प्रत्येक सदस्याकडे आहे. जवळ जवळ तीन-चार पानांचा ठराव आहे. फक्त शेवटचा जो परिच्छेद आहे तो वाचतो. वरील सर्व नियुक्त्या करण्याबाबत, कर्मचाऱ्यांच्या पगारावरील कर्ज सन २००८ पर्यंत पूर्णपणे शंभर टक्के शासनाकडील अनुदानात भागविण्यात येईल. सन २००८-०९ मध्ये पन्नास टक्के अनुदान, पन्नास टक्के महापालिका निधीतून करेल. सन २००३-१० मध्ये २५ टक्के शासन अनुदानातून आणि ७५ टक्के महापालिका निधीतून करील. एप्रिल २०१० नंतर संपूर्ण खर्च महापालिका निधीतून करण्यास ही महापालिका मंजुरी देत आहे. तसेच, इतर सर्व खर्च ऊदा. औषधावरील खर्च, उपकरणांचा खर्च, कार्यालयीन खर्च, उपकरण देखभाल खर्च, हे महापालिकेस करण्यास ही सभा मंजुरी देत आहे. आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प राबविण्याकरिता व प्रकल्प कालावधीमध्ये शासनाच्या अनुदानाच्या व्यतिरिक्त वर नमुद केल्याप्रमाणे अतिारिक्त खर्च महापालिकेने करण्यासाठी तसेच आरोग्य केंद्रसाठी जागा भाड्याने घेण्यासाठी व महापालिकेची जागा असेल तिथे बांधकाम व इतर कीरकोळ दुरुस्ती करण्यासाठी आजची ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडतो.

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर साहेब, माझा २१(ज) चा प्रस्ताव दिलेला आहे. तर मला असे वाटते की, आता ६.०० वाजले आहेत तर हा विषय पुढच्या सभेत घ्यावा, अशी मी विनंती करते.

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

आता झालेला ठराव सर्वानुमते मंजूर

**प्रकरण क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या आर्थिक साहाय्याने आर.सी.एच. फेज-२ प्रकल्प सुरु करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि. ५.०६.२००४ रोजीच्या महासभेत ठराव क्र. ११, विषय क्र. ९ मंजूर करणेत आलेला आहे. याद्वारे केंद्र शासनाच्या अनुदानातून R.C.H. फेज् - २ कार्यक्रम राबविण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करून मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाला संगोपन व शालेय आरोग्य पुणे-१ यांचे पत्र जा. क्र. रा कुकका / अर्बन आर सी एच/ कक्ष १७/३३६५९-६१/०६, दि. ८.०६.२००६ नुसार संबंधित प्रकल्पाला एप्रिल २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठी मान्यता मिळालेली आहे. या प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेस शासनातर्फे टप्प्याटप्प्याने अनुदान मिळेल. तसेच प्रकल्प कालावधीनंतर म्हणजेच एप्रिल २०१० पासून हा प्रकल्प महानगरपालिकेस स्वबळावर चालवावयाचा आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या ८ लाखाचे वर असून नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेने ७ आरोग्य केंद्रे, एक उपकेंद्र व एक फिरता दवाखाना चालू केलेला आहे. R.C.H. - २ प्रकल्पांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, उपकेंद्राचे आरोग्य केंद्रात रूपातंर व नवीन ५ आरोग्य केंद्रे चालू करण्याचे ही महासभा मंजुरी देत आहे.

तसेच महानगरपालिकेचे एकही प्रसुतीगृह नसल्याने व प्रसुतीसेवा पुरविण्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, भाईंदर अपुरे पडत असल्याने एक माता व बाल रूग्णालय चालू करण्यास व प्रस्तावित आरोग्य केंद्रे व माता व बालरूग्णालय यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग, तज्ज्ञ डॉक्टरांची पदे, प्रोग्राम मॅनेजमेंट युनिट व त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग इ. मिळून खालील प्रमाणे करार पध्दतीने ठोक पगारावर पदे भरणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**आरोग्य केंद्रांकरिता लागणारा कर्मचारी वर्ग :-**

१. वैद्यकीय अधिकारी - ५
२. LHV/PHN - ५
३. ANM - ३१
४. Clerk - ५
५. Peon - १३
६. Link Workers - १३०

**माता व बालरूग्णालयासाठी तज्ज्ञ :-**

१. बालरोग तज्ज्ञ - १
२. स्त्री रोग तज्ज्ञ - १
३. भूल तज्ज्ञ - १

**प्रोग्राम मॉनिटरिंग युनिटसाठी लागणारा कर्मचारी वर्ग :-**

१. प्रोग्राम ऑफिसर / को-ऑर्डिनेटर / वैद्यकीय अधिकारी - १
२. अकाउटंट ऑफिसर - १
३. डेटा एन्ट्री ऑपरेटर - १

**(सदर पदांसाठी पात्रता शासनातर्फे कळविण्यात येणार आहे.)**

| अ. क्र. | वर्ष | शासनाकडून प्राप्त होणारा निधी (रू. मध्ये) | महापालिकेस करावा लागणारा खर्च (रू. मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | २००६-०७ | ७६,१६,५९३.०० | Nil |
| २. | २००७-०८ | ८२,२४,२४१.०० | Nil |
| ३. | २००८-०९ | ५८,४९,७३१.०० | २७,१५,०००.०० |
| ४. | २००९-१० | ३७,६९,८००.०० | ४०,७२,५००.०० |
| | एकूण | २,५४,६०,३६५.०० | ६७८७५००.०० |

या कर्मचाऱ्यांचा पगारावरील खर्च २००८ पर्यंत पूर्णपणे (१०० टक्के) शासनाकडील अनुदानात भागवण्यात येईल. २००८-२००९ मध्ये ५० टक्के खर्च अनुदानातून तर ५० टक्के खर्च महानगरपालिका निधीतून करावा लागणार आहे. २००९-१० मध्ये २५ टक्के खर्च शासन अनुदानातून तर ७५ टक्के खर्च महानगरपालिका निधीतून करावा लागणार आहे.

एप्रिल २०१० नंतर संपूर्ण खर्च महानगरपालिका निधीतून करणेस ही महापालिका मंजुरी देत आहे. तसेच इतर सर्व खर्चही उदा, औषधी खर्च, उपकरणांचा खर्च, कार्यालयीन खर्च, उपकरण देखभाल खर्च, व इतर अनुषंगिक खर्च हे महानगरपालिकेस करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

R.C.H. - २ प्रकल्प राबविण्यासाठी व प्रकल्प कालावधीमध्ये शासनाचे अनुदाना व्यतिरिक्त वर नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त खर्च महानगरपालिकेने करण्यासाठी तसेच आरोग्य केंद्राकरिता जागा भाडयाने घेण्यासाठी वा महानगरपालिकेची जागा असेल तेथे बांधकाम व इतर किरकोळ दुरूस्ती करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक त्या खर्चास ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- ॲड. श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७० चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे. ते सभेस गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. ७० :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ११/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - ना फेरीवाला क्षेत्र, नो पार्किंग झोन, एकेरी मार्ग याबाबत स्थायी समितीने शिफारस केलेल्या महासभा ठराव क्रमांक ६७ अन्वये नो पार्किंग झोन व एकेरी मार्ग निर्णय होणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी ह्यांच्या आदेशानुसार सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल हे सभेस गैरहजर असल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७१ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

साहेब, मी विनंती केली आहे की, सदरचा प्रश्न पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ७१ :-**

सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक १५/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७२ चे वाचन केले.)

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छिते की....

**आसिफ शेख :-**

सभागृहात कोरम कुठे आहे?

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

प्रकरण क्र. ७०, ७१, ७२, ७३, ७४ ही ''ज'' ची प्रकरणे आहेत आणि ही सर्व फेटाळण्यात येत आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ही प्रकरणे कशी करिता फेटाळण्यात येत आहे? साहेब, मला ह्याचे ऊत्तर पाहिजे. बाहेर ही जी लोक थांबली आहेत त्यांना आपण ऊत्तर देऊन जा. सकाळपासुन ही लोक थांबली आहेत त्यांचा पहिल्यांदा आपण विचार करा. त्यांचे तुंम्हाला शाप लागतील. तीन वर्षापासून ती रोडवर आले आहेत.

**प्रकरण क्र. ७२ :-**

सन्मा. सदस्य श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भोला नगर येथील विस्थापित झालेल्या लोकांचे पुर्नवसन करणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

**प्रकरण क्र. ७३ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

**प्रकरण क्र. ७४ :-**

सन्मा. सदस्य श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक १६/०९/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मौजे मुर्धे मोर्वा येथिल इलेक्ट्रॉनिक पार्क झोन बाबत महापालिकेचे धोरण स्पष्ट करणेबाबत.

(मा. पिठासिन अधिकारी सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत आला.)

**नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रगीताला ऊभे रहावे.

**आसिफ शेख :-**

आपले ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक रतनलाल जोशी ह्यांचे सोमवारी निधन झालेले आहे. त्याबद्दल ही सभा दोन मिनिट स्तब्ध राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण करित आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

तसेच, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी भाऊ पंडीत हे देखील आज सकाळी वारले आहेत. त्यांना देखील श्रद्धांजली वाहायची आहे. परंतु गरिबांना विसरु नका.

**नयना म्हात्रे :-**

नक्कीच गरिबांचे त्यांना शाप लागतील.

**दुःखवटा ठराव क्र. ५८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. रतनलाल जोशी ह्यांचे निधन झाले. तसेच स्वातंत्र्य सेनानी श्री. भाऊ पंडीत ह्यांचेही दि. २०/०९/२००६ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. रोहित सुवर्णा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**मा. उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधु व प्रेक्षक आपल्या सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०६.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**